# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आणि

## श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

यांचे संयुक्त विद्यमाने

## डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर

**Research Sensitization Scheme for College Students**

अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत

**संशोधन प्रकल्प**

# कोल्हापूरच्या विकासात माजी मंत्री स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास


❖ संशोधक विद्यार्थी ❖

श्री. महेश र. कुंभार

श्री. आकाश व्ही. पाटील

श्री. निखिल बी. मगदूम

श्री. प्रविण बी. जाधव

❖ मार्गदर्शक ❖

डॉ. आर. के. शानेदिवाण

प्राचार्य, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

डॉ. पी. बी. पाटील

ग्रंथपाल, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर



सन २०१९–२०

# संशोधकांचे प्रतिज्ञापत्र

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व अग्रणी महाविद्यालय श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने असून प्रस्तुत **''कोल्हापूरच्या विकासात माजी मंत्री स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास''** हा संशोधन प्रकल्प पूर्ण केला असून **प्राचार्य, डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. पी. बी. पाटील (ग्रंथपाल)** यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन लाभलेले आहे.

प्रस्तुत प्रकल्पातील सर्व माहिती पूर्णपणे सत्य असून, या माहितीला आम्ही जबाबदार राहू. **''कोल्हापूरच्या विकासात माजी मंत्री स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास''** या विषयावर महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावर कोणत्याही प्रकारचे संशोधन लेखन झालेले नाही, याची ग्वाही आम्ही देतो. सदर विषयावर संशोधन लिखाण आढळल्यास होणाऱ्या कारवाईस आम्ही जबाबदार आहोत.

**संशोधक विद्यार्थी**

**श्री. महेश रा. कुंभार – बी.कॉम. भाग–३**

**श्री. आकाश व्ही. पाटील – बी.कॉम. भाग–३**

**श्री. निखिल बी. मगदूम – बी.कॉम. भाग–३**

**श्री. प्रविण बी. जाधव – बी.कॉम. भाग–३**

# मार्गदर्शकाचे प्रतिज्ञापत्र

प्रस्तुत प्रकल्प शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व अग्रणी महाविद्यालय श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्ण करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा विषय ''**कोल्हापूरच्या विकासात माजी मंत्री स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास**'' हा आहे.

प्रस्तुत प्रकल्प विद्यार्थ्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली तयार केला असून त्यामध्ये समाविष्ट असणारी माहिती माझ्या माहितीप्रमाणे पूर्णपणे सत्य असून, या माहितीला मी जबाबदार राहीन.

**मार्गदर्शक**

**डॉ. पी. बी. पाटील**
**ग्रंथपाल**
**श्री शहाजी छ. महाविद्यालय**

**डॉ. आर. के. शानेदिवाण**
**प्राचार्य**
**श्री शहाजी छ. महाविद्यालय**

# ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रकल्प महाराष्ट्र राज्याचे माजी कृषी राज्यमंत्री श्री. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे यांच्या जीवनचरित्रावर आधारीत असून त्याचे शीर्षक **''कोल्हापूरच्या विकासात माजी मंत्री स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास''** हे आहे. हा प्रकल्प पूर्ण होत असताना अनेकांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

प्रस्तुत संशोधन करीत असताना संस्थेचे **चेअरमन श्री. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव श्री. विजयराव बोंद्रे (बापू)** यांची प्रेरणा व मार्गदर्शन लाभले, त्याबद्दल आम्ही संशोधक विद्यार्थी त्यांचे मन:पूर्वक आभारी आहोत.

प्रस्तुत प्रकल्प पूर्ण करीत असताना महाविद्यालयाचे **प्राचार्य, डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. पी. बी. पाटील (ग्रंथपाल)** यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले, त्याबद्दल आम्ही संशेधक विद्यार्थी त्यांचे मन:पूर्वक आभारी आहोत.

प्रस्तुत प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी टंकलेखक श्री. गणेश पाटील, तसेच ज्या ज्ञात-अज्ञात व्यक्तींनी आम्हांस सहकार्य केले, त्या सर्वांचे आभार!

**संशोधक विद्यार्थी**

**श्री. महेश रा. कुंभार – बी.कॉम. भाग-३**

**श्री. आकाश व्ही. पाटील – बी.कॉम. भाग-३**

**श्री. निखिल बी. मगदूम – बी.कॉम. भाग-३**

**श्री. प्रविण बी. जाधव – बी.कॉम. भाग-३**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | |
| पहिले | श्रीपतराव बोंद्रे : जन्म, वारसा व जडणघडण | १–१५ |
| दुसरे | श्रीपतराव बोंद्रे : व्यक्तित्त्व विशेष | १६–३१ |
| तिसरे | श्रीपतराव बोंद्रे : शैक्षणिक आणि राजकीय कार्य | ३२–४२ |
| चौथे | श्रीपतराव बोंद्रे : सामाजिक कार्य | ४३–५० |
| पाचवे | श्रीपतराव बोंद्रे यांचे कोल्हापूर व कोल्हापूर परिसराच्या विकासातील योगदान | ५१–५९ |
| | उपसंहार | ६०–६२ |
| | संदर्भ सूची | ६३ |
| | परिशिष्टे | ६४–६७ |



# स्व. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे (दादा)

माजी कृषीराज्य मंत्री, महाराष्ट्र राज्य

(जन्म २८ डिसेंबर १९२० – मृत्यु ३० सप्टेंबर २०००)

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या निर्मितीबरोबर महाराष्ट्राच्या समाजजीवनामध्ये विविधांगी स्वरूपाचे बदल होत गेले. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण साहेब यांनी राजकारणाचा चेहरा बदलून समाजकारण हेच राजकारणाचे अंतिम ध्येय असायला पाहिजे अशी भूमिका घेतली. स्वाभाविकपणे संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांच्या विचारांवर श्रद्धा ठेऊन काम करणाऱ्या नेते आणि कार्यकर्ते यांची मांदियाळी तयार झाली. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात ‘विकासाचे मॉडेल’ उभं करीत असताना सर्वसामान्य माणूस त्यांनी जवळ केला, आपलेसा केला. यापैकीच एक म्हणजे कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणावर दिर्घकाळ आपल्या विचार आणि कृतीने छाप सोडणारे माजी आमदार, माजी कृषीराज्य मंत्री कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे होत.

कोल्हापूर शहर व जिल्ह्याच्या राजकारणात स्वातंत्र्योत्तर काळात अनेक राजकीय नेत्यांनी आपल्या कर्तृत्वाने स्वत:चे स्थान निर्माण केले होते. कै. रत्नाप्पा कुंभार, कै. बाळासाहेब माने, कै. उदयसिंगराव गायकवाड, कै. शंकरराव मोरे, कै. शंकरराव माने यांच्या बरोबरीनेच कै. सदाशिवराव मंडलिक, नरसिंग गुरूनाथ पाटील, कल्लाप्पाण्णा आवाडे, कै. विक्रमसिंह घाटगे, गोविंदराव कलिकते, संजय गायकवाड, त्र्यं. सि. कारखानिस, दाजीबा देसाई, डॉ. एन. डी. पाटील, संपतराव पवार, कै. गोविंद पानसरे या धुरंदर राजकीय नेतृत्त्वाने राजकारणाबरोबरच समाजकारणातही आपला ठसा उमटविला.

पुढील काळात म्हणजे गेल्या वीस पंचवीस वर्षाच्या काळात राजकारणाचे रंग बदलत गेले. नवी तरूण पिढी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत नवा विचार घेऊन राजकीय पटलावर आपले भविष्य घडवू लागली. यामध्ये हसन मुश्रीफ, के. पी. पाटील, पी. एन. पाटील, सतेज पाटील, चंद्रदीप नरके, राजेश क्षीरसागर, राजू शेट्टी, धैर्यशील माने, संजय मंडलिक अशी नव्या दमाची राजकीय मंडळी राजकारणाबरोबरच सामाजिक कार्याचा वसा घेऊन विधीमंडळात नेतृत्त्व करू लागली. या सर्व राजकीय नेत्यांनी आपआपल्या मतदारसंघाच्या कक्षा निश्चित करून घेतल्या होत्या. पक्षीय राजकारणाचा फारसा विचार न करता निवडणुका जिंकण्यासाठी आपल्या सोयीची भूमिका घेऊन यशस्वी होण्याची परंपरा त्यातील बहुतांशी सर्व राजकीय नेत्यांनी आत्मसात केली होती. अशा या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता असे बिरूद अभिमानाने मिरविणाऱ्या कै. श्रीपतराव बोंद्रे यांचे व्यक्तित्व अधिकच खुलून दिसते. राजकारणाचा पाया समाजकारणच असायला हवा या विचारांच्यावर असीम श्रद्धा असणाऱ्या श्रीपतराव बोंद्रे दादा यांनी निष्ठेचे, विश्वासाचे राजकारण करीत असताना नेहमीच सर्वसामान्य माणसाचे हित नजरेसमोर ठेवले. १९२० साली जन्मलेल्या कै. दादांची जन्मशताब्दी साजरी होत असताना त्यांच्या सामाजिक कार्याची ओळख करून घेणे ही तरूण पिढीसाठी मार्गदर्शक

ठरणारी कृती आहे. या दृष्टिने कै. दादांनी कोल्हापूर व कोल्हापूर परिसरासाठी केलेल्या सामाजिक कार्याची ओळख करून देण्याच्या हेतूने प्रस्तुत अभ्यास विषयाची निवड केली आहे. हा अभ्यास उपलब्ध साधनांच्या आधारे करीत असताना काही व्यक्ती व संस्था यांच्याशी संवाद साधून कै. दादांनी केलेल्या कार्याची ओळख करून घेतली आहे. यामध्ये, श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, महात्मा फुले सेवा संस्था, फुलेवाडी, श्री विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, फुलेवाडी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांच्याबरोबरीनेच अनेक राजकीय नेते, शैक्षणिक क्षेत्रातील धुरंदर, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून माहितीचे संकलन केले आहे. प्रस्तुत अभ्यास हा कै. श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या कार्याचे सर्वांगीण मूल्यमापन करणारा आहे असा दावा संशोधक विद्यार्थी करीत नाहीत. पण कै. दादांच्या कार्याची ओळख करून घेण्याच्या दृष्टिने प्रस्तुत अभ्यास निश्चितच मार्गदर्शक ठरू शकेल.

# प्रकरण पहिले

## श्रीपतराव बोंद्रे : जन्म, वारसा व जडणघडण

कोल्हापूर शहर आणि जिल्ह्याला समृद्ध विचारांची परंपरा आहे. कोल्हापूरचे नाव घेतल्याबरोबर सर्वप्रथम लक्षात येते श्री महालक्ष्मी. महाराष्ट्राची दक्षिण काशी असा सार्थ गौरव या देवस्थानाचा आहे. दरवर्षी लाखो भाविक येथे देवीच्या दर्शनासाठी येतात आणि श्रद्धाशील मनाने तिच्या चरणी अर्पण होतात. भाविकांसाठीचा हा अनुभव अलौकिक असतो. लौकिक स्तरावर कोल्हापूरची ओळख निर्माण करण्याचे श्रेय राजर्षि छत्रपती शाहू महाराजांकडे जाते. इंग्रजांचा कालखंड म्हणजे परकीयांची सत्ता. आपल्या संस्थानामध्ये निर्णय घेतानाही इंग्रजांची परवानगी घेणे किंवा त्यांना अनुचित वाटू नये याची दक्षता घेणे अशी परिस्थिती असूनही या सर्वाची पर्वा न करता राजर्षि शाहू राजांनी मानवतेचा हेतू नजरेसमोर ठेवून संस्थानातील लोकांच्या हिताचे निर्णय घेतले. तत्कालीन परिस्थितीत त्यांचे निर्णय धाडसी तर होतेच पण त्याहीपेक्षा दूरगामी परिणाम करणारे ठरले. आज भारतीय समाजव्यवस्थेत स्वीकारलेली अनेक तत्त्वे राजर्षि शाहूंच्या विचारांतून प्रेरणा घेऊन समाविष्ट झालेली आहेत. याचा परिणाम संपूर्ण देशात झाला आणि कोल्हापूरची ओळख राजर्षि शाहूंचे कोल्हापूर अशी गडद झाली.

राजर्षि शाहूंनी समतेचा विचार मांडला आणि रुजवलाही. त्यांच्यावरील महात्मा फुले यांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. फुलेंनी आयुष्यभर माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळायला हवी या ध्यासाने सामाजिक स्तरावर लढा उभारला. समाजातील दलित, उपेक्षित, महिला, कुमारी माता, विधवा आदींना त्यांनी समाजविचारांच्या केंद्रस्थानी आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. एकाअर्थी पुरोगामी विचारांचे बीज भारतीय आणि विशेषतः महाराष्ट्रीय समाजामध्ये रुजविण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक वास्तव नजरेसमोर आणले म्हणजे महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्याचा आवाका लक्षात येतो.

महात्मा जोतिबा फुलेंचा विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा सकारात्मक प्रयत्न राजर्षि शाहूंनी केला. शाहूराजांना शिक्षणाविषयी विशेष आस्था होती. समाजातील मुले शिकताहेत, पण शालांत परीक्षेनंतर त्यांना शिक्षण घेत येत नाही ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी कोल्हापूर शहरात विविध जाती–धर्मांची वसतिगृहे उभारली. शिक्षणाने संस्कारित झालेली तरुण मने काळाचे कोणतेही आव्हान स्वीकारू शकतात. अशा मनाला अडचणीवर मात करण्याची प्रेरणा आणि स्फूर्ती मिळू शकते, अशी श्रद्धा राजांच्या मनात होती. त्यामुळेच आपल्या संस्थानातील तरुणांना शिक्षण मोफत देण्याचा निर्णयही त्यांनी घेतला. प्राथमिक शिक्षण हे समाज घडविणारा पाया असून हा पाया घट्ट असायला हवा ही भावना या ठिकाणी होती. एकाक्षणी तर 'माझ्या राज्यातील प्रजा केवळ प्राथमिक शिक्षणाने संस्कारित झाली तरी त्यांच्याकडे राज्य सोपवीन'

अशी भावना राजर्षि शाहूराजांनी व्यक्त केली होती. केवळ भावना व्यक्त करून ते थांबले नाहीत तर त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून आपला विचार अंमलात आणला.

राजर्षि शाहूंच्या मनात दलित, पददलितांविषयी कळवळा होता. समाजातील हा मोठा समूह धर्म–जातीच्या अवास्तव कल्पनांनी भरडला जात आहे याची जाणीव त्यांना होती. या समाजामध्ये शिक्षणाविषयी अनास्था होती. याचा परिणाम अंधश्रद्धा वाढीत होत होता. मुळातच आर्थिक, सामाजिक स्तरावर कनिष्ठ श्रेणीत असणारा हा समाज सक्षमपणे उभा रहायचा असेल तर या समाजाला विशेष सवलती द्यायला हव्यात ही भावना राजर्षि शाहूंच्या मनात निर्माण झाली आणि त्यातूनच दलितांना पन्नास टक्के आरक्षणाचा निर्णय त्यांनी घेतला. दलित समाजाला विकासाच्या वाटेवर आणायचे असेल तर त्यांना विशेष सवलती द्यायला हव्यात असा विचार शाहूराजांनी केला. राजांच्या या विचारांचे मौलिकत्व तेव्हाच समजते जेव्हा आपणास हे लक्षात येते की स्वतंत्र भारतात असा निर्णय होण्यास पन्नास वर्षे लागली.

महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी आपली संपूर्ण हयात मानवतेचा संदेश सर्वदूर पसरविण्यासाठी व्यतीत केली. जातीपातीच्या बंधनात करकचून आवळलेल्या आणि अंधश्रद्धांच्या विळख्यात स्वतःला बंदिस्त केलेल्या समाजाला माणुसकीचे नाते समजावून सांगितले. यासाठी केवळ शब्दांनी मार्गदर्शन केले नाही तर प्रत्यक्ष कृती केली. भारतीय समाजव्यवस्थेचा बदललेला इतिहास या तीन व्यक्तींच्या कार्याचा विचार केल्याशिवाय लिहिताच येणार नाही. पण याहीपेक्षा मोठे कार्य या समाजसुधारकांच्या माध्यमातून झाले. त्यांनी समाजाला पुरोगामी विचार करायला शिकविले. त्यांच्या मागे अशी विचार आणि कृतीने पुरोगामित्व वागविणारी कितीतरी तरुणांची पिढी तयार झाली. या तरुणांनी फुले, शाहूंच्या विचारांना आणि कृतींना जणू जीवनाचा ग्रंथ मानले. मानवाच्या दास्यमुक्तीचा विचार प्रत्यक्ष कृतीतून अंमलात आणला. अशा व्यक्तींमध्ये कोल्हापूरच्या भूमिपुत्रांचा उल्लेख अत्यंत आदराने होतो. यामधीलच एक कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे होते.

**वारसा**

व्यक्तीच्या मोठेपणाचा प्रवास खडतर प्रयत्नातून होत असतो. बऱ्याच वेळेला हा प्रवास अनेकांना माहीत असत नाही. त्यामुळे यश दिसते, पण त्यामागील प्रेरणा आणि परिश्रम फारसे लक्षात येत नाहीत. अशा वेळी कोणीतरी त्याची आठवण करून द्यावी लागते. अशा आठवणी संबंधित व्यक्तीचे कर्तृत्व अधोरेखित करतातच, पण त्याचबरोबर जे सान्निध्य त्यांना लाभले त्याचाही परिचय होत राहतो. मोठेपणाच्या मखरामध्ये कदाचित अशा बाबी फारशा विचारात घेतल्या जात नाहीत, पण जेव्हा वस्तुस्थिती नजरेसमोर येते तेव्हा मात्र मोठेपणाची झालर

अधिक गडद होते. कोल्हापूरचे थोर सुपुत्र, मातीवर प्रेम करणारा शेतकरी, सर्वसामान्यांसाठी झटणारा समाजसेवक, राजकारणाची समाजकारणाशी यशस्वी सांगड घालणारा यशस्वी राजकारणी आणि याही पेक्षा एक चांगला माणूस म्हणून समाजात नावलौकिक मिळविणाऱ्या कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे यांच्या संदर्भात हे मोठेपण कष्ट, विचार आणि प्रत्यक्ष कृतीतून प्राप्त झाले होते.

कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे! आयुष्याच्या दीर्घ वाटचालीत स्वकर्तृत्वावर सर्वसामान्य माणसांचा मसिहा बनलेला अवलिया! सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेला आणि पुढील काळात शेतकऱ्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनलेला भूमिपुत्र! राजकारण करीत असताना समाजकारणाला महत्त्व देणारा लोकनेता! समाजाच्या प्रत्येक घटकाला 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा मिळायला हवी असे मानताना महात्मा जोतिबा फुले यांना समाजक्रांतीचे अग्रणी मानून नायकत्व देणारा समाजसुधारक! देवावर श्रद्धा ठेवून सामान्यजनांना मदतीचा हात पुढे करणारा भक्त! अशा कितीतरी अंगांनी श्रीपतराव बोंद्रे यांच्या व्यक्तित्वाचा शोध घेता येतो. परमेश्वराने दिलेल्या एकाच आयुष्यात अनेक आयुष्य जगणारा, सर्वांना हवाहवासा वाटणारा समाजाचा हा नायक एकाएकी घडला नाही. त्यांना लाभलेली पार्श्वभूमी लक्षात घेतली म्हणजे बोंद्रेदादांचे घडणे किती कष्टदायक होते याचा उलगडा होतो.

बोंद्रे हे नाव कोल्हापूरच्या सार्वजनिक जीवनात दीर्घकाळापासून परिचित आहे. श्रीपतराव बोंद्रे यांच्या जीवनाचा आलेख मांडताना त्यांच्या आजोबांपर्यंत माग काढता येणे शक्य आहे. बोंद्रे घराण्याचे मूळ पुरुष म्हणून रामजी बोंद्रे, महादेव बोंद्रे आणि कृष्णा बोंद्रे यांचा उल्लेख करावा लागतो. हे तीनही बंधू आपापल्या परीने स्वतःचे जीवन जगले. या तिघांच्या माध्यमातून तीन वेगवेगळी घराणी म्हणजे परंपरा निर्माण झाल्या. आजही या परंपरा वाढीस लागलेल्या आहेत. यापैकी रामजी बोंद्रे यांना शंकरराव हा एकच मुलगा. शंकररावांचे लग्न होऊन त्यांना सहा अपत्ये झाली. यापैकी दोन अपत्ये जन्मानंतर काही काळातच कालवश झाली. उर्वरित चारांमध्ये सर्वात थोरले श्रीपतराव, त्यानंतर हौसाबाई, गजाननराव आणि सर्वात लहान महिपतराव.

बोंद्रे घराण्याचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे आणि होता. काळाबरोबर यामध्ये काही बदल झाले असले तरी आजची त्यांची ओळख शेतकरी अशीच आहे. श्रीपतराव बोंद्रे यांचे आजोबा रामजी बोंद्रे हे तर हाडाचे शेतकरी होते. शेतात वेगवेगळे प्रयोग करीत त्यांनी भाजीपाला, कडधान्याचे उत्पादन घेतले. उसाची लागवड हा तर त्यांचा पारंपरिक व्यवसाय बनलेला होता. साधारणपणे सव्वाशे ते दीडशे वर्षांपूर्वीचा हा काळ. शेती भरपूर असायची आणि उत्पन्न वाढीसाठी विविधांगांनी प्रयत्नही व्हायचे. त्याकाळी आजच्यासारखी आधुनिक तंत्रे

नव्हती. पीक वाढीसाठी वापरण्यात येणारी खतेही फारशी उपलब्ध व्हायची नाहीत. अशा परिस्थितीत रामजी बोंद्रे शेतात अक्षरशः अहोरात्र राबत असत. तत्कालीन परिस्थितीत शक्य असणारे सर्व प्रयोग करून जास्तीत जास्त पीक मिळविण्याचा प्रयत्न करीत. यामध्ये त्यांना बऱ्यापैकी यशही मिळत होते.

शेती मग ती आजची असो किंवा जुन्या काळची, धाडसाने प्रयोग केले तर यशस्वी होता येते, याचा अनुभव अनेकांना आहे. आजच्या परिस्थितीत हे धाडस अनेकवेळा केले जाते. नवे तंत्र, खते, लागवडीची आधुनिक तंत्रे वापरून नवनवे प्रयोग करण्यात येतात. पण रामजी बोंद्रे यांनी त्याकाळी जगावेगळे साहस केले. ज्या माळावर काहीही उगवत नव्हते अशा माळावर उसाची शेती करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. या माळाला 'डोण्याचा माळ' असे म्हणत असत. मुख्य म्हणजे या माळावर प्रेते जाळली जात. शंभर वर्षापूर्वीचा काळ नजरेसमोर आणला म्हणजे त्या माळावर रामजी बोंद्रे करू पाहणारे धाडस लक्षात येते.

'डोण्याचा माळ' निरुपयोगी म्हणून तसा उपेक्षितच होता. रामजी बोंद्रे यांच्या धडपडी नजरेने त्यामध्ये फुललेले नंदनवन पाहिले आणि त्यादृष्टीने आखणी सुरू झाली. सर्वात महत्त्वाची अडचण होती ती म्हणजे पाण्याची उपलब्धता. कारण शेती करायची असेल तर पाणी पाहिजेच, पण या माळाच्या आसपास कुठेही पाणी उपलब्ध नव्हते. पाण्यासाठी दूरवर असणाऱ्या रंकाळ्यावर अवलंबून रहावे लागणार होते. हे काहीसे कठीण असणारे काम, पण रामजी बोंद्रे खचले नाहीत. त्यांनी रंकाळ्यातून पाणी आणायचेच असा पक्का निर्धार केला आणि 'डोण्याचा माळ' मशागतीसाठी हाताखाली घेतला. माळावर पीक घ्यायचे तर जमीन सुपीक असायला हवी. तिचा पोत सुधारायला हवा. रामजींनी यासाठी एक अभिनव प्रयोग केला. त्यांनी नदीकाठची माती आणून माळावर पसरली. आज वाहतुकीची साधने उपलब्ध आहेत त्यामुळे माती आणून पसरणे ही बाबा सोपी वाटू शकेल, पण रामजी बोंद्रेंचा काळ नजरेसमोर आणला तर त्यातील कष्ट समजू शकतात. पण त्यांनी ते केले. संपूर्ण माळावर सुपीक मातीचा थर पसरला.

आता पाण्याचा प्रश्न होता. रामजींनी रंकाळ्याजवळून पाट काढला आणि पाटातून पाणी माळापर्यंत आणले. आज 'पाणी उचलणे' मोटारी किंवा इंजिनाने सहज शक्य आहे. पण रामजींनी माळावर आणलेले पाणी या साधनांनी आणलेले नव्हते तर रंकाळ्यातील पाणी सुपाने पाटात उपसायचे आणि तेथून डोण्याच्या माळापर्यंत न्यायचे. केवढी प्रचंड चिकाटी त्यांनी दाखवून दिली. सर्वसामान्य माणसांच्या मनातही जो विचार येणार नाही तो रामजींनी प्रत्यक्षात उतरविला. ओसाड माळावर पिकांनी समृद्धी फुलविली. जास्तीत जास्त पाणी लागणारे पीक म्हणून ऊस शेतीचा विचार होतो. तरीही रामजींनी या माळावर उसाचे पीक घेतले. हा प्रयोग

'न भूतो न भविष्यती' असाच होता. यामुळेच कसलेला आणि कष्टकरी शेतकरी काय करू शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणूनच रामजी बोंद्रेंचा उल्लेख करावा लागतो. असाच एक प्रयत्न त्यांनी विहीर खोदण्याच्या निमित्ताने केला होता. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात दुष्काळाचे सावट सर्वदूर पसरलेले होते. लोकांच्या पोटाची उपासमार होत होती. रामजींना ही परिस्थिती पाहून अतीव दुःख होत होते. लोकांना काम दिले तर त्यातून थोडीशी मिळकत होईल व पोटाचा प्रश्न सुटेल या भावनेने त्यांनी विहीर खणण्याचे काम लोकांना उपलब्ध करून दिले. लोकांच्या अडीअडचणीला उपयोगी पडावे, त्यांच्या सुखदुःखात सहभागी व्हावे आणि इतरांबरोबर स्वतःही आनंदी रहावे अशा मनोवृत्तीमुळे रामजी बोंद्रे 'माणूस' म्हणूनही सर्वदूर परिचित बनले.

रामजी बोंद्रेंच्या जीवनात आणखी एक घटना घडली. ही घटना करवीर मठाचे शंकराचार्य यांच्या विश्वासाचे प्रतीक आहे. रामजी बोंद्रे हे मठाजवळ असणारी शेती करीत होते. स्वाभाविकपणे त्यांचा आणि शंकराचार्यांचा सातत्याने संबंध यायचा. ते बराचवेळ मठातही थांबत. या काळात मठातील हरणांना पाणी व गवत देण्याबरोबर मठातील जमीन गाईच्या शेणाने सारवण्याचे कामही रामजी करीत. असे करण्यामध्ये कोणताही स्वार्थ नसे. केवळ शंकराचार्यांच्याविषयीची कृतज्ञता हीच भावना यापाठीमागे असायची. रामजी बोंद्रेंच्या आयुष्यातील हा जणू दिनक्रमच बनलेला होता. यातूनच शंकराचार्य आणि रामजींमध्ये जिव्हाळा, आपुलकीची भावना निर्माण झाली. याचेच पर्यवसन एका अविस्मरणीय घटनेत झाले. एके दिवशी शंकराचार्यांनी रामजींना बोलावून घेतले आणि त्यांनी केलेली मठाची सेवा विचारात घेऊन त्यांना मठाच्या मालकीची १३ एकर जमीन रु. ५० भावाने देऊ केली. श्रद्धा आणि भक्तीचे हे फळ रामजींनी स्वीकारले. तेथूनच त्यांचा उत्कर्ष सुरू झाला. या जमिनीतून रामजी बोंद्रे यांनी कसदार पिके घेतली आणि तोच वारसा पुढल्या पिढीसाठी राखून ठेवला. आजही रामजी बोंद्रेना मिळालेली ही जमीन बोंद्रे घराण्याच्या वैभवात भर घालीत आहे.[१]

रामजी बोंद्रे यांनी स्वकष्टाने, जिद्दीने आपला संसार उभा केला. मुळातच खडतर प्रयत्न आणि त्याच्या बरोबरीने असणारी श्रद्धा यांमुळे त्यांच्या भोवतीचा गोतावळाही श्रद्धाशील राहिला. शेती करताना मातीशी प्रामाणिक राहिलेले रामजी बोंद्रे यांनी स्वतःच्या उत्कर्षाबरोबर समाजाचे हितही पाहिले आणि गोरगरिबांना मदत करण्याची वृत्ती अंगात बाणवली. चांगला माणूस म्हणून समाजात मान्यता पावलेल्या रामजी बोंद्रे यांच्या मृत्यूनंतर हा विचारांचा आणि कृतीचा संपन्न वारसा त्यांचे पुत्र शंकरराव बोंद्रे यांच्याकडे आला. शंकररावांनीही आपल्या वडिलांच्या अंगचे सर्व गुण घेतले होते. त्यांनीही मूळ जमिनीत आणखी भर घातली. जमिनीचा कस पाहून पिके घेतली. याच काळात उसाचे पीक व त्यावर प्रक्रिया करून गूळ बनविणारी

गुऱ्हाळे सुरू झाली. शंकररावांनी यामध्ये चांगलाच जम बसविला. घरातील पारंपरिक शेतीचा पिढीजात व्यवसाय रामजी व शंकरराव या पितापुत्रांनी अत्यंत नेकीने सांभाळला.

रामजी बोंद्रेंचा वारसा जपत शंकरराव बोंद्रे यांनी घरची आर्थिक स्थिती नीटपणे बसविली. सर्व काही ठीक चालले आहे असे वाटत असतानाच शंकरराव बोंद्रे यांच्या पहिल्या पत्नीचा अकाली मृत्यू झाला. घरावर शोककळा पसरली. शंकररावांच्या आजी भागिरथीबाई तर खूपच कष्टी झाल्या. त्यांनी शंकररावांपुढे दुसरे लग्न करण्याचा प्रस्ताव ठेवला.

**जन्म, जडणघडण आणि संस्कार**

शंकररावांनी आईच्या इच्छेखातर दुसऱ्या लग्नाला होकार दिला. यथावकाश सर्व सोपस्कार पार करून कर्नाटकातील चिकोडी तालुक्यातील कुन्नुर गावच्या जाधव–कुलकर्णी यांची मुलगी बोंद्रे घराण्यात सून म्हणून आली. सुसंपन्न, सुसंस्कृत आणि कष्टाळू अशा बोंद्रे कुटुंबात सुशील, गुणी अशा कृष्णाबाईंचा झालेला प्रवेश सर्वार्थाने शुभशकुन होता. शंकररावांचे आयुष्य पुन्हा एकदा फुलू लागले. सगळीकडे समाधानाचे वातावरण असताना घरात एका नव्या पाहुण्याच्या येण्याची चाहूल लागली. शंकररावांच्या आई भागिरथीबाईंना तर आकाश ठेंगणे झाले. सौ. कृष्णाबाई यांनी २८ डिसेंबर १९२० साली एका बाळाला जन्म दिला.[२] बाळाचे नाव श्रीपतराव ठेवण्यात आले.

पुत्रप्राप्तीचा आनंद शंकररावांनी नवी इंग्लिश न्यास गाडी घेऊन साजरा केला. श्रीपतरावांचा जन्म आजोळी म्हणजे कुन्नुर येथे झालेला असल्यामुळे त्याला पहायला नव्या गाडीतून जायचे हा त्यांचा अट्टाहास होता व तो त्यांनी पूर्णही केला. शंकरराव त्यांच्या मित्रांसोबत कुन्नुरला पोहोचले. सगळीकडे आनंदीआनंद होता. त्यांनी बाळ श्रीपत व पत्नी कृष्णाबाईंना कोल्हापूरला आणण्याचा निर्णय घेतला. बोंद्रे घराण्याचा वारस कर्नाटकातून महाराष्ट्रात स्थलांतरित झाला. अगदी जन्माला आल्यापासून तिसऱ्या दिवशी श्रीपतरावांची भ्रमंती सुरू झाली. हा नियतीचा संकेतच असावा. कारण या क्षणानंतर पुढील ऐंशी वर्षे श्रीपतरावांना या ना त्या कारणाने सतत भ्रमंती करावी लागली. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळताना सार्वजनिक जीवनातील लोकजीवनाचा उद्धार करणे हाच त्यांच्या भ्रमंतीचा उद्देश राहिला.

श्रीपतच्या आगमनाने सर्व घर आनंदले होते. विशेषतः आजी भागिरथीबाईंचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. त्यांनी आपल्या नातवाचे आगमन अतिशय वेगळ्या पद्धतीने साजरे केले. शंकररावांनी बाळ श्रीपतला आणले. त्याला पाहण्यासाठी शिवाजी पेठेत आयाबायांनी गर्दी केली होती. आजी भागिरथीबाईंनी आपल्या नातवाला कवेत घेतले आणि घरात पाऊल टाकले. त्याला पाळण्याचा स्पर्श करण्याअगोदर त्यांनी श्रीपतला जमिनीवर

झोपवले. पण ही जमीन चांदीच्या रुपयांनी सजवलेली होती. आजीने भाजीपाल्याच्या विक्रीतून मिळालेल्या रुपयांनी लहानशा श्रीपतची शेज तयार केली होती. आजीची भावनाच अशी होती की माझ्या नातवाच्या संपूर्ण आयुष्याला धनाचा स्पर्श होत राहो. त्याला कधीही कोणतीही चिंता लागून राहू नये. स्वतःबरोबर त्याच्या आजूबाजूला असणाऱ्यांनाही सुखसमृद्धी मिळत राहो. आजीची ही मनोभावना अगदी पहिल्या स्पर्शापासून फलद्रूप ठरली. श्रीपतरावांच्या जीवनाला आकार मिळू लागला.

श्रीपतराव जन्मले आणि बोंद्रे घराण्यातील वातावरण झपाट्याने बदलू लागले. दीर्घकाळानंतर घरी पुत्रप्राप्ती झाली होती. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाबरोबर परिसरातही लहानग्या श्रीपतचे कौतुक होत होते. आजीतर त्याला फुलासारखे जपत होती. गोंडस, तजेलदार, तरतरीत असणारा श्रीपत सर्वांच्या कौतुकाच्या वर्षावाने न्हाऊन निघत असे. वडील शंकररावांच्या आनंदाला पारावर नव्हता. त्यांच्यापुढे श्रीपतच्या भविष्याची अनेक स्वप्ने तरळून जात असत. हा काळ इंग्रजी आमदानीचा होता. इंग्रजांचा अंमल आणि त्यांच्या हुकमाचे ताबेदार यांचा दरारा खूप मोठा होता. त्यातीलच एक मोठा अधिकारी म्हणजे अंमलदार होय. शंकररावांच्या दृष्टीने श्रीपत अंमलदार होणे ही सर्वोच्च आनंदाची बाब होती. त्यामुळेच श्रीपतला पुढे काय करणार? असे म्हटल्यावर 'माझ्या पोराला अंमलदार करणार' असे अभिमानाने ते सांगत असत. एकाअर्थी श्रीपतरावांच्या जीवनाशी त्यांचे वडील शंकररावांच्या आशा–आकांक्षा निगडित झाल्या होत्या.

शंकररावांच्या मनाप्रमाणे सर्व काही घडत होते. परमेश्वराने सुख अगदी भरभरून त्यांच्या कुटुंबाच्या पदरात घातले होते. पण नियतीचा खेळ वेगळाच सुरू होता. एके रात्री शंकररावांना दरदरून घाम फुटला. त्यांचे सर्वांग थरथरू लागले. कुणालाही काही समजायच्या आत शंकररावांना क्षय झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. संपूर्ण कुटुंब हादरले. आजी भागिरथीबाई आणि पत्नी कृष्णाबाई यांच्या तोंडचे पाणी पळाले. आता कुठे घरात सुखाची चाहूल लागली होती तोपर्यंत हा प्रसंग ओढवला. श्रीपतरावांचे वय त्यावेळी अवघे ७–८ वर्षांचे होते. एकीकडे त्याच्या बाललीलांनी घर भरलेले होते तर दुसरीकडे त्याचे वडील चिंताग्रस्त राहू लागले. घराला जणू दुःखाने घेरले होते. पण श्रीपतरावांच्या आईने नेटाने संसार केला. सर्व भार जणू आपल्या खांद्यावर घेतला. पतीचे दुखणे त्यांनी जीवनाची अपरिहार्यता म्हणून स्वीकारले आणि घर, शेती, जनावरे यांना सांभाळण्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. पत्नी आणि सासू यांना मानसिक आधार देताना मुलगा श्रीपतरावाच्या जोपासनेत कुठेही कमतरता राहू नये याची खबरदारी त्यांनी घेतली. पण नियतीने डाव साधला आणि भागिरथीबाईंचे निधन झाले. सुखाची चाहूल लागली असतानाच दुःखाचा पहिला प्रहार बोंद्रे कुटुंबावर पर्यायाने श्रीपतरावांवर झाला.

आजीचा मृत्यू आणि वडिलांचे आजारपण अशा काळात श्रीपतरावांनी घरच्या कामात आईला मदत करण्यास सुरुवात केली. वयाच्या सातव्या–आठव्या वर्षातील श्रीपतरावांची समज खूपच प्रगल्भ होती. आईला कामात मदत करताना जनावरांना गोठ्यातून आत–बाहेर करणे, म्हशींना पाणी पाजणे या गोष्टीत लहानगे श्रीपतराव लक्ष घालू लागले. या काळात घरातील कुटुंबसंख्याही वाढली होती. श्रीपतरावांना गजानन, हौसाबाई व महिपतराव या भावंडांची साथ वागवावी लागत होती. शंकररावांच्या आजारपणात तर श्रीपतराव घरातील थोरले म्हणूनच वावरत होते. वयाची दहा वर्षे पूर्ण होण्याअगोदरच श्रीपतरावांवर घरातील मोठेपणाचा भार पडला. ज्या वयात बालपणीच्या खेळात रममाण व्हायचे त्याकाळात कुटुंबाला हातभार लावून 'उभं' करण्याची जबाबदारी नियतीने त्यांच्यावर टाकली. श्रीपतराव स्वतःबरोबर इतरांनाही घडवू लागले. आयुष्य कसं उभं करायचे याचा धडा त्यांना या अनुभवातून मिळू लागला.

**श्रमाचे बाळकडू**

शंकररावांनी आपला मुलगा अंमलदार व्हावा असे स्वप्न पाहिले होते. त्यासाठी शिक्षणाची जरुरी होती. पण श्रीपतरावांच्या शिक्षणामध्ये सातत्य नव्हते. वयाच्या सातव्या वर्षी त्यांनी बिगरीत प्रवेश घेतला. पुढे यथावकाश पहिलीत गेले पण रोजच्या रोज शाळेत जाणे त्यांना शक्य होत नसे. घरात वडिलांचा आजार, आईला होणारी मदत यातच त्यांचा वेळ जाऊ लागला. याच काळात मर्दानी आखाड्यात जाऊन व्यायाम करण्याचीही सवय त्यांनी लावून घेतली. जोर, बैठका, कुस्ती, मल्लखांबाबरोबर घरातील म्हैशींच्या धारा काढणे, त्यांचे चारापाणी पाहणे या बाबीही श्रीपतराव पाहू लागले. शाळेची आवड जोपासण्याच्या काळात श्रीपतरावांच्या शिरावर प्रापंचिक जबाबदाऱ्या येऊन पडल्या. शाळेपेक्षा घरची ओढ अधिक लागू लागली आणि त्याचा परिणाम शाळा सुटण्यात झाला. श्रीपतरावांनी तिसऱ्या इयत्तेतून माघार घेतली. वडील शंकररावांना खूप दुःख झाले. आपले स्वप्न भंगते की काय अशी शंका त्यांच्या मनाला चाटून गेली.

श्रीपतराव आपल्या वडिलांना 'आबा' म्हणायचे. आबांच्या सान्निध्यात त्यांचे बालपण जसे फुलले तसेच जीवनाच्या वाटेवरील अनेक संस्कारांचे बीजारोपणही याच काळात झाले. यापैकी महत्त्वाचा संस्कार म्हणजे श्रमाचे महत्त्व. शाळेची साथ सुटल्यानंतर वडिलांची काळजी घेणे आणि त्यांच्याबरोबर राहणे या जबाबदाऱ्या श्रीपतरावांनी आपणहून स्वीकारल्या. ते आबांच्या बरोबर शेतीकडे जाऊ लागले. त्यांच्याशी संवाद करू लागले. आपल्या मनातील अनेक शंका विचारू लागले. शेतीसंदर्भातील त्यांच्या शंकाना आबा, प्रत्यक्ष कृतीतून उत्तर देऊ लागले. एकाअर्थी श्रीपतरावांमधील 'शेतकरी' या काळात घडू लागला. प्रत्यक्ष शेतीत वावरताना

वेगवेगळी पिके, भाज्या, खते यांचा परिचय त्यांना अगदी जवळून झाला. पिकांना, भाज्यांना लागणारी जमीन कशी असावी, त्यांना पाणी कितपत द्यावे आणि त्यासाठीची बाजारपेठ कशी असावी याचा धडा त्यांना लहानवयातच मिळाला आणि त्या आधारे बाजारात जाऊन भाजीविक्रीसही त्यांनी सुरुवात केली.

श्रीपतराव बोंद्रे यांनी कळत्या वयात बाजारात प्रवेश केला. आपल्या शेतामध्ये पिकवलेली वांगी, कोबी, फ्लॉवर, भाजीपाला घेऊन कपिलतीर्थ मार्केटमध्ये जाऊ लागले. सकाळी चार वाजता उठायचे आणि दोन–तीन डालगी वांगी घेऊन मार्केटमध्ये जायचे. त्याकाळी वाहतूक करण्यासाठीची साधने त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. त्यामुळे डालगी डोक्यावरून न्यायला लागायची. वयाचा आणि शरीरयष्टीचा विचार केला तर हे खूपच कष्टाचे काम होते. पण श्रीपतरावांनी कधी आळस केला नाही. ते स्वतः बाजारात बसायचे आणि आपला माल विकायचे. स्वतः पिकवलेले पीक स्वतःच विकल्यामुळे त्यांना फायदा होत असे. एकतर त्यांनी पिकविलेल्या या भाज्यांची प्रतवारी खूपच उच्च दर्जाची ! त्यामुळे त्यांच्या मालाचा उठाव लगेचच व्हायचा. यामुळे वडील शंकरराव आणि आई कृष्णाबाईंना आपल्या मुलाचे खूपच कौतुक वाटायचे. मालाची विक्री झाल्यानंतर श्रीपतराव घरी येऊन सर्व पैसे आईकडे द्यायचे. मुलाची ही वृत्ती पाहून आईवडिलांना खूप समाधान वाटायचे. इतर मुलांच्या तुलनेत श्रीपतरावांचे वागणे खूपच वेगळे होते. पैसे हातात आहेत म्हटल्याबरोबर कुमार्गावर जाणे सहज शक्य होते. पण कुमार्गाचा आणि वाईट संगतीचा विचारही कधी श्रीपतरावांच्या मनाला शिवला नाही.

श्रीपतरावांच्या जीवनात आईवडिलांचे स्थान सर्वोच्च राहिले. आईने त्यांना श्रमाबरोबर नैतिकतेचा आदर्श घालून दिला तर वडिलांनी समाजात वावरताना आपली वर्तणूक कशी असावी याचे धडे घालून दिले. शंकररावांना शिक्षणाची आवड होती. त्यामुळे त्यांनी श्रीपतरावांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. पण त्याचबरोबर गल्लीतील मुलांनाही शिक्षणाची गोडी लावली. विशेषतः अंकगणितावर त्यांचा भर असायचा. व्यवहारातील चातुर्य आत्मसात करायचे असेल तर गणित यायलाच हवे असा त्यांचा आग्रह होता. श्रीपतरावांना पारंपरिक शिक्षण फारसे घेता आले नसले तरी वडिलांच्या सान्निध्यात जीवनाचे व्यावहारिक धडे मिळाले. त्यामुळे कोणत्याही गोष्टीवर लक्ष केंद्रित करताना त्यांची चौकसवृत्ती दिसून यायची. आंधळेपणाने कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवण्याऐवजी त्या गोष्टीचे मर्म तपासून पाहण्याचा चौकसपणा त्यांनी आपल्या वडिलांकडून घेतला. एकाअर्थी शाळेतील शिक्षणापेक्षा समाजातील शिक्षणच श्रीपतरावांनी अधिक घेतले आणि त्या संबंधातले त्यांचे गुरू त्यांचे वडील शंकरराव बोंद्रे हेच होते.

वडिलांचे सान्निध्य आणि अनुभवसिद्ध सहवास यामुळे श्रीपतराव घडत होते. वडील हा श्रीपतरावांचा आधार आणि आदर्श होता. वयाच्या ११ व्या वर्षापर्यंत सभोवतालचे जग वडिलांच्या नजरेने त्यांनी पाहिले होते. पण नियतीने शंकररावांना फार वेळ दिला नाही. डॉक्टरांचे सातत्यपूर्ण उपचार चालू असतानाही त्यांची तब्येत ढासळत होती. आपण फार काळ टिकणार नाही याची जाणीव शंकररावांना झाली होती. एके दिवशी त्यांनी श्रीपतरावांना बरोबर घेतले आणि सराफकट्ट्यावर येऊन सात हजाराचे सोने विकले. ते पैसे घेऊन पाध्ये–केळकरांच्या दवाखान्याचे बिल भागवले. तसेच आणखी काही लोकांचे किरकोळ देणं होतं तेही भागवले. या काळात शंकरराव जणू निर्वाणीचे बोलणे आणि वागणे करीत होते. श्रीपतराव भांबावले. त्यांना काय करावे सुचत नव्हते. अशातच नागपंचमीच्या आदल्या रात्री शंकररावांनी श्रीपतरावांना जवळ बोलावले आणि 'भावंडांना मुलाप्रमाणे जप' असे सांगितले. अकरा वर्षाच्या श्रीपतीला काही सुचेनासे झाले. रात्र कशीबशी पार पडली आणि नागपंचमी दिवशी १९३१ साली शंकररावांनी इहलोकीची यात्रा संपवली. श्रीपतरावांचा आधार सुटला. श्रीपतराव वयाच्या अकराव्या वर्षी घरातील कर्ते पुरुष आणि त्या क्षणापासून आयुष्याच्या अखेरपर्यंत बोंद्रे घराण्याचे पोशिंदा बनले.

आजी भागिरथीबाई आणि वडील शंकरराव यांच्या मृत्यूनंतर श्रीपतरावांनी आईला खूप आधार दिला. या काळात त्यांचे चुलते बाळा बोंद्रे अधूनमधून यायचे आणि धीर द्यायचे. त्यांनीच एक दिवस श्रीपतरावाहना शिक्षण पूर्ण करण्याचा सल्ला दिला. काहीसे आढेवेढे घेत आईनेही परवानगी दिली आणि दोन–तीन वर्षांच्या खंडानंतर श्रीपतराव पुन्हा शाळेत जाऊ लागले. दिवसभर शेती, घरकाम व रात्रीच्या वेळी शाळा असा त्यांचा दिनक्रम सुरू होता. चौथी, पाचवी, सहावी झाली. पण सातवीत मात्र त्यांना अडचण आली. ते दोनदा नापास झाले. पण तिसऱ्या वेळी त्यांनी चिकाटीने अभ्यास केला आणि १९३९ साली धारवाड बोर्डाची व्हर्नाक्लिअर फायनल (इ. सातवीची) परीक्षा पास झाले.[3] श्रीपतरावांनी परिश्रम करून सातवीपर्यंतचे यश मिळविले आणि आईला मदत करण्यासाठी पुढील शिक्षणाला पूर्णविराम दिला. तिसरीत बंद पडलेले शिक्षण पुन्हा सुरू करून पूर्ण करण्याची जिद्द श्रीपतरावांनी दाखवली. लहानपणीची ही जिद्द पुढील काळातही अनेक प्रसंगांतून अनुभवता येते.

श्रीपतरावांवर लहान वयातच मोठी जबाबदारी पडली. वडिलांच्या मृत्यूनंतर तर संपूर्ण कुटुंबाचा भार कळत नकळतपणे त्यांच्या खांद्यावर आला. या काळात चुलते बाळा बोंद्रे यांचे मार्गदर्शन आणि आधार महत्त्वपूर्ण ठरला. बाळा बोंद्रे धार्मिक वृत्तीचे होते. भजन, कीर्तन आणि प्रवचनात रमणाऱ्या त्यांच्या वृत्तीचा श्रीपतरावांवर प्रभाव होता. संतांच्या कवनांनी त्यांचे जीवन समृद्ध बनले, पण त्याचबरोबर श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांतील सीमा कशी ओळखायची याचे

भानही श्रीपतरावांना येत होते. याच काळात सार्वजनिक जीवनात अत्यंत उच्च दर्जाच्या नीतीमूल्यांचा अंगीकार करणाऱ्या बाळा बोंद्रेनी तरुणपणीच्या श्रीपतरावांवर आपल्या व्यक्तित्वाचा ठसा उमटविला. पण तरुणपणीच्या या कर्तृत्व घडवणुकीच्या काळातच बाळा बोंद्रेंची साथ सुटली. श्रीपतराव खिन्न झाले. या काळात मर्दानी खेळाच्या आखाड्यातील वरिष्ठांनी त्यांना साथ दिली. दुःखातून बाहेर येण्यासाठी मदत केली. श्रीपतराव लवकरच सावरले. त्यांनी शेती आणि घरकामाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. घरातील मोठी व्यक्ती या नात्याने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली. याच काळात श्रीपतराव 'दादा' बनले.

येथपर्यंत येईतो धकाधकीच्या जीवनाची पहिली एकवीस वर्षे पूर्ण झाली. आजोबा रामजी, वडील शंकरराव, आजी भागिरथीबाई यांच्याबरोबर बाळा बोंद्रे यांची साथ सुटली होती. त्या काळात एकवीस हे वय लग्नाचेच नव्हे तर लग्नकाळ उलटून जाण्याचे. आई कृष्णाबाईंना सून पाहण्याचे वेध लागले होते. श्रीपतरावांनीही फारसे आढेवेढे घेतले नाहीत. जीवनाच्या प्रवासात आईने सोसलेले, भोगलेले दुःख त्यांनी जवळून पाहिले होते. तिने स्वकष्टाने संसार उभा केला होता. आता तिचा भार हलका व्हावा हा हेतू श्रीपतरावांनी मनात ठेवून हुपरी, ता. हातकणंगले येथील बाळासाहेब नाईक यांच्या 'आनंदीबाई'शी विवाह केला. सुस्वरूप, सद्गुणी सून घरात आली. जीवनाच्या नव्या वाटेवर श्रीपतरावांना साथ लाभली आणि श्रीपतरावदादांचे कौटुंबिक जीवन सुरू झाले.

**घरच्यांचे पाठबळ**

श्रीपतरावदादा बोंद्रे यांच्या घराण्याचा इतिहास आणि परंपरा लक्षात घेतली तर त्यांना राजकारणाचा वारसा नव्हता. ही बाब स्पष्टपणे लक्षात येते. पण त्यांचे वडील, आजोबा, आजी यांच्यामध्ये सामाजिक जाणीव आणि बांधिलकी मानण्याची वृत्ती होती. श्रीपतरावदादा राजकारणाच्या पहिल्या टप्प्यावर असताना घरातील अन्य कोणी या क्षेत्रात नव्हते पण दादा मात्र आंतरिक ओढीने या क्षेत्राकडे ओढले गेले. साधारणपणे विधानसभेच्या निवडणुकीच्या दरम्यान दादांच्या राजकीय जीवनात त्यांच्या लहान बंधूंचा महिपतरावांचा प्रवेश झाला. महिपतराव सर्वात धाकटे. पण पहिल्या निवडणुकीपासून त्यांनी दादांबरोबर सावलीसारखी साथ केली. आज जेव्हा पाठीमागे वळून पाहिले जाते तेव्हा श्रीपतराव बोंद्रेंच्या राजकारणाचा कणा म्हणूनच महिपतराव बोंद्रेंचा उल्लेख होतो. हा आधार श्रीपतरावांसाठी मानसिकदृष्ट्या खूपच महत्त्वाचा ठरला. एका विशिष्ट काळानंतर दादांनी घरातून लक्ष काढले आणि सार्वजनिक जीवनात उडी घेतली. अशा वेळी घर आणि राजकीय पाठराखण अशा दोन्ही पातळ्यांवर महिपतरावांची मोलाची साथ श्रीपतरावांना झाली.

आजच्या राजकारणाचे स्वरूप पाहिल्यानंतर श्रीपतराव–महिपतराव या बंधूंचा उल्लेख 'राम–लक्ष्मण' का होत असावा याचा उलगडा होतो. असे म्हटले जाते की जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात लौकिक मिळवायचा असेल तर आपले घर म्हणजे आपली माणसं आपल्याबरोबर असायला हवीत. ती मनापासून साथीला नसतील तर लढाई करता येते पण त्यात यश मिळेलच असे मात्र होत नाही. श्रीपतरावांच्या बाबतीत ही बाब खूपच भाग्याची ठरली की त्यांना घरची साथ मिळाली. केवळ साथच नव्हे तर त्यांच्या बंधूने सार्वजनिक जीवनातील खूप मोठा भाग व्यापला. एकाअर्थी श्रीपतरावांना करियर करण्यासाठीची दारे मुक्तपणे उघडून देण्यात महिपतरावांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले.

श्रीपतराव बोंद्रे राजकीय क्षेत्रामध्ये चमकत असताना संपूर्ण मतदार संघ सांभाळण्याचे काम महिपतराव करीत असत. आज जुनीजाणती मंडळी सांगतात की, 'दादांपेक्षा आम्ही पापांकडूनच अधिक काम करून घेत असू'. ही बोलकी प्रतिक्रिया आहे. कारण शहराबरोबर ग्रामीण भागाशी महिपतरावांचा घनिष्ठ संबंध होता. शेतकरी कुटुंबात वाढलेले, रांगड्या आणि बेडर स्वभावाच्या महिपतरावांमध्ये माणसं हाताळण्याची विलक्षण क्षमता आहे. लोकांशी सहजपणे संवाद साधताना त्यांना मानसिक आधार देण्यात ते कमालीचे यशस्वी होत. कधी प्रेमाने तर कधी रागाने त्यांनी माणसांच्या व्यथा सोडविल्या. दैनंदिन जीवनातील अडीअडचणींना सामोरे जाताना अशा माणसांना धीर दिला. त्यामुळे आजही महिपतराव बोंद्रे यांचा शब्द प्रमाण मानणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. खेड्यातील लोकांशी चर्चा करताना काही जुनी, वृद्ध माणसं कधी कौतुकाने तर कधी गमतीने 'दादांपेक्षा पापाच आमचे आमदार होते' असे म्हणतात त्यावेळी महिपतरावांनी कशा तऱ्हेने श्रीपतरावांची पाठराखण केली असेल याची कल्पना येते. शाहू बोर्डिंग, जनता कंझ्युमर्स याठिकाणी चर्चा सुरू असताना किंवा दादा एखादा निर्णय घेत असताना 'महिपाला विचारा. महिपा काय म्हणतोय, महिपाला सांगा' असे म्हणायचे. एकाअर्थी महिपतराव बोंद्रे यांचे अस्तित्व श्रीपतराव बोंद्रे यांच्या आजूबाजूला व्यापून राहिलेले असायचे. हे अस्तित्व प्रसिद्धीच्या व्यासपीठावर कधी आले नाही, वृत्तपत्रातून फारसे झळकले नाही. सभासमारंभातून कधी बोलले नाही किंवा स्वतःहून लोकांसमोर आत्मप्रौढीने साकारले नाही. पण जेव्हा जेव्हा श्रीपतराव बोंद्रे यांच्या सामाजिक जीवनाचा, राजकीय वाटचालीचा उल्लेख होईल तेव्हा तेव्हा महिपतराव बोंद्रे हे नाव आवर्जून घ्यावे लागेल. कारण या सर्व प्रवासाचा महत्त्वपूर्ण वाटाड्या म्हणूनच त्यांच्याकडे पहायला हवे.

साधारणपणे १९८० च्या दशकात श्रीपतरावदादांचे थोरले जावई पी. एन. पाटील, सडोलीकर यांनी आपल्या राजकीय उमेदवारीला काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सुरुवात केली. त्या पुढील काळात दादांचे थोरले चिरंजीव सुभाष उर्फ चंद्रकांत बोंद्रे यांनी राजकारणाच्या

पटलावर पाऊल ठेवले.  दादांच्या निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने या दोघांचाही वावर असायचा. पुढील काळात चंद्रकांत बोंद्रे आणि पी. एन. पाटील यांनी आपले स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण केले. चंद्रकांत बोंद्रे गोकुळचे संचालक झाले तर पी. एन. पाटील, सडोलीकर यांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून सहकाराबरोबरच राजकीय क्षेत्रातही आपला पाया भक्कम केला. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेत आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले.  आज ते कोल्हापूर जिल्हा काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदाची धुरा तेरा वर्षांहून अधिक काळ सांभाळत आहेत. या दोघांच्या माध्यमातून श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या राजकारणाला पुढील टप्प्यात प्रवेश मिळाला. त्यांचे विचार आणि कृतीचा वारसा चालवण्यात या दोघांचाही महत्त्वपूर्ण वाटा आहे.

**सन्मान**

दादांच्या दीर्घ अशा राजकीय आणि सामाजिक वाटचालीचा गौरव वेळोवेळी झाला. १९८१ साली षष्ट्यब्दीपूर्तीच्या निमित्ताने कै. यशवंतराव चव्हाणसाहेब, मान. शरद पवारसाहेब यांच्या उपस्थितीत भव्य असा सर्वपक्षीय सत्कार करण्यात आला.[४] सन २००० साली दादांचा अमृत महोत्सव तत्कालीन मुख्यमंत्री मान. नाम. विलासरावजी देशमुखसाहेब यांच्या उपस्थितीत पार पडला. याच वर्षी कोल्हापूर महानगरपालिकेने दादांनी कोल्हापूर शहराच्या विकासासाठी दिलेल्या योगदानासंदर्भातील कृतज्ञता मानपत्र देऊन व्यक्त केली.

माणूस जसा असतो तसाच तो त्याच्या कृतीतून दिसतो असे म्हटले जाते. श्रीपतराव बोंद्रे यांनी आपल्या विचार, संस्कारांतून हे दाखवून दिले, पण त्याचबरोबर पुढील पिढीपुढे वारसा ठेवताना संपूर्ण समाजाला ललामभूत ठरलेल्या व्यक्तीचा आदर्श नजरेसमोर रहावा याची दक्षता घेतली. ही त्यांची कृती आंतरिक जाणिवेतून झालेली आहे. ज्यांनी माणुसकीचा इतिहास पुढे नेला त्यांची नावे त्यांच्या समोर होती. केवळ नाव द्यायचे म्हणून ते त्यांनी दिले नाही तर त्या नावामागे असणारा विचार आणि कृतीचा इतिहास लोकांसमोर यावा ही त्यांची भूमिका प्रकर्षाने जाणवते. नवी पिढी जेव्हा नवी क्षितिजे पार करू पाहत असेल त्यावेळी जुन्या पिढीतील या लोकांनी रचलेला पाया त्यांच्या लक्षात असावा हीच भावना श्रीपतरावदादा बोंद्रे यांची असणार असे निश्चितपणे म्हणता येते.

कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रेदादा यांची जडणघडण अशी झाली. घरातल्यांच्या संस्कार शिदोरीवर निस्सीम विश्वास ठेवणाऱ्या दादांनी जिद्द, परिश्रम, चिकाटी या गुणांनी आपल्या आयुष्याची उभारणी केली. लहानपणापासून सर्वसामान्य माणसांचा सहवास त्यांना लाभला. या माणसांची सुखदुःखे त्यांनी आपली मानली. राजकीय जीवनात यशस्वी होत असतानाही सर्वसामान्य माणसांशी त्यांचे असणारे आत्मीयतेचे नाते टिकून राहिले. सर्वसामान्य माणसे हीच

आपली संपत्ती आहे याची जाणीव दादांच्या मनात कायमपणे राहिली. एकाअर्थी त्यांच्या सहवासात आलेल्या आणि त्यांनी ज्या माणसांचे नेतृत्व केले त्या सर्व माणसांच्या जीवनातील त्यांचे स्थान ‘दादा’ म्हणजे कर्ता माणूस, मोठा भाऊ असेच राहिले. जीवनाच्या दीर्घ वाटचालीतील दादांनी कमवलेले हे संचित कधीही न संपणारे असेच आहे.

**कृतार्थ जीवनाची अखेर**

दादांच्या आयुष्याचा पट जवळजवळ ऐंशी वर्षाचा. या काळातील साठ वर्षे त्यांनी सार्वजनिक जीवनात व्यतीत केली. सामान्य कुटुंबात जन्मलेल्या दादांनी स्वकर्तृत्वाने यशाची अनेक शिखरे पार केली. शेतकरी ते महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील मंत्री हा सर्व प्रवास लक्षवेधी आणि धगधगता आहे. या काळात अनेक घटना घडल्या. विविध प्रसंगांना सामोरे जाताना कितीतरी कसोटीचे क्षण आले. पण दादांनी प्रत्येक प्रसंगाला अत्यंत धीराने, हिंमतीने तोंड दिले. कुठेही कच खाल्ली नाही. येणारे संकट आपली परीक्षा घ्यायला येते. अशा वेळी परमेश्वरावर श्रद्धा ठेवायची आणि आपले कार्य करीत राहायचे अशी वृत्ती त्यांनी बाळगली. त्यामुळेच दादा नेहमीच स्थितप्रज्ञतेने वागत राहिले. सत्तेची पदे त्यांच्याकडे चालून आली. त्यांचा जनकल्याणासाठी त्यांनी वापर केला. पण हे करताना सामान्य माणसांशी असणारी आपली नाळ कधीही तुटणार नाही याची काळजी घेतली. जोपर्यंत लोकांचे प्रेम आहे तोपर्यंत आपण काम करीत राहायचे असे त्यांनी ठरवले आणि त्यामध्ये कधीही खंड पडला नाही.

कै. दादांच्या आयुष्यात १९८५ चा पराभव खूप काही शिकवणारा ठरला. लोकमत असतानाही अगदी थोड्या मतांनी त्यांचा पराभव झाला. पण या पराभवाने खचून न जाता त्यांनी लोकसंपर्क वाढवला. प्रत्येक गावातील नेते, कार्यकर्ते आपलेसे केले. ज्यांनी विरोधात काम केले होते त्यांना विश्वासात घेऊन त्यांची नाराजी दूर केली. सर्वसामान्यांच्या सुखदुःखात सहभागी होत लोकांनाच पुनर्विचार करण्यास प्रवृत्त केले आणि याचा परिणाम १९९० च्या निवडणुकीत दिसून आला. प्रचंड मताधिक्याने त्यांनी विजयश्री खेचून घेतली. ज्या लोकांनी नाकारले होते त्यांनीच पुन्हा एकदा दादांना खांद्यावर घेतले. या विजयाने दादा अगदी कृतकृत्य झाले. लोकांच्या प्रेमाने आपण अगदी भरून पावलो अशी त्यांची वृत्ती बनली होती.

साधारण १९९४-९५ चा काळ. दादांच्या वाट्याला ७५ वर्षे होत आली होती. दीर्घकाळ समाजकारण आणि राजकारणात वावरलेल्या दादांनी स्वतःहून काही निर्णय घेतले. विशेषतः सक्रिय राजकारणातून अलिप्त होण्याचा निर्णय याच काळात त्यांनी घेतला. विद्यमान आमदार असतानाही त्यांनी निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर राहून एक नवा आदर्श लोकांसमोर ठेवला. दादांनी सत्तेला कधीही समाजकारणाचे साधन मानले नाही. त्यामुळे राजकारणातून अलिप्त होतानाही त्यांची स्थितप्रज्ञता आदर्शवत राहिली. पक्षातील इतरांसाठी जागा मोकळी

करून देण्याचा मनाचा मोठेपणा दादांनी दाखविला. आजच्या राजकारणाचे स्वरूप पाहिले तर दादांची ही कृती म्हणजे ‘जगावेगळी’ न वाटली तरच नवल!

दादांचे वास्तव्य फुलेवाडी परिसरातच राहिले. आयुष्याच्या अखेरच्या काळात त्यांच्या मनात अनेक विचार येत असत. कधीतरी ते बोलायचे. वयाचा परिणामही जाणवू लागला होता. कानाने ऐकायला कमी यायचे. काही काही गोष्टी आठवायच्या नाहीत. पण थोडीशी माहिती दिली की बोलू लागायचे. पण एक मात्र शेवटपर्यंत घडत होते ते म्हणजे संध्याकाळच्या वेळी त्यांचे दत्त मंगल कार्यालयाच्या हिरवळीवरील फिरणे! एका हातात काठी आणि अतिशय हळू पण डौलदारपणे ते चालायचे.... दादांचा हा प्रवास ऐंशी वर्षे चालू राहिला. अखेरच्या काळात त्यांना दवाखान्यात दाखल करण्यात आले. शेकडो नव्हे हजारो माणसं त्यांच्यासाठी प्रार्थना करीत असत. पण ... दैवाने डाव साधला. ३० सप्टेंबर २००० रोजी दादांनी अखेरचा श्वास घेतला.[५] लोकांच्या उन्नतीसाठी झटणारा, गोरगरीब मुला-मुलींसाठी शिक्षण मिळायला हवे असा ध्यास धरणारा लोकनायक काळाच्या पडद्याआड गेला. एका समर्पित जीवनाची सांगता झाली.

**संदर्भ सूची**

१) डॉ. शानेदिवाण आर. के., भूमिपुत्र, सोनिया प्रकाशन, कोल्हापूर, २०१२, पृ. १७.

२) तत्रैव, पृ. १९.

३) तत्रैव, पृ. २५.

४) श्रीपतराव बोंद्रे षष्ट्यब्दिपूर्ती विशेषांक, १९८१.

५) दै. पुढारी, दि. १ ऑक्टोबर २०००.

## प्रकरण दुसरे

## श्रीपतराव बोंद्रे : व्यक्तित्त्व विशेष

श्रीपतराव शंकरराव बोंद्रे यांनी वयाच्या पंधराव्या वर्षापासून सार्वजनिक जीवनातील आपला वावर ठेवल्याचे त्यांच्या संदर्भातील उपलब्ध कागदपत्रांवरून दिसते. ऐन विशीत असताना त्यांनी सामाजिक कार्यामध्ये रस घेतला. स्वाभाविकपणे आयुष्याच्या साठ वर्षाच्या सार्वजनिक जीवनामध्ये त्यांनी अनेक संस्था जशा उभ्या केल्या तसेच अनेक व्यक्तींच्या आयुष्याला उभं करण्यामध्ये त्यांचा मोठा हातभार होता. स्वाभाविकपणे इतके दिर्घकाळ समाजजीवनात वावरत असणारे श्रीपतराव बोंद्रेदादा यांचे व्यक्तित्व अनेक अंगांनी बहरले होते. त्याचा परिचय सामान्यपणे पुढील मुद्यांच्या आधारे करून घेता येईल.

**काँग्रेस विचार हाच राजकारणाचा पाया**

श्रीपतराव बोंद्रे यांच्या राजकारणाचा पाया काँग्रेस विचार हाच राहिला. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसने स्वातंत्र्य लढ्याचे वैचारिक नेतृत्व केले आणि हे करीत असताना माणसाच्या स्वातंत्र्य, समता आणि लोकशाही व्यवस्थेला प्राधान्य दिले. काँग्रेसचे संघटन जरी स्वातंत्र्याच्या हेतूने उभे राहिले असले तरी त्यामागे मानवतेचा विचार होता. स्वाभाविकपणे या विचारांची मांडणी सर्व थरातून स्वीकारली गेली. स्वातंत्र्य तर मिळवायचे पण त्यासाठीची विचारप्रणाली वेगवेगळ्या अंगानी कार्यरत राहिली. श्रीपतराव बोंद्रे यांनी समता आणि मानवतेला प्राधान्य देणारा मार्ग स्वीकारला. जोतिबा फुले, राजर्षि शाहू किंवा विठ्ठल रामजी शिंदे यांना एका विशिष्ट पक्षाचे लेबल नव्हते पण त्यांनी समता, समानतेवर भर देताना समाजातील दीन–दलितांना न्याय देण्याची भूमिका घेतली. स्वातंत्र्य तर हवेच पण त्याहीपेक्षा माणसाला माणूस म्हणून सर्वप्रथम मान्यता मिळायला हवी हा विचार या महनीय सुधारकांनी दिला. राजकीय व्यासपीठावरून हाच विचार महात्मा गांधी, पंडित नेहरू, डॉ. आंबेडकर, यशवंतराव चव्हाण यांनी मांडला. पुढील काळात यामध्ये शरद पवारांचा समावेश झाला. हे उल्लेखलेले वरील नेते काँग्रेसमध्येच काम करीत होते. स्वाभाविकपणे फुले, शाहूंचा विचार पुढे नेणारी विचारसरणी म्हणून श्रीपतरावांनी काँग्रेसची कास धरली. आपल्या मनातील समाजपरिवर्तनाची दिशा या अंगाने आपण पूर्णत्वास नेऊ शकू याची खात्री त्यांच्या मनात प्रबळ होती.

श्रीपतरावदादा काँग्रेसनिष्ठेवर शेवटपर्यंत ठाम राहिले. आपल्या विचारांमध्ये कधीही बेबनाव येऊ नये याची त्यांनी दक्षता घेतली. याचा परिणाम त्यांच्यावर निष्ठा आणि विश्वास ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांवरही झाला. आपला नेता माणुसकीचे नाते मानणारा असून हे नाते कधीही भ्रष्ट होणार नाही याची खात्रीच जणू त्यांच्या संदर्भात आपुलकीची भावना ठेवणाऱ्यांमध्ये होती. एकाअर्थी या संदर्भातील दादा आणि कार्यकर्त्यांचे संबंध परस्पर पूरक म्हणूनच दीर्घकाळ

टिकणारे ठरले. काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात माणसांच्या मनात एक विश्वास जागवला. हा विश्वास आपल्या कृतीतून जाणवून देणारा राजकीय नेता म्हणूनच श्रीपतराव बोंद्रे यांचा उल्लेख होतो. म्हणूनच आयुष्याच्या अखेरपर्यंत काँग्रेसच्या विचारांचा पाईक अशीच त्यांची ओळख राहिली.

## नेत्यांप्रती प्रखर निष्ठा

श्रीपतराव बोंद्रे यांची पक्षनिष्ठा वादातीत होती. त्याचबरोबर नेत्यांवरील निष्ठा आणि विश्वास लक्षणीय होता. गुरुशिष्याची परंपरा राजकारणामध्ये असते यावर विश्वास नसणाऱ्या माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनाच श्रीपतराव आपले राजकीय गुरू मानत. आजच्या काळातही बरीचशी मंडळी गुरू-शिष्याचे नाते सांगून परस्परसंबंधीचा विश्वास दाखवून देण्याचा प्रयत्न करतात. पण ही नाती किती तकलादू विचारांवर बेतलेली आहेत किंवा असतात याची कितीतरी उदाहरणे महाराष्ट्राने पाहिली आहेत. स्वतःच्या स्वार्थासाठी गुरूची अवहेलना हा तर नित्याचाच भाग बनला आहे. श्रीपतराव बोंद्रे मात्र याला सन्माननीय अपवाद ठरले. त्यांनी यशवंतराव चव्हाणांवर निष्ठाच नव्हे तर भक्ती ठेवली. जसा एखादा भक्त आपल्या परमेश्वरावर श्रद्धा ठेवतो आणि त्या श्रद्धेमध्येच आपले जीवन शोधतो तसाच काहीसा प्रकार श्रीपतरावांचा होता. साधारणपणे पन्नासच्या दशकात त्यांचा यशवंतरावांशी संबंध आला. पार्लमेंटरी सेक्रेटरी असताना एका कामाच्या निमित्ताने ते दोघे एकत्र आले आणि यशवंतरावजी चव्हाणांच्या अखेरच्या क्षणापर्यंत जोडले गेले. पुढील काळात तर त्यांच्या नावाने त्यांनी विविध संस्थांची उभारणी करून आपल्या मनातील भावनांना मूर्तरूप दिले.

आज राजकारणात 'निष्ठा' हा शब्द चेष्टेच्या सुरात उच्चारला जातो. अर्थात त्याची कारणेही तशीच आहेत. पण श्रीपतरावांनी निष्ठेचा अर्थ आपल्या वर्तनातून दाखवून दिला. या संदर्भातील १९६२ व १९६७ च्या निवडणुकीतील परिस्थिती खूपच बोलकी आहे. यशवंतरावांच्या सांगण्यावरून श्रीपतरावांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला आणि जोपर्यंत यशवंतराव सांगत नाहीत तोपर्यंत पुन्हा उमेदवारी अर्ज भरला नाही. हा प्रसंग पन्नास वर्षांपूर्वीचा. आजच्या काळात दुर्मीळ वाटणारा. पण ही घटना श्रीपतरावांच्या संदर्भातच घडली. आपला नेता आपल्यावर निस्सीम प्रेम करतो आणि त्यांचे मोठेपण सांभाळणे ही आपली जबाबदारी नव्हे तर कर्तव्यच आहे असे श्रीपतराव मानत. त्यामुळे यशवंतरावांशी संवाद करताना त्यांनी नकारात्मक भूमिका कधीच घेतली नाही. माझे नेते मला चुकीचा मार्ग सांगणार नाहीत ही श्रद्धा श्रीपतरावांनी जपली. त्यामुळेच यशवंतराव चव्हाणांइतके आत्मिक प्रेम आणि जिव्हाळा त्यांनी क्वचितच अन्य कोणाबद्दल बाळगला. त्यामुळेच यशवंतरावांच्या मृत्यूनंतरही त्यांचा उल्लेख करताना दादा नेहमीच 'साहेब' असाच करायचे. हा शब्द त्यांनी इतरांसाठी क्वचितच वापरला.

श्रीपतराव बोंद्रे यांच्यावरील यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवत रहायचा. यशवंतरावांनी लोकशाहीला सर्वाधिक महत्त्व दिले. त्यांच्या मतानुसार सरकार लोकांसाठी असते आणि लोकांच्या हिताचे निर्णय न घेता केवळ नियमांच्या चौकटीत राहून राज्यकारभार केला तर त्याचा सामान्य माणसाला फारसा फायदा होणार नाही. त्यामुळे प्रसंगी नियमांना मुरड घालून एखादा निर्णय घ्यावा लागला तर घ्यायला हवा अशी त्यांची भूमिका असायची. श्रीपतराव बोंद्रे यांनीही जनतेच्या हिताचे राजकारण करताना नियमांचे अवडंबर फारसे माजवले नाही. 'मला लोकांची कामे करायची आहेत त्यासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया तुम्ही राबवा' अशी सुरुवातच ते अधिकाऱ्यांसमोर करीत. अधिकाऱ्यांनी आपल्यासमोर येताना प्रश्नांची सोडवणूक कशी करायची याची आखणी घेऊन यावे असा अलिखित आदेशच श्रीपतरावदादांचा असायचा. त्यामुळे आमदार आणि मंत्री अशा दोन्हीही काळात त्यांचा एकूणच प्रशासनावर वचक होता. सरकार केवळ लोकांचे असून चालत नाही तर लोकांना ते आपले वाटायला पाहिजे हा यशवंतरावांचा दृष्टिकोण श्रीपतरावदादांनी अंगी बाणवला होता.

श्रीपतराव बोंद्रे यांनी यशवंतराव चव्हाणांवर असीम श्रद्धा ठेवली. चव्हाण साहेबांनीही त्यांना मनापासून प्रेम दिले. यासंदर्भात एका घटनेचा उल्लेख करावासा वाटतो. कोल्हापूर जिल्हा बँकेच्या चेअरमनपदाचा वाद बराच गाजत होता. श्रीपतरावदादा त्यावेळी बँकेचे संचालक होते. त्या काळात पक्षशिस्त, पक्षनिष्ठा या बाबी हळूहळू रुजत होत्या. पण त्याचा पगडा निश्चितपणे होता. अशा वेळी श्रीपतरावदादांनी पक्षविरोधी भूमिका घेतल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. याची दखल प्रदेश पातळीवर घेण्यात येऊन श्रीपतरावांचे पक्षसदस्यत्व रद्द करायचा प्रस्ताव सादर झाला. या बैठकीला यशवंतराव चव्हाण होते. त्यांनी श्रीपतरावांविरोधी असलेला हा ठराव स्पष्टपणे फेटाळून तर लावलाच पण त्याही पुढे जाऊन 'श्रीपतरावांचे सदस्यत्व रद्द करणार असाल तर प्रथम मला काँग्रेसमधून काढून टाका'[१] असे सांगितले. अशी श्रीपतरावदादांची पाठराखण यशवंतरावांनी कायमपणे केली.

कोल्हापूरच्या भावनिक प्रश्नांच्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण यांना 'कोल्हापूर बंद' केले होते. श्रीपतरावांना ही बाब खूपच सलत होती. आपल्या नेत्यासंदर्भात असे व्हावे ही खंत त्यांच्या मनात खोलवर रुतलेली होती. विरोधकांनी लोकभावना भडकावत ठेवून या प्रश्नाच्या अनुषंगाने यशवंतरावांना कोंडीत पकडले होते. पण श्रीपतरावांनी ही कोंडी फोडली आणि करवीरनगरीत 'न भूतो न भविष्यती' असे स्वागत घडवून आणले. त्या काळातील एकूण परिस्थिती खूपच स्फोटक होती. विरोधकांनी तर श्रीपतरावांवर दादागिरी, धाकधपटशा, गुंडगिरी केली असे आक्षेप घेतले. पण श्रीपतराव बधले नाहीत. श्रीपतरावांनी गुंडांची फौज जमा केली असून कोल्हापूरला वेठीस धरले असल्याची भावनाही त्या काळात व्यक्त झाली. यशवंतरावांच्या कानावर या सर्व गोष्टी जात होत्या. आपला चेला वाईट काही करणार नाही

याची खात्री असणाऱ्या यशवंतरावांनी तर 'श्रीपतराव गुंड असतील तर मला गुंडांचा सरदार म्हणवून घेण्यात आनंद वाटेल'[२] असे सांगून त्यांच्या कर्तृत्वावर जणू शाबासकीची थाप मारली होती.

**कार्यकर्त्यांचा प्रभावी संच**

श्रीपतराव बोंद्रे राजकारणामध्ये यशस्वी ठरले. त्यामध्ये त्यांच्या कार्यकर्त्यांचा असणारा सहभाग खूपच मोलाचा ठरला. कोणतेही राजकीय नेतृत्व त्यांच्या आजूबाजूला असणाऱ्या लहानमोठ्या कार्यकर्त्यांच्या बळावर उभं राहते. श्रीपतरावदादांना हा गोतावळा खूप आधीपासून लाभला. लहानपणी व्यवसायाच्या निमित्ताने अनेकांचा सहवास होताच, तो पुढे दृढ झाला. पण प्रत्यक्ष राजकारणामध्ये येईपर्यंत त्यांच्या सोबत अनेक मंडळी जमा झाली. याचे प्रत्यंतर अर्बन बँकेच्या पहिल्या निवडणुकीपासून येते. त्यावेळी कोणतीही निवडणूक असो, प्रचाराचा धुरळा असायचा. अर्बन बँकही मर्यादित आर्थिक उलाढाल करणारी बँक. पण दादांनी आपल्या मित्रांच्या साहाय्याने ही निवडणूक लीलया जिंकली. आयुष्याच्या उत्तरार्धात दादांनी या विजयाचा अनेकवेळा उल्लेख केला. कारण प्रत्यक्ष राजकारणाची सुरुवात होती आणि याच्या निकालावर पुढील दिशा ठरणार होती. स्वातंत्र्यपूर्व काळात जाती–पातीचे राजकारणही अधिक त्वेषाने व्हायचे. त्याचाही प्रभाव निवडणुकीच्या निकालावर पडायचा. पण श्रीपतरावदादांनी सर्व जातीधर्मातील कार्यकर्त्यांना आपलेसे केले. त्यांच्या जगण्याशी ते समरस झाले. काही नेते मंडळी इकडे–तिकडे गेली पण दादांशी त्यांची असणारी भावनिक नाळ मात्र शेवटपर्यंत टिकून राहिली.

दादांच्या राजकीय कारकिर्दीचा धांडोळा घेताना एक बाब लक्षात येते की त्यांनी सर्व थरातील कार्यकर्ते जमा केले. कोणत्याही जातीधर्माचा त्यांनी दुःसाह न केल्याने कार्यकर्त्यांची मोठी फळी आपसूकच तयार होत गेली. या कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्या जीवनाच्या घटनेचे साक्षीदार असणारे दीर्घकाळचे मित्र आणि सहकारी माजी महापौर द. न. कणेरकर, बी. के. पाटील (सोनाळी), पी. डी. पाटील (पाडळी बु।।), बाबासाहेब पाटील, (भुये), एस. आर. पाटील (पाडळी खुर्द), पां. वि. पाटील, वि. रा. भास्कर (कुडित्रे), नामदेवराव कांबळे (कुरुकली), आनंदराव पाटील, (चुये), खामकर गुरुजी (धामोड), बापूसाहेब वळके (निगवे दु।।) यांच्याबरोबरच मतदार संघातील अनेक नव्या दमाचे कार्यकर्ते त्यांच्या सोबत असायचे. या कार्यकर्त्यांसोबत असताना दादा निश्चिंत असत. यामध्ये हरी रामजी गायकवाड (वरणगे), बापूसाहेब पाटील (वरणगे), रामभाऊ पाटील (नेर्ली) आप्पू खोजगे (हलसवडे), बाळासाहेब खोत (सांगवडेवाडी), सुदाम पाटील (वसगडे), आवजी पाटील (कंदलगांव), गोविंदराव पौंडकर (पांचगांव), शामराव चौगुले (नंदगांव), शंकर माणकू पाटील (हिरवडे खा।।), शंकरराव साळोखे (कळंबा), बाबूराव सुर्यवंशी (कावणे), शिवा मास्तर (आमशी), बाजीराव मडके

(म्हारुळ), सदाशिव दिंडे (बहिरेश्वर), लहू बाटे, राणेमामा (बोलोली), सुबराव पाटील (शिरोली दु।।), एम. के. पाटील (हसुर), पांडुरंग पाटील (येळवडे), नारायणकाका (सडोली खा।।), तळेकरमामा (बाचणी), मनोहर मोहिते (आरे), आनंदराव भुजंगा पाटील (देवाळे), निवृत्ती गुंडू पाटील (हळदी), श्रीपतराव माने (केर्ली), श्रीपतराव पाटील (केर्ली), केरबा गोळे (केर्ले), वाय. डी. पाटील (खेबवडे), शंकर जंगम (दिंडनेर्ली), राजाराम पाटील (म्हाळुंगे), ज्ञानदेव पाटील (कुरुकली), तुकाराम चौगुले (कोगे), एस. वाय. पाटील (कणेरी), आबा पाटील (कणेरी), शंकरराव पाटील (राशिवडे बु।।), चंदर दौलत पाटील (दिंडनेर्ली), चंदर काळुगडे (दिंडनेर्ली), माधवराव कारंडे (बेले), गणपती बापू पाटील (परिते), दिनकरराव पाटील (भाटणवाडी), शिवाजीराव भोसले, शंकरराव भोसले, धुळाप्पा पाटील (कांचनवाडी), पंढरीनाथ सरनाईक (म्हालसवडे), पांडुरंग वीर (मांजरवाडी), रामजी पाटील (मांडरे), के. टी. पाटील, एम. डी. पाटील, बचाराम किल्लेदार (निगवे खा।।), महादजी पाटील (कावणे), माणिकराव वडींगेकर, कॅ. जाधव (खेबवडे), पांडुरंग चव्हाण, वसंतराव चव्हाण (द. वडगांव), ज्ञानदेव साळोखे (गिरगांव), बंडू नारायण पाटील (वडकशिवाले), महादेव आबा पाटील (कसबा बावडा), हिंदुराव पाटील (आरळे), ज्ञानू रामा पाटील (वाकरे), श्रीपतराव पाटील (भुयेवाडी), विश्वासराव नाईक (भुये), यशवंतराव जाधव, बाजीराव पाटील (शिये), पांडुरंग एकशिंगे (निगवे), लकुळा पाटील, जानबा कदम (चिंचवडे), तुकाराम पाटील (खुपीरे), बाबासाहेब खोत (हालसवडे), डॉ. चव्हाण (इस्पुर्ली), गंगाराम कांबळे (द. वडगांव), श्रीपतराव साळोखे (कोथळी), गणपतराव पाटील (देवाळे), राजाराम साळोखे (कुडित्रे), भगवानराव शेळके आदींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.[३] हे कार्यकर्ते दादांनी सोपवलेली जबाबदारी अतिशय निष्ठेने पार पाडत असत. ग्रामस्तरावरील अनेक निर्णय ही मंडळी स्वतःच घेत आणि दादांना त्याची माहिती देत. या कार्यकर्त्यांना विविध पदावर विराजमान करताना त्या त्या क्षेत्राची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपवल्याची परिस्थिती होती. त्यामुळे ग्रामीण स्तरावर एक सशक्त राजकीय टीम तयार झाली होती. याचा एक चांगला परिणाम असा झाला की, श्रीपतरावदादांना राज्यस्तरावर काम करण्यास पुरेपूर वेळ मिळाला आणि निवडणुकीच्या काळातही दादांना याचा खूप फायदा झाला.

शहरातही दादांच्यावर निष्ठा असणाऱ्या कार्यकर्त्यांची एक सक्षम फळी निर्माण झाली होती. यामध्ये कोल्हापूरचे पहिले महापौर बाबासाहेब कसबेकर, दिनकरराव पाटील, बाबूराव जाधव, बाबूराव पारखे, रामभाऊ दिवसे आदींचा समावेश होता. तर बाळ गायकवाड, तुकाराम टेलर, दादू पाटील, वसंतराव सिताराम मोहिते, सासने वस्ताद, विलासराव भोसले, ससे वस्ताद, आण्णाप्पा पाडळकर यांच्याशी त्यांचे मित्रत्वाचे संबंध होते. तसेच राष्ट्रीय तालीम संघ, बालगोपाल तालीम, सरदार तालीम संघाचा दादांच्या राजकीय व सामाजिक वाटचालीत महत्त्वपूर्ण सहभाग होता.

### कार्यकर्त्यांना सन्मान दिला

श्रीपतरावदादांनी करवीर आणि सांगरूळ या दोन मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. या काळात करवीर व राधानगरी भागात कार्यकर्त्यांचे जाळे उभे करण्यात त्यांनी रस घेतला. दादा आमदार होते त्या काळात आजच्याइतकी वाहतुकीची अथवा संपर्काची साधने उपलब्ध नव्हती. संपूर्णपणे कार्यकर्त्यांवर अवलंबून रहावे लागे. अशा वेळी त्यांची कार्यकर्त्यांची टीम उपयोगी पडायची. ही मंडळी आपापल्या भागात संपर्क साधून लोकांना मतदानासाठी प्रवृत्त करायची. याचा परिणामही दिसून यायचा. त्या काळात काँग्रेसचा विचार जनमाणसात रुजला होता. पक्षाचा कार्यक्रम आणि दादांचे व्यक्तिमत्त्व या दोहोंचा आधार घेत कार्यकर्ते लोकांमध्ये जात. या कार्यकर्त्यांचे दादांकडे 'वजन' असल्याची जाणीव लोकांमध्ये होती. त्यामुळे कार्यकर्त्यांनाही मान मिळत असे. स्वाभाविकपणे दादांबरोबर त्यांच्या टीमलाही सन्मान मिळे. दादांच्या यशात अशा नेते–कार्यकर्त्यांचा खूप मोठा सहभाग होता. १९६७ व १९७२ मध्ये दादांनी करवीर विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. १९७८ साली करवीर मतदार संघाचे विभाजन होऊन करवीर आणि सांगरूळ असे दोन मतदार संघ तयार झाले. या निवडणुकीमध्ये दादांनी सांगरूळ मतदार संघातून निवडणूक लढविण्याचे ठरविले आणि ते निवडूनही आले. नव्याने तयार झालेला सांगरूळ मतदार संघ हा करवीर तालुक्याच्या पश्चिमेकडील भाग आणि राधनगरी तालुक्याचा काही भाग असा बनलेला होता. तर करवीर मतदार संघामध्ये करवीर तालुक्याच्या पूर्वेकडील भाग आणि कोल्हापूर शहरातील काही भाग असा तयार झालेला होता. दादांनी पूर्व भागातील आपले विश्वासू कार्यकर्ते, गडमुडशिंगीचे आर. बी. पाटील यांना काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी मिळवून दिली आणि त्यांना आमदार म्हणून निवडूनही आणले.

### कार्यकर्त्यास विश्वास दिला

श्रीपतरावदादांची काम करण्याची एक विशिष्ट पद्धती होती. त्यांच्यावरील संस्कार नियमांचे पालन यापेक्षा व्यक्तीची गरज भागवली जावी या पद्धतीचे होते. त्यामुळे दादांसमोर येताना माणसं अगदी आत्मीयतेने आपल्या व्यथा मांडत. विशेषतः नोकरदार मंडळींच्या संदर्भात ही बाब अनेकांनी अनुभवलेली आहे. आज पगाराच्या संदर्भात विशिष्ट तारीख नजरेसमोर ठेवून व्यवहार केला जातो. पण सहकाराच्या क्षेत्रात काम करताना बऱ्याच वेळेला आकस्मिक गरज निर्माण व्हायची. अशा वेळी एखादा कर्मचारी पगारापोटी ॲडव्हान्स मागण्यासाठी यायचा. अशा परिस्थितीत सामान्यपणे अडवणुकीचाच व्यवहार होतो किंवा नियमांची पोथी काढून दाखवली जाते. पण दादा मात्र संबंधित व्यक्तीची गरज आणि तिची तीव्रता तपासून बघत. सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यातील बरे–वाईट प्रसंग त्यांना माहीत होते. त्यामुळे एकदा गरज लक्षात आली की दादा 'द्यायला' हात मोकळा सोडत. अशा वृत्तीने बऱ्याच वेळा घाटाही झाला, पण दादांनी आपला स्वभाव बदलला नाही. लोकांना मदत करताना कोणतीही अपेक्षा ठेवायची नाही

आणि मदतीचा उल्लेखही कुठे करायचा नाही अशी वृत्ती ठेवल्यामुळेच दादांच्या आजूबाजूला असणाऱ्या माणसांबरोबरच खेड्यापाड्यातही सुहृदयी व्यक्तींच्या झुंडीच्या झुंडी होत्या. हे त्यांचे बळ होते.

कार्यकर्ता आणि नेता यांच्यातील नात्याला राजकारणामध्ये खूपच महत्त्व आहे. हे दोघेही एकमेकांना पूरक असतात. एकामुळे दुसऱ्याला आधार मिळतो आणि हे होण्यासाठी परस्परांतील विश्वासाचे नाते दृढीमूल होणे गरजेचे असते. श्रीपतराव बोंद्रेदादा आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचे नाते असेच विश्वासाचे होते. असे म्हटले जाते की नेत्यांनी आपल्या सहकाऱ्याच्या मनाचा विचार करावा. प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे अस्तित्व असते. त्याची स्वतःची मते असतात, धारणा असतात. पण सर्वांना नेतृत्व करण्याची संधी मिळत नाही. अशा वेळी सामान्य कार्यकर्ते आपल्या मनातील विचार इतरांमध्ये पाहू लागतात. मी जे करू शकत नाही ते इतर कोणीतरी करते ही भावना त्याला सुखावते. आपल्या विचारांचे कृतीयुक्त प्रतिबिंब तो समोरच्या व्यक्तीत पाहतो आणि अशातूनच नेतृत्वाची उभारणी होत राहते. स्वाभाविकपणे नेतृत्व काहीजणच करू शकतात आणि बाकीचे सर्व त्यांचे अनुयायी किंवा कार्यकर्ते बनतात. श्रीपतराव बोंद्रेंच्या आजूबाजूला असणारे कार्यकर्तेही असेच होते. त्यांच्या विचारांचा योग्य सन्मान ठेवून दादांनी त्यांचे अस्तित्व अबाधित ठेवले होते.

**कार्यकर्त्यांचे ऐकून घेण्याची वृत्ती**

श्रीपतरावदादांनी कार्यकर्त्यांना जपले. अगदी सर्वार्थाने त्यांची जोपासना केली. ही पद्धती त्यांनी त्यांच्या पहिल्या निवडणुकीपासूनच आत्मसात केली असावी. कारण त्यांच्या बहुतांशी निवडणुकीत कार्यकर्ते समर्पित भावनेने सहभागी व्हायचे. आपल्याला दादांकडे सन्मान मिळणार याची खात्री असल्यामुळेच ही परिस्थिती होती. आज दादांच्या सोबतीला असणारी बरीचशी मंडळी हयात आहेत. त्यांच्याशी बोलताना त्यांनी एका गोष्टीकडे निर्देश केला की 'दादा आमच्या भावना ऐकून घ्यायचे' ही प्रतिक्रिया अगदी बोलकी आहे असे वाटते. कारण, सध्याच्या काळात नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती ऐकण्यापेक्षा आदेश देण्यावर अधिक भर देताना दिसतात. यामुळे संवादाची प्रक्रिया दुतर्फा होत नाही. एका दिशेने होणाऱ्या संवादातून कार्यकर्त्यांच्या भावना नेतृत्वापर्यंत पोहोचत नाहीत. या तुलनेत श्रीपतरावदादा अधिक उदार होते. त्यांनी व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार प्रत्यक्ष आपल्या जीवनात मान्य केलेला होता. हे अनेक घटना प्रसंगांतून जाणवते.

श्रीपतराव बोंद्रे यांचे राजकीय कर्तृत्व तत्कालीन परिस्थितीत मोठे होते. त्यामुळे त्यांना काही सांगणे किंवा सूचना करणे या बाबी सांगणाऱ्यावर दडपण आणणाऱ्या ठरायच्या. बऱ्याच वेळेला वादही व्हायचे. मत–मतांतरे, वाद–प्रतिवाद व्हायचे पण त्यामध्ये कटुता असायची नाही.

एखाद्या दुसऱ्या फळीतील कार्यकर्ता नेत्याने भूमिका मांडली तर त्याचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय व्हायचा. कधीकधी कार्यकर्त्यांच्या मनासारखे निर्णय व्हायचे नाहीत. पण यांमुळे दुरावा किंवा विसंवाद निर्माण होत नसे. दादा त्यांना आपली भूमिका पटवून द्यायचे, समजावून सांगायचे. बऱ्याच वेळेला असेही प्रसंग आल्याची आठवण कार्यकर्ते सांगतात की, दादांनी सुरुवातीला घेतलेली भूमिका दीर्घ चिंतनानंतर बदलली आणि कार्यकर्त्याच्या मनाचा आदर केला. असे जेव्हा जेव्हा झाले तेव्हा तेव्हा त्यांनी संबंधितांना 'तुमचे बरोबर होते' असे सांगून आपल्या मनाचा मोठेपणाही दर्शवून दिला. श्रीपतरावदादांच्या राजकारणाचे हे महत्त्वाचे सूत्र राहिले. त्यांनी कार्यकर्त्यांना सन्मान दिला आणि कार्यकर्त्यांनी दादांचा आदर केला. हे होत असताना 'माझे कार्यकर्ते माझ्या भल्यासाठीच हे सर्व सांगत आहेत' ही भावना त्यांच्या मनामध्ये घट्ट होती. कार्यकर्त्यांनाही तसा विश्वास वाटत होता.

श्रीपतरावदादांकडे असणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये दादांसंदर्भात एक विश्वास होता व तो म्हणजे आपण एखादी गोष्ट सुचविली तर दादा नकार देणार नाहीत. कारण दादा आमदार होते आणि त्यांच्या आजूबाजूला असणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांच्यापुढे जाऊन आमदार व्हावे असे वाटत नव्हते. अर्थात यालाही एकदोन अपवाद ठरले पण दीर्घ अशा राजकीय जीवनात त्यांनी विश्वासपूर्ण नेतृत्वच केले. याचा परिणाम असा झाला की परस्पर विश्वासाचा सेतू दादा आणि कार्यकर्ता यांच्यामध्ये टिकून राहिला. यामुळे दादांसंर्भातील आदर तर टिकलाच पण त्याहीपेक्षा कार्यकर्त्यांचा सन्मान राखला गेला.

श्रीपतराव बोंद्रे यांचे वेगळेपण कशात होते या प्रश्नाचे उत्तर अनेकविध पद्धतीने देता येईल. त्यांचे नेतृत्व, संघटन कौशल्य, निर्णय क्षमता, धडाडी आदी बाबींचा या संदर्भात प्राधान्याने उल्लेख करता येईल पण याहीपेक्षा लोकांमध्ये त्यांच्यासंदर्भात असणाऱ्या आपलेपणाच्या जाणिवेतच त्यांचे वेगळेपण सामावले होते असे वाटते. दादांना आपल्या व्यथा वेदना सांगण्यासाठी अनेक माणसं यायची. या सर्वांशी बोलावे, त्यांचे म्हणणे ऐकावे आणि त्यांना धीराच्या चार गोष्टी सांगाव्यात यामध्ये दादांनी कधीही हयगय केली नाही. दूरवरून येणारी माणसं आधार शोधत आलेली असतात आणि हा आधारही आपण देणार नसू तर त्यांचे नेतृत्व करण्यात हशील ते काय ? अशी त्यांची भावना असायची. त्यामुळे दादा सर्वांचे ऐकायचेच. मनापासून प्रतिसाद द्यायचे. कोणालाही तुसडेपणाने फटकारायचे नाहीत किंवा एखादी व्यक्ती सल्ला देते आहे असे समजून नाराजीही प्रकट करायचे नाहीत. हा संवाद खूप महत्त्वाचा असायचा. बऱ्याच वेळेला लोकांनी सांगितलेली कामे व्हायची नाहीत पण त्यामुळे लोक नाराज व्हायचे नाहीत. उलट दादांनी आपले ऐकून घेतले ही भावना त्यांच्यामध्ये असायची. ही स्वभाववृत्ती दादांच्या व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वपूर्ण अंग होते.

## लोकांशी आपुलकीचे नाते

श्रीपतरावदादा आमदार झाले आणि त्यांचा संबंध सर्वसामान्य लोकांशी येऊ लागला. त्याकाळी आमदार म्हणजे सरकारचे बडे प्रस्थ. लोकांना जणू अशी व्यक्ती 'राजा' वाटायची. आपल्या सर्व दुःखांना सामावून घेऊन सुखाचे दिवस या माणसामुळे आपल्या आयुष्यात येतील ही भावना लोकांमध्ये असायची. त्यामुळे आमदार जेव्हा खेड्यापाड्यातून लोकांना भेटण्यासाठी बाहेर पडायचे त्यावेळी लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांना पाहण्यासाठी बाहेर पडायच्या. गावागावातून स्वागत व्हायचे, सुवासिनी त्यांना ओवाळायच्या आणि संपूर्ण गाव एकत्र येऊन त्यांच्या अडीअडचणी सांगायचा. यथावकाश त्यावर उपायही शोधले जायचे. काही प्रश्न सुटायचे, बरेचसे तसेच राहायचे. पण लोकांमध्ये आपल्या आमदाराला भेटल्याचे समाधान असायचे. पाच वर्षांच्या काळात अशा भेटी होत राहायच्या. दादांचा कार्यकाळही त्याला अपवाद नव्हता. श्रीपतरावदादांनी संपूर्ण मतदारसंघाशी आपल्या संपर्काने नाळ जोडलेली होती. गावात पोहोचल्यावर गावातील पोलीसपाटील, सरपंचाबरोबर सर्वसामान्य माणसांशी त्यांचा संवाद व्हायचा. हा संवाद जमिनीशी नाते सांगणारा असायचा. ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि नेते यांच्यामध्ये एक अदृश्य नाते तयार झालेले असायचे. त्यामध्ये श्रेष्ठ–कनिष्ठत्वापेक्षा ज्येष्ठत्वाचे नाते अधिक दृढ होते. वडिलकीच्या नात्याने सल्ला देणे आणि घेणे या दोन्हीही प्रक्रिया सहजपणे होत रहायच्या.

## पहिली फळी सक्षम बनविली

राजकारणाची बहुतांशी मांडणी नेत्यांच्या अंगानेच होत राहते. अशा वेळी नेत्यांना साहाय्यभूत होणारी भूमिका कार्यकर्त्यांनी घ्यावी अशी अपेक्षा असते. या अपेक्षांची पूर्ती करणाऱ्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेत नेते आपल्या नेतृत्वाची उभारणी करतात. श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या संदर्भात ही बाब खूपच महत्त्वाची आहे. कारण त्यांनी स्वतःचा एक चमू बनविल्याची परिस्थिती होती. या सर्वांचे समाजातील स्थान जरी मर्यादित असले तरी ही कार्यकर्ता मंडळी जेव्हा एकत्र यायची त्यावेळी मात्र त्यांचे एकत्र येणे 'वज्रमुठी' सारखे असायचे. प्रत्येक कार्यकर्ता–नेता दादांना साहाय्य करण्याबरोबर आपले अस्तित्व टिकवून ठेवायचा, जाणवून द्यायचा. या सर्वांना दादांसंदर्भात एक आत्मीयता असायची. यामागे प्रत्येक कार्यकर्त्याला दिला जाणारा सन्मान ही बाब महत्त्वपूर्ण होती. अशा या कार्यकर्त्यांमध्ये बी. के. पाटील सोनाळीकर, पी. डी. पाटील, नामदेवराव कांबळे, वि. रा भास्कर, पां. वि. पाटील, आनंदराव पाटील, चुयेकर बाबासाहेब पाटील भुयेकर, एस. आर. पाटील आदींची नावे वानगीदाखल देता येतील. पण येथे एक बाब लक्षात घ्यावयास हवी की या व अशा कार्यकर्त्यांच्या पाठीमागे दोन–तीनशे पासून दोन–तीन हजार इतक्या मतांची शिदोरी होती. आणि याची प्रबळ जाणीव श्रीपतरावदादांना असायची.

## सत्तेचे विकेंद्रीकरण

सत्तेचे विकेंद्रीकरण हे श्रीपतराव बोंद्रे यांच्या राजकारणामागे महत्त्वपूर्ण सूत्र होते. दादा आमदार असताना जिल्हा परिषद, पंचायत समिती, मार्केट कमिटी व इतर स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडणुकीच्या माध्यमातून सहभागी असायचे. या संस्थांमध्ये आपल्या विश्वासू कार्यकर्त्यांची वर्णी लावायचे आणि संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपवायचे. माझा कार्यकर्ता कोणतेही अनुचित निर्णय घेणार नाही, कृती करणार नाही याचा विश्वास त्यांच्या मनात असायचा. त्यामुळे त्यांच्या निवडणुकीच्या वेळी कार्यकर्त्यांची फळी सहजपणे उपलब्ध व्हायची. आज सर्वसाधारणपणे एक चित्र असे दिसते की नेते मंडळी सत्तेची सर्व सूत्रे स्वतःकडे ठेवण्यासाठी धडपडत असतात. कोणताही निर्णय मग तो लहान असो की मोठा, स्वतःच घ्यायचा ही वृत्ती बळावल्यामुळे दुसऱ्या फळीतील कार्यकर्ते तयार होत नाहीत. सर्वसामान्य माणसांचा सरळपणे नेत्याशीच संबंध येऊ लागल्याने असे कार्यकर्ते महत्त्व नसल्यासारखे बनतात. श्रीपतराव बोंद्रेदादांनी मात्र आपल्या कार्यकर्त्यांचा सन्मान ठेवत त्यांच्याकडे अधिकारही दिले. या अधिकारांचा वापर करून त्यांनी सर्वसामान्यांमध्ये आपली प्रतिमा निर्माण करावी आणि त्याचा आधार घेत आमदारकीला मदत व्हावी ही भूमिका त्यांची होती. या संदर्भात काही दुसऱ्या फळीतील नेत्यांची उदाहरणे सांगता येतील. श्रीपतरावदादांचे विश्वासू कार्यकर्ते श्री. नामदेवराव कांबळे व विठ्ठलराव भास्कर हे दोघेही दलित समाजातील. या दोघांनाही दादांनी दलितांचे प्रतिनिधी म्हणूनच वागविले. सत्तेत सहभागी करून घेताना अनेक उच्चपदे दिली. याचा परिणाम असा झाला की मतदारसंघातील दलितांना त्यांचे नेतृत्व मिळाले आणि दादांना दलितांपर्यंत पोचण्याचा मार्ग प्रशस्त झाला. जेव्हा जेव्हा निवडणुका असत तेव्हा दादांनी सांगायचे आणि या दोघांनी दलित समाजाला दादांच्या पाठीमागे उभे करायचे असा कितीतरी वर्षांचा परिपाठ बनला होता. अशीच परिस्थिती आणखीही काही कार्यकर्त्यांसंदर्भात होती. यामुळे दादांचा मतदारसंघातील लोकांशी असणारा संबंध तर राहत होताच पण त्याचबरोबर दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांचाही सन्मान राखला जायचा. आजच्या काळात ही परिस्थिती अभावानेच आढळते. आणखी एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करायला हवा की, कार्यकर्त्याने एखादा निर्णय घेतला की त्याच्यावर विश्वास ठेवून दादा त्याला मान्यता द्यायचे. जे काही निर्णय माझे कार्यकर्ते घेतात ते माझ्या हितासाठीच घेतात अशी भावना त्यामागे असायची. यामध्ये परस्परांवरील विश्वास महत्त्वपूर्ण असायचा.

## सामुदायिक निर्णय प्रक्रियेला महत्त्व

निर्णय प्रक्रिया हा राजकारणातील महत्त्वाचा भाग. सत्तेच्या केंद्रीकरणात एकच व्यक्ती निर्णय घेते आणि बाकीचे सर्व त्याप्रमाणे वागतात. सध्याचे राजकारण तसे आहे. पण श्रीपतराव

बोंद्रे यांनी सामुदायिक निर्णय प्रक्रियेला महत्त्व दिले. एखादा व्यापक निर्णय घ्यायचा असेल तर सर्वांशी सल्लामसलत करावी ही भूमिका ठेवली. यामुळे एखाद्या विशिष्ट भागासंदर्भात निर्णय घ्यायचा असेल तर त्या त्या भागातील सर्व प्रमुख कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले जायचे. निर्णयाचे दूरगामी परिणाम चर्चेला घेऊन निर्णय व्हायचे. बऱ्याच वेळेला एखाददुसऱ्या फळीतील महत्त्वाचा कार्यकर्ता ज्याला आजच्या भाषेत 'किचन कॅबिनेट' असे म्हणता येईल त्याच्यावर जबाबदारी सोपविली जायची. ही व्यक्ती संबंधिताशी चर्चा करायची आणि निर्णय घेऊन निर्णयाची माहिती दादांना द्यायची. आपल्या विश्वासू कार्यकर्त्याने घेतलेला निर्णय बदलण्याची पद्धती दादांनी ठेवली नव्हती. अशा वृत्तीमुळे दुसऱ्या फळीतील कार्यकर्तेही झोकून द्यायचे. 'आपण घेतलेल्या निर्णयाने दादा नाराज होणार नाहीत' याची खात्री कार्यकर्त्यांना असायची. ही बाब श्रीपतरावदादांच्या राजकारणाच्यादृष्टीने खूपच महत्त्वाची ठरली.

**सर्वांना सामावून घेतले**

श्रीपतरावदादांच्या राजकीय वाटचालीत अनेकांचा हातभार लागला. पण हे होत असताना त्यांनी सर्वांशी जमवून घेण्याची वृत्ती कायमपणे ठेवली. अगदी त्यांच्या विरोधात काम केलेले, निवडणूक लढवलेले अशांनाही त्यांनी नंतरच्या काळात जवळ घेतले. यासंदर्भात पी. डी. पाटील (पाडळी), एस. आर. पाटील, बाबासाहेब पाटील (भुयेकर), मारुती धोंडी खाडे (सांगरूळ), आनंदराव पाटील (चुयेकर) यांचा विशेषत्वाने उल्लेख करता येईल. यांनी कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर दादांना वैचारिक विरोध केला. पण काही काळानंतर दादांनी त्यांना आपलेसे केले. इतकेच नव्हे तर सन्मानाने वागवले. एखादी व्यक्ती कधीतरी विरोधात होती म्हणून त्यांच्याकडे कायमपणे त्याच भावनेतून पाहणे दादांनी जाणीवपूर्वक टाळले. ही त्यांच्या राजकारणातील मोठी जमेची बाजू ठरली. अशा तऱ्हेने यशवंतराव चव्हाण साहेबांनी सुरू केलेले 'बेरजेचे राजकारण' प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याचे काम श्रीपतरावदादांनी नेहमीच केले.

**विरोधकांशी सौहार्दपूर्ण संबंध**

श्रीपतरावदादांनी दीर्घकाळ राजकारण केले. पण हे करीत असताना व्यक्तिगत संबंधही जपले. त्यांनी राजकारण आणि व्यक्तीसंबंधामध्ये गल्लत केली नाही. विचारांची लढाई विचारानेच लढायला हवी आणि त्यामध्ये मतभेद असू शकतात अशी भूमिका दादांनी ठेवली. त्यामुळे 'काँग्रेसमन' असणारे दादा इतर पक्षातील नेत्यांशीही सौहार्दपूर्ण संबंध ठेवून असत. अगदी त्यांच्या विरोधात निवडणूक लढविणाऱ्या शे. का. पक्षाचे माजी आमदार गोविंदराव कलिकते, जनता दलाचे माजी आमदार शंकर धोंडी पाटील, रवींद्र सबनीस, माजी आमदार पी. बी. साळुंखे, जी. डी. पाटील (चिखली), माजी नगराध्यक्ष एन. डी. जाधव, केशवराव जगदाळे, कॉ. गोविंदराव पानसरे यांच्याशीही त्यांचा स्नेह होता. या संदर्भात श्रीपतरावदादांच्या

एकसष्टीच्या कार्यक्रमाकडे पहावे लागेल. त्यांच्या संदर्भात गौरवाची भावना व्यक्त करणाऱ्यांमध्ये सर्वपक्षीय नेते मंडळींची आवर्जून उपस्थिती होती आणि ही बाब दादांच्या व्यक्तित्वाची वेगळी ओळख पटवून देणारी ठरली.

**स्थानिक निवडणुकांत हस्तक्षेप नाही**

श्रीपतरावदादांनी आमदार आणि मंत्री या नात्याने संपूर्ण करवीर तालुक्याशी संबंध प्रस्थापित केले. हे करीत असताना गावपातळीवरील राजकारणामध्ये फारसा हस्तक्षेप केला नाही. ग्रामपंचायत, सेवा संस्था, दूध संस्था आदी तत्सम संस्थांच्या निवडणुकांमध्ये फारसे लक्ष घातले नाही. यामुळे गावपातळीवर त्यांच्या विरोधात फारसा मोठा गट संघटित झाला नाही. ही जबाबदारी त्यांनी संबंधित गावातील नेत्यांवर सोपवल्यामुळे कार्यकर्त्यांना आपले कर्तृत्व दाखवून देण्याचा वाव मिळायचा. दादा अशा कार्यकर्त्यांना शाबासकी द्यायचे. यामुळे कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागायचे.

**जिल्ह्याच्या राजकारणात पक्षाबरोबर**

श्रीपतरावदादा नगरपालिकेचे नगराध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन, करवीर–सांगरुळचे आमदार, महाराष्ट्र मंत्रीमंडळात कृषी राज्यमंत्री म्हणून दीर्घकाळ कार्यरत राहिले. पण त्यांनी राजकारणाच्या दृष्टीने करवीर–राधानगरी तालुक्यावरच अधिक लक्ष केंद्रित केले. तत्कालीन परिस्थितीत जिल्ह्याच्या राजकारणात वेगवेगळे गट नेत्यांच्या नावाने कार्यरत होते. अशा नेत्यांमध्ये कै. दे. भ. रत्नाप्पाण्णा कुंभार, कै. खासदार बाळासाहेब माने, माजी खासदार उदयसिंगराव गायकवाड, माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी आमदार शामराव भिवाजी पाटील या नेत्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. दादांनी मात्र जिल्हास्तरावरील राजकारणात फारसा रस दाखवला नाही. जरी राजकीय मतभेद असले तरीही पक्षाच्या पातळीवर मात्र दादा नेहमीच त्यांच्या बरोबर राहिले. तसेच त्यांच्या समकालीन असणाऱ्या डॉ. डी. वाय. पाटील, यशवंत एकनाथ पाटील, सदाशिवराव मंडलीक आदींशी त्यांचे संबंध सलोख्याचे होते. यामुळेच आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवून देतानाही जिल्ह्यामध्ये आदरयुक्त दरारा निर्माण करण्यात दादा कमालीचे यशस्वी ठरले.

**सहज उपलब्धता**

राजकारणात टिकून राहायचे असेल तर लोकांसाठी नेत्याने सहजपणे उपलब्ध व्हायला हवे. पन्नास वर्षांपूर्वीचा विचार केला तर दळवळणाबरोबर संवादाची साधनेही मर्यादित होती. दूरदर्शनचा तर काळ खूप पुढचा. रेडिओ काही ठरावीक लोकांच्या घरात पहायला मिळायचा. टेलिफोनच्या तारा कुठेतरी अतिमहत्त्वाच्या व्यक्तीच्या घरावर दिसायच्या. आजकाल सर्वत्र सहजपणे उपलब्ध होणाऱ्या मोबाईलची कल्पनाही कुणी केली नसेल. अशा काळात संवादाचे

माध्यम म्हणजे प्रत्यक्ष भेटणे एवढेच असायचे. त्यामुळे लोकांसाठी सदासर्वकाळ उपलब्ध होणे ही राजकारणी व्यक्तीसाठी अत्यावश्यक बाब बनली होती. दादांच्या बाबतीत हा रिवाज टिकून राहिला.

श्रीपतरावदादांचे राजकीय कार्य कोल्हापूर शहर आणि करवीर, राधानगरी तालुक्यामध्ये विस्तारले होते. कोल्हापूर शहर आणि परिसरामध्ये तर त्यांचे वास्तव्यच असायचे. तत्कालीन परिस्थितीतील कोल्हापूर आजच्याइतके विस्तारलेले नव्हते. शिवाजी पेठ, मंगळवार पेठ हा शहराचा मुख्य भाग होता आणि कुठेतरी खेड्यात जावे त्या पद्धतीने काही उपनगरे पुंजक्यासारखी पसरलेली होती. संस्थानकाळातील खुणांचा स्पष्ट प्रभाव या भागावर दिसून यायचा. साधारणपणे १९६७ नंतर दादांचा ग्रामीण जीवनाशी प्रत्यक्षपणे संबंध आला. करवीर मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रात संपूर्ण करवीर तालुक्यातील गावांशी ते जोडले गेले. पूर्वेकडे असणाऱ्या वसगडे, वळीवडे, सांगवडेपासून चिंचवडेपर्यंत तसेच केर्ले–केर्ली पासून ते निगवे दुमाला, शिये–भुये असा सर्वसाधारण भाग यामध्ये समाविष्ट होता. लांबीरुंदीचा विचार केला तर साधारणपणे ८० ते १०० चौ.किमी. इतका हा भाग होता. या भागाचे त्यांनी दहा वर्षे प्रतिनिधित्व केले.

मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यावर दादांनी सांगरुळ मतदार संघ निवडला. या मतदारसंघाची भौगोलिक रचना खूपच विचित्र बनली. पूर्वाश्रमीच्या करवीर तालुक्यातील काही गावांबरोबर राधानगरी तालुक्यातील गावांचाही समावेश यामध्ये झाला. भौगोलिक आणि समाजजीवनाच्या अनुषंगाने अगदी वेगवेगळ्या संस्कृती या मतदारसंघात पहावयास मिळतात. करवीर पूर्व आणि राधानगरी पश्चिम यातील अंतरच सुमारे १०० ते १२५ किमी इतके असावे. लोकजीवनामध्ये जाणवण्याइतपत फरक. वेष, भाषा, संस्कृती, गरजा, भौतिक सुविधा, श्रद्धा यांचा संबंध जाणवण्याइतपत वेगवेगळा. एकूणच दादांच्या जीवनात आलेली माणसं आणि त्यांनी प्रतिनिधित्व केलेला परिसर यांमध्ये सर्वार्थाने विविधता होती. राधानगरीतील काही भागात तर वाहतुकीची साधने सोडाच, पण रस्तेही उपलब्ध नव्हते. धनगरवाड्यांमध्ये भारत स्वतंत्र झाला म्हणजे काय झाले? मतदान म्हणजे काय? सरकार म्हणजे काय? ते कसे निवडतात? अशा गोष्टींपासून लोक कितीतरी दूर होते. एकूणच दादा प्रतिनिधित्व करीत असलेला बराचसा भाग अप्रगत आणि आधुनिक जीवनाशी बऱ्यापैकी अनभिज्ञ होता.

ग्रामीण भागातील परिस्थिती अशी होती तर शहरामध्येही लोक त्यांना भेटायला यायचे. सकाळच्या वेळी दादा घरात हमखास भेटायचे. सकाळची आन्हिके उरकल्यानंतर त्यांचा लोकांसाठीचा सहज वावर सुरू व्हायचा. लोक वाट बघत बसले आहेत, त्यांना तिष्ठावे लागले अशी परिस्थिती फारशी निर्माण व्हायची नाही. कारण कार्यकर्ते दादांच्या घरातही पोहोचत.

दादा दाढी करीत असतील तर त्यांचे आवरणे सुरू असायचे आणि दुसरीकडे संवादही चालू असायचा. सकाळच्या वेळी येणाऱ्यांना त्यांच्यासोबत हमखास चहा मिळायचा. अगदी घरातील लोकांसारखे मतदार संघातील समान्य लोकांशी त्यांचे वर्तन सुरू राहायचे. यामध्ये आमदारकीची वस्त्रे गळून पडायची. या लोकांसाठी श्रीपतराव बोंद्रे केवळ 'दादा' असायचे. कोल्हापुरात येणाऱ्यांना दादांची भेट झाली नाही असे कधी घडायचेच नाही. कारण घरानंतर काही निश्चित ठिकाणी दादा सहजपणे उपलब्ध व्हायचे.

आजच्या राजकारणात 'दरबार' हा शब्द परवलीचा झाला आहे. आजचे मुख्यमंत्री, मंत्री तर काही आमदारही लोकदरबार भरवतात. त्यासाठी विशिष्ट काळ-वेळ ठेवलेली असते. एकाअर्थी लोकांचे प्रतिनिधित्व करतानाही वेळ ठरवून देण्याची पद्धती आज विकसित झालेली आहे. पण श्रीपतराव बोंद्रे ज्या काळात सक्रियपणे राजकारण करीत असत त्यावेळी वेळेच्या बंधनापेक्षा सहजपणे उपलब्धता प्रधान मानली जायची. लोकांची सोय महत्त्वाची असायची. त्यामुळे घरातून बाहेर पडल्यानंतर इतर कोणताही कार्यक्रम नसेल तर दुपारच्या वेळी दादा शाहू बोर्डिंगवर हमखासपणे भेटायचे. त्यांच्या येण्याच्या वेळेतही फारसा बदल व्हायचा नाही. त्यांना भेटण्यासाठी, आपल्या व्यथा मांडण्यासाठी लोक आलेले असायचे. दादा यायचे आणि त्यांचा 'लोकदरबार' सुरू व्हायचा. हे दृश्य पाहणेही मोठे मनोरंजक असायचे. आज ज्या वास्तूचा उल्लेख पी. सी. पाटील सभागृह असा होतो तेथे दादांची 'बैठक' असायची. दिवाणजी वापरतात तसे लहानसे टेबल. दादा यायचे आणि तेथे बसून लोकांशी संवाद साधायचे. त्यांच्या समोर भागातून आलेले वेगवेगळ्या गावातील कार्यकर्ते, माणसं दाटीवाटीने बसलेली असायची. खोलीच्या बाहेर तर चपलांचा ढीग असायचा. दादा सर्वांशी बोलायचे, ऐकायचे, सूचना द्यायचे. येणाऱ्याला समाधान याच गोष्टीचे असायचे की दादांनी आपले ऐकले. एवढे झाल्यावर अतिशय कृतज्ञ भावनेने दादांना नमस्कार करून लोक निघून जात. या दरम्यान दादांनी त्यांची व्यक्तिगत विचारपूस केलेली असायची. 'कसा आलास, कसा जाणार इथंपासून भाकरीतुकडा आणलाय काय' अशी चौकशी व्हायची. माणसं सद्‌गदित भावनेने आपल्या घराकडे चालू लागायची.

संध्याकाळची वेळ 'कंझ्युमर'साठी जणू आरक्षित असायची. आज व्हिनस टॉकीजच्या चौकात असणारी ही इमारत श्रीपतरावदादांच्या जीवनातील राजकीय घडामोडीचे केंद्र होते. दादा संध्याकाळी याठिकाणी यायचे आणि त्यांच्याबरोबर किंवा अगोदर त्यांचे कार्यकर्ते जमा व्हायचे. दिवसभर काय झाले, कोणत्या भागातून कोण जाऊन आले, काल ठरविलेल्या पैकी कोणत्या गोष्टी संदर्भात प्रगती झाली अशा कितीतरी विषयांवर चर्चा व्हायची. एकाअर्थी दिवसभराचा आढावा घेतला जायचा. तेथेही सर्वसामान्य माणसांचा राबता असायचा. प्रश्न ऐकले

जायचे, त्यावर निर्णय व्हायचे आणि दिवस संपून जायचा. श्रीपतरावदादांनी ही लोकसंपर्काची पद्धती कायमपणे राबविली. कोल्हापूर शहरात दादा आहेत आणि त्यांची भेट झाली नाही किंवा त्यांनी भेट नाकारली असे कधीच व्हायचे नाही. असा विचारही त्यांच्या मनात कधी यायचा नाही. कारण आपल्याला भेटायला येणारी व्यक्ती आपल्याकडे आशेने येते, पैसा खर्च करून येते याची सततची जाणीव त्यांच्या मनात असायची. त्यामुळेच दादा आजच्या भाषेत सांगायचे तर 'आऊट ऑफ रेंज' कधीच नसायचे. दादांच्या यशस्वी राजकारणाचे हे एक महत्त्वपूर्ण गमक आहे.

**दादांचा पत्रसंवाद**

दादांनी लोकसंपर्काची स्वतःची अशी पद्धत सुरु केली होती. यामध्ये पत्रव्यवहाराचा उल्लेख आवर्जुन करावा लागतो. भागातील, शहरातील किंवा अन्य कोणत्याही हरातील एखाद्या व्यक्तीने यश मिळविले असेल तर दादा पत्र लिहून त्यांचे अभिनंदन करायचे. त्याचबरोबर एखादी दुःखद घटना घडली असेल तर पत्राद्वारे सांत्वनही करायचे. पत्रातील भाषा खूपच आत्मियतेची असे. दोन ओळींच्या पत्राने दादांच्या संदर्भातील लोकांच्या भावना अधिकच दृढ व्हायच्या. प्रस्तुत लेखकाला अशी पत्रे अनेकांकडे पहावयास मिळाली. कार्यकर्त्यांनी अनमोल ठेव म्हणून ती जपून ठेवली आहेत.

**वृत्तपत्रांशी जवळकीचे नाते**

श्रीपतरावदादांनी प्रसार माध्यमांशी हळूवार संबंध ठेवले होते. विशेषतः 'पुढारी'चे ग. गो. जाधव आणि 'समाज'चे सर्जेराव पाटील यांच्याशी त्यांचा विशेष स्नेह होता. पत्रकार समाजाचा अचूक अंदाज घेतात अशी भावना मनात बाळगणाऱ्या दादांनी या दोघांबरोबर वेळोवेळी विचाविनिमय केला आणि आपल्या कार्याला दिशा दिली. तत्कालीन जेष्ठ पत्रकार नरुभाऊ लिमये, माजी खासदार आणि विशाल सह्याद्रीचे संपादक अनंतराव पाटील यांच्याशीही दादांचे स्नेहाचे ऋणानुबंध होते.

कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे हे हाडाचे कार्यकर्ते जसे होते तसेच सर्वसामान्य माणसांना न्याय मिळवून देणारे सजग, क्रियाशील राजकीय नेतेही होते. आपल्या राजकारणाचा पाया समाजकारणच असायला हवा याचा कटाक्ष त्यांनी आयुष्यभर जपला. राजकारण केवळ नेत्यांच्या स्तरावर असून चालत नाही तर नेत्यांच्या विचारांच्यावर श्रद्धा ठेऊन त्यांच्या मागे असणारी कार्यकर्त्यांची फळी, जनता त्या नेत्याला कसा प्रतिसाद देतात यावर नेतृत्त्वाचा निकष अवलंबून असतो. एकाअर्थी लोकांचा विश्वस्त म्हणून नेता काम करीत असतो. यासाठी माणसं जपणं, त्यांना उभं करणं ही गोष्ट सर्वाधिक महत्त्वाची ठरते. कै. श्रीपतराव बोंद्रेदादा यांनी कार्यकर्त्यांच्या समोर आपल्या व्यक्तीत्त्वाची निस्सीम अशी छाप निर्माण केली होती. कै.

दादांनी कार्यकर्त्यांच्या बरोबरीनेच नेत्यांप्रती असणारी आपली निष्ठा कै. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या अनुषंगाने वेळोवेळी आपल्या कार्यकर्त्यांसमोर ठेवली होती. त्यामुळेच नेता कसा असावा? असे म्हणत असताना जसे कै. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांचा उल्लेख होता तसाच कार्यकर्ता कसा असावा? असे म्हणत असताना कै. श्रीपतराव बोंद्रेदादा यांचा उल्लेख अगदी आदराने केला जातो. यामुळेच चतुरस्त्र: व्यक्तिमत्वाच्या कै. दादांनी आपल्या विचार आणि कृतीतून आपले व्यक्तित्व लोकांसमोर ठेवले ही बाब निर्विवाद सत्य आहे.

**संदर्भ सूची** :

१) डॉ. शानेदिवाण आर. के., भूमिपुत्र, सोनिया प्रकाशन, कोल्हापूर, २०१२, पृ. ५९.

२) श्रीपतराव बोंद्रे षष्ट्यद्विपूर्ती विशेषांक, शांताराम बोकिल यांचा लेख, १९८१.

३) डॉ. शानेदिवाण आर. के., उनि.

# प्रकरण तिसरे

## श्रीपतराव बोंद्रे : शैक्षणिक आणि राजकीय कार्य

श्री. श्रीपतराव शंकरराव बोंद्रेदादा यांची ओळख प्राधान्याने राजकीय नेता अशी होत असली तरी समाजजीवनाच्या विविध अंगामध्ये त्यांनी आपले भरीव स्वरूपाचे योगदान दिले आहे. यामध्ये त्यांनी सुरू केलेल्या शैक्षणिक संस्था व त्या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून उभी केलेली शैक्षणिक व्यवस्था खूप महत्त्वाची आहे. शिक्षण गोरगरीब मुलांपर्यंत पोहचायला हवे इतकेच नव्हे तर शिक्षणाचा केंद्रबिंदू हा ग्रामीण परिसर असायला हवा अशातऱ्हेचा विचार मांडणाऱ्या कै. दादांनी नेहमीच मुलींच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले. या दृष्टिने कै. दादांच्या शैक्षणिक कार्याचा धावता आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**श्रीपतराव बोंद्रे : शैक्षणिक कार्य**

श्रीपतराव बोंद्रे यांचा उल्लेख राजकीय नेते असा होतो. असे असले तरी सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षणीय आहे. गोरगरीब, पीडितांना मदतीचा हात पुढे करून त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. यातीलच एक महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे त्यांची शिक्षणासंदर्भातील आस्थेची भावना. श्रीपतरावांचे शिक्षण सातवीपर्यंतचे पण त्यांचे वाचन मात्र अफाट होते. वृत्तीने धार्मिक असलेल्या दादांनी परमेश्वरावर श्रद्धा ठेवली हा त्यांचा अलौकिक अनुभव होता. पण वर्तमानात राहताना शिक्षणाशिवाय पर्याय नाही याची खूणगाठ त्यांनी आपल्या मनाशी बांधलेली होती. त्यामुळे जेव्हा परिस्थिती अनुकूल झाली तेव्हा सर्वप्रथम त्यांनी शिक्षणाविषयीचा आपला विचार प्रत्यक्ष कृतीतून साकार केला.

दादांवरील संस्कार नैतिक मूल्यांची पाठराखण करणारे होते. परंपरेचा विचार मनात ठेवून त्यांनी आधुनिकतेची कास धरलेली होती. त्यामुळे त्यांच्या मनातील श्रद्धेला अंधश्रद्धेचे स्वरूप कधी आले नाही. याला त्यांचे वाचन आणि व्यासंग कारणीभूत ठरला. श्रीपतराव बोंद्रे यांनी महात्मा जोतिराव फुले यांना आपल्या सामाजिक जीवनाचा महत्त्वपूर्ण आधार मानले. 'शेतकऱ्याचा आसूड', 'गुलामगिरी' या पुस्तकांनी तर त्यांच्यावर अक्षरशः गारूड केले होते. एकोणिसाव्या शतकातील जोतिबा फुले यांच्याएवढा मूलगामी विचार करणारा सत्यशोधकी विचारवंत दादांच्या आकलनाच्या कक्षेत नव्हता. परंपरेला आपल्या कृतीतून छेद देणाऱ्या महात्मा फुलेंना त्यांनी आपल्या सामाजिक जीवन विचाराचे गुरूच मानल्याची स्थिती होती. प्रस्तुत लेखकाने या संदर्भातील त्यांची भावना अनेक वेळा अनुभवली आहे. महात्मा फुले यांचे जीवन चिंतन मांडणारा,

विद्येविना मती गेली, मतिविना गती गेली
गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले
एवढे अनर्थ एका, अविद्येने केले!

हा विचार दादांच्या तोंडून अनेकवेळा ऐकण्याचे भाग्य लाभले.[१] शिक्षणाने व्यक्तीची सर्वांगीण प्रगती होऊ शकते आणि ही संधी सर्वांना उपलब्ध करून द्यायला हवी अशीच भूमिका श्रीपतरावांनी ठेवली. शिक्षण व्यक्तीच्या विचार करण्याची दिशा निश्चित करते. शिक्षणाने आजूबाजूचे वास्तव जीवन समजून येते. त्यामुळे माणसाला माणूस बनविण्याचे कार्य शिक्षणाच्या माध्यमातूनच शक्य असल्याची भावना श्रीपतरावदादांनी सतत मनात बाळगली आणि याचेच फलित म्हणून त्यांनी काही शैक्षणिक संस्थांची उभारणी केली.

**कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे संस्था**

यामध्ये फुलेवाडी परिसरातील कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे या संस्थेचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. ज्या काळी ही संस्था उभी राहिली त्या काळी फुलेवाडी परिसर तसा मागासच होता. तेथे कोणत्याही भौतिक सुविधा उपलब्ध नव्हत्या. शेती मुबलक होती व त्याआधारे लोकांची गुजराण सुरू होती. अशा वेळी त्या परिसरात शाळा सुरू करण्याची योजना श्रीपतरावदादांनी आखली आणि प्रत्यक्षात उतरवली.[२] आज या संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाचे महाद्वार या परिसरातील मुलांसाठी खुले झाले आहे.

**श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था**

श्रीपतराव बोंद्रे यांच्या शैक्षणिक कार्याचा आलेख मांडताना दसरा चौकातील श्री शाहू शिक्षण संस्थेचा आवर्जून उल्लेख होतो. ही संस्था श्री राजर्षि शाहू राजांनी उभ्या केलेल्या ऐतिहासिक वसतिगृहांच्या परिसरात आहे. या ठिकाणी कोल्हापुरातील पहिले वसतिगृह व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग नावाने सुरू झाले. पुढील काळात याचे नाव 'शाहू बोर्डिंग' असे करण्यात आले. या परिसरातच श्रीपतरावदादांनी शैक्षणिक संकुल उभारले. एकाच छताखाली शिक्षणाचे सर्व प्रवाह एकत्रित यायला हवेत हा ध्यास मनात ठेवून त्यांनी हायस्कूल, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाबरोबर बी.एड्, वैद्यकीय, डी.फार्मसी, जवाहर हायस्कूल, आय.टी.आय., बालमंदिराबरोबर मुला-मुलींचे वसतिगृहही उभे केले.[३] कोल्हापूरच्या मध्यवर्ती परिसरात हा शिक्षणाचा विस्तार श्रीपतरावदादांच्या वैचारिक आणि शैक्षणिक दृष्टीचा परिपाक आहे. आज या संस्थेने संपूर्ण महाराष्ट्रभर लौकिक प्राप्त केला असून हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन सार्वजनिक जीवनात कार्यरत झाले आहेत.

श्रीपतराव बोंद्रे यांनी आपल्या शैक्षणिक विचारांचे एक सूत्र मनाशी पक्के ठेवले होते. त्यांना समाजाला सुजाण करायचे होते. बहुजन समाजाला प्रागतिक विचारांकडे न्यायचे असेल तर शिक्षणाशिवाय हे कार्य शक्य नाही ही त्यांची भावना त्यांनी प्रत्यक्षपणे अनेकवेळा सभा, समारंभ आणि व्यासपीठांवरून मांडली होती. श्रीपतरावदादांनी स्वातंत्र्यपूर्व काळ केवळ पाहिला नव्हता तर अनुभवला होता. तत्कालीन समाजातील रुढी, परंपरा आणि त्यामध्ये भरडला

जाणारा समाज त्यांनी जाणला होता. हे बदलायला हवे ही त्यांची भावना तरुणपणापासूनची होती. संधी मिळताच या संधीचे सोने करण्याची किमया त्यांनी साधली. समाजात सुधारणा करणे म्हणजे सामाजिकदृष्ट्या मानवनिर्मित विषमतेच्या दऱ्या बुजविणे आणि यासाठी शिक्षण पाहिजे या मताचे दादा पुरस्कर्ते होते. एकाअर्थी समाजाने आपल्याला जे दिले आहे त्यातून उतराई होण्याचा एक सुसंस्कृत मार्ग म्हणूनच श्रीपतरावांनी शिक्षणाच्या क्षेत्राकडे पाहिले. दादांना या माध्यमातून अशी माणसं उभं करायची होती, जी माणसं सामाजिक उन्नयनाच्या क्षेत्रात हिरिरीने उतरतील, एक नवा समाज घडवतील. दादांचा हा उद्देश बऱ्याच अंशी सफल झाल्याचे चित्र आज पहावयास मिळते.

श्रीपतरावदादांनी शिक्षणाकडे व्रतस्थ भावनेने पाहिले. भारतीय घटनेने सर्वांना विकासाची संधी देण्याची भूमिका घेतली असल्याने तशी संधी प्राप्त करून देण्याची जबाबदारीही शासनाचीच असल्याचे श्रीपतरावांना वाटत होते. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतरावदादा पाटील यांनी घेतलेला विनाअनुदानित शिक्षण संस्थांचा निर्णय त्यांनी स्वागतार्ह म्हणून स्वीकारला. अर्थात कॅपिटेशन फीच्या नावाखाली या व्यवस्थेत अपप्रवृत्ती शिरल्या याचे त्यांना मनस्वी दुःख होते, पण दुष्टप्रवृत्तींना आळा घालून ही शिक्षणाची गंगा वाहवत ठेवायला हवी असे मत त्यांनी स्पष्टपणे नोंदवले आहे.

श्रीपतरावदादा गुणवत्तेला महत्त्व निश्चितपणे देतात, पण गुणवत्तेच्या नावाखाली शिक्षणाचा हक्क हिरावून घेतला जाऊ नये असे त्यांना वाटते. शहरी आणि ग्रामीण स्तरावर विभागलेल्या मुलांमध्ये निश्चितपणे फरक असणार असून साधनांच्या उपलब्धतेमुळे शहरी मुलं अधिक सफाईदारपणे नव्या व्यवस्थेला सामोरे जातात ही वस्तुस्थिती आहे. पण असा विचार करताना ग्रामीण तरुणांना अधिक सवलती पुरवायला हव्यात असेही श्रीपतरावदादा ठामपणे नमूद करतात. टक्केवारीच्या आधाराने उच्च शिक्षणाची दारे खुलणार असतील तर अशी व्यवस्था आपले भले करणार नाही याची स्पष्ट जाणीव त्यांच्या मनात होती. त्यामुळेच आधुनिक शिक्षण प्रक्रियेतील 'नंबरची शर्यत' त्यांना फारशी रुचायची नाही. केवळ उच्च मार्क श्रेणीचाच विचार करून शिक्षणाची प्रक्रिया राबवली तर सर्वसामान्य विद्यार्थ्यांवर अन्याय होईल असे त्यांना वाटे. त्यामुळेच श्रीपतरावदादांनी आपल्या शिक्षण संस्थेत मेरिटपेक्षा 'इच्छा असेल त्याला शिक्षण' ही भूमिका ठेवली. जास्त मार्कस् असणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक संधी मिळतील, पण कमी मार्कांच्या विद्यार्थ्यांनी काय करायचे? त्यांना केवळ कमी मार्क आहेत म्हणून संधी नाकारली तर त्यांनी कुठे जायचे? हा अस्वस्थ करणारा प्रश्न त्यांच्या मनात रुंजी घालत असे. त्या प्रश्नाची सोडवणूक सर्वांना प्रवेश देऊन त्यांनी केली.

आणखी एका बाबतीत श्रीपतरावदादा खूपच आग्रही होते. ते म्हणजे मुलींचे शिक्षण. शिकू पाहणाऱ्यांबरोबर ज्यांची आर्थिक परिस्थिती नाही अशा सर्व थरातील मुलींना शिक्षण उपलब्ध व्हावे असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे आपल्या शिक्षणसंस्थेत त्यांनी मुलींसाठीचा प्रवेश मुक्त ठेवला होता.[४] एकही मुलगी शिक्षणापासून वंचित राहू नये असा त्यांचा कटाक्ष होता. त्यांचा हा विचार त्यांनी अतिशय सचोटीने राबविला आणि शिक्षणाच्या प्रवाहात सर्व घटकांना सामावून घेतले.

श्रीपतराव बोंद्रे यांची वृत्ती मूलतः मानवतावादी होती. त्यांनी आपल्या जीवनाची घडणच मुळी या मूल्यांवर केली. आणि हे करीत असताना लोकांसमोर आदर्श कायमपणे रहावा याची दक्षता घेतली. याचे दर्शन त्यांनी उभारलेल्या संस्थांतून जसे होते तसेच त्या संस्थांना दिलेल्या नावांवरूनही याची प्रचिती येते. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात फुलेवाडी परिसरात मिश्र वसाहतीचा यशस्वी प्रयोग केला. ही वसाहत महात्मा फुले हौसिंग सोसायटी नावाने उभी राहिली. याच परिसरात त्यांनी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नावाने शिक्षण संस्था उभारली तर संपूर्ण परिसराचे नाव 'फुलेवाडी' असे मुक्रर करण्यात आले. फुले आणि विठ्ठल रामजी शिंदे यांनी मानवाच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. महात्मा फुल्यांनी दास्यातून मुक्ती मिळावी म्हणून आणि कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणासंदर्भात अलौकिक कार्य केले. या दोहोंचा प्रभाव श्रीपतरावदादांवर लहानपणापासून होता. त्यांच्या आजोबा आणि वडिलांनी प्रत्यक्ष कृतीतून या संदर्भातील संस्कार त्यांच्यावर केले होते.

व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगची सूत्रे जेव्हा श्रीपतरावांच्या हातात आली तेव्हा त्यांनी या बोर्डिंगबरोबर सुरू असलेल्या संस्थेचे नाव छत्रपती शाहूंच्या कार्याचा गौरव करण्याच्या हेतूने श्री शाहू शिक्षण संस्था असे ठेवले. राजर्षि शाहूंनी आपल्या कृतीने दीनदुबळ्यांना आधार दिला. या राजघराण्यासंदर्भातील कृतज्ञता व्यक्त करताना वरिष्ठ महाविद्यालयाला छत्रपती शहाजी राजांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला तर आधुनिक शिक्षणाची सोय करून देताना डी.फार्मसीचे नावही छत्रपती शाहूंच्या नावे ठेवले. श्रीपतरावदादांनी मुलींसाठी बी.एड. महाविद्यालय सुरू केले आणि त्याचे नाव 'सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय' असे ठेवले. स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या सावित्रीबाईंच्या संदर्भातील कृतज्ञता तर यातून व्यक्त झालीच पण त्याचबरोबर मुली आणि महिलांसमोर सबळ, सक्षम असा आदर्श ठेवण्याचा हेतूही साध्य झाला.

श्रीपतरावांवर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. यशवंतरावजी चव्हाण यांचा प्रचंड प्रभाव होता. त्यांचा उल्लेख त्यांनी अनेकवेळा आपले 'राजकीय गुरू' असा केला आहे.[५] श्रीपतरावांच्या राजकीय जीवनाची घडणच मुळी यशवंतरावांच्या मुशीत झाली. त्यामुळे त्यांचे उचित स्मारक उभे करणे हा तर श्रीपतरावदादांच्या आस्थेचा विषय होता. तसेच

वेणूताई चव्हाणांशी असणारा स्नेह आणि वसंतराव नाईक यांच्याशी असणारे संबंधही सर्वश्रुत होते. त्यामुळे या सर्वांच्या नावे त्यांनी वेगवेगळ्या संस्था उभारल्या. यामध्ये यशवंतराव चव्हाण सभागृह, वेणूताई चव्हाण होमिओपॅथिक कॉलेज, वसंतराव नाईक बी.एड. कॉलेज यांचा समावेश होतो. यशवंतराव चव्हाणांच्या स्मृती जपण्याच्या हेतूने अस्थिकलशाची स्थापनाही त्यांनी केली आहे. त्याचबरोबर जवाहरलाल नेहरूंच्या विषयीचा आदर जवाहर हायस्कूल या नावाने तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव सभागृहाला देऊन त्यांचा गौरव केला आहे.[६]

## राजकीय कार्य

ऐन तारूण्याच्या कालावधीत कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रेदादा यांनी सामाजिक कार्याबरोबरच राजकीय क्षेत्रामध्ये उमेदवारी करण्याचा निर्णय घेतला. त्या काळाचा विचार केला तर स्वातंत्र्य मिळून काही वर्षे झालेली होती. अर्थात स्वातंत्र्याच्या लढ्यात कै. दादांनीही आपली उपस्थित लावल्याचे संदर्भ आढळतात. राजकारणाच्या माध्यमातून समाजाचा विकास करता येतो याचे बाळकडू तत्कालिन परिस्थितीत कै. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांचे नेतृत्त्व नजरेसमोर असल्यामुळे दादांना मिळाले होते. त्यामुळेच सुरूवातीला कोल्हापूर नगरपालिका व सहकाराच्या माध्यमातून काम करीत असलेल्या अर्बन बँकेमध्ये राजकीय कारकिर्दीचा श्रीगणेशा करावा अशी मनोवृत्ती कै. दादांची निर्माण झाली असावी. पुढील काळात कै. दादांनी सहकाराबरोबरच महाराष्ट्राच्या विधासभेमध्येही प्रवेश मिळविला इतकेच नव्हे तर महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात कृषीराज्य मंत्री म्हणून काम करण्याची त्यांना संधी मिळाली. त्यांच्या या राजकीय जीवनाचा आलेख पुढीलप्रमाणे नोंदविता येईल.

### श्रीपतराव बोंद्रे : राजकीय वाटचाल

सर्वसामान्य माणसांचे आयुष्य चाकोरीबद्ध असते. त्यांच्या जीवनात फार मोठ्या उलथापालथी किंवा बदल होत नाहीत. जीवनाची एक विशिष्ट गती अशा लोकांचे आयुष्य नियंत्रित करीत असते. स्वाभाविकपणे अशी माणसे त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस किंवा त्यानंतरही लोकांच्या लक्षात राहतीलच याची फारशी शाश्वती नसते. खरं तर अशी अपेक्षाही ठेवली जात नाही. पण काही माणसं मात्र सामान्यत्वापासून असामान्यत्वाचा प्रवास अत्यंत हिकमतीने करतात. जीवनाच्या सुरुवातीच्या टप्प्यात अशा माणसांचे आयुष्यही सामान्यच असते. त्यामध्ये फारसे सांगण्यासारखे असेही काही असत नाही. पण जीवनाच्या विशिष्ट टप्प्यावरून अशा माणसांच्या आयुष्याकडे पाहिले म्हणजे जगाला न दिसणारे अनेक संदर्भ दिसू लागतात. जगण्याच्या वाटेवरील अनेक घटना–प्रसंग महत्त्वाचे आणि जीवन घडवणुकीच्या काळातील महत्त्वपूर्ण टप्पे वाटू लागतात. या टप्प्यांचा अभ्यास केल्यानंतर अशा माणसांच्या असामान्यत्वाचा प्रवास उलगडू लागतो. त्यांचे मोठेपण समजू लागते. ही माणसं भावी पिढीसाठी

कोणता वारसा ठेवून गेली आहेत हे उमजू लागते. अशा व्यक्तींपैकी श्रीपतराव शंकरराव बोंद्रे हे एक असामान्य व्यक्तिमत्त्व होते.

श्रीपतराव बोंद्रे यांनी प्रदीर्घ काळ राजकारण केले. लौकिक अर्थाने १९४४ ते १९९५ असा हा काळ मानता येईल. यामध्ये अर्बन बँकेची पहिली निवडणूक ते सांगरुळ विधानसभा मतदार संघातील १९९५ पर्यंतचे प्रतिनिधित्व यांचा समावेश करता येतो. हा काळ साधारणपणे पन्नास वर्षांचा आहे. वयाचा विचार केला तर २४ व्या वर्षी त्यांनी सक्रिय राजकारणात भाग घेतला आणि ७५ व्या वर्षी या क्षेत्रातून निवृत्ती स्वीकारली. अर्थात हा शब्द प्रस्तुत लेखकाचा आहे. कारण आयुष्याच्या अखेरपर्यंत श्रीपतरावदादा बोंद्रे राजकारणाशी संबंधितच होते. प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात नसले तरी मानसिकदृष्ट्या त्यांची राजकारणाशी नाळ जोडलेलीच होती, ही बाब नाकारता येत नाही.

**राजकीय वाटचाल**

श्रीपतराव बोंद्रे यांचा राजकीय कर्तृत्वाचा पट खूपच व्यापक आहे. पण पाठीमागे वळून बघताना साधारणपणे १९४४ च्या दरम्यान राजकीय उमेदवारी करावी असा विचार त्यांच्या मनात पहिल्यांदा आला असावा. हा काळ भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा होता. साधारणपणे १९३७ ते ४० च्या दरम्यान प्रांतिक सरकारे अधिकारारूढ झालेली होती. सत्ता आणि सत्तेच्या माध्यमातून अधिकार मिळू लागले होते. सत्ता असेल तर आपल्या मनातील विचार प्रत्यक्षात उतरवणे अधिक सुलभ होते ही भावना रुजू लागली होती. श्रीपतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनाही असे वाटू लागले असावे. आणि त्यातूनच १९४४ च्या नगरपालिकेच्या निवडणुका लढवाव्यात असे त्यांनी ठरविले. तशी मानसिक तयारीही त्यांनी केली होती, पण त्यांना संधी मिळाली नाही. त्या काळात स्वातंत्र्यलढ्यातील एका घटनेतील त्यांच्या सहभागाने त्यांना निवडणुकीपासून दूर राहण्यास भाग पाडले. लोकांचा पाठिंबा असतानाही निवडणुकीतील उमेदवारीपासून श्रीपतराव दूर राहिले. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात दादांशी संवाद साधण्याचा योग प्रस्तुत लेखकाला आला होता. त्यावेळी त्यांनी १९४४ ची परिस्थिती सांगून 'निवडणुकीपेक्षा स्वातंत्र्य महत्त्वाचे होते' अशी भावना व्यक्त केली होती. आपण देशासाठी 'भूमिगत'[७] होतो या आठवणीनेही दादा रोमांचित झाल्याचे आठवते.

यथावकाश श्रीपतरावांवरील वॉरंट रद्द झाले. याकामी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन पार्लमेंटरी सेक्रेटरी कै. यशवंतरावजी चव्हाण आणि कै. बाळासाहेब देसाई यांची भूमिका महत्त्वाची ठरली आणि श्रीपतराव मुक्त झाले. या काळात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले होते. नव्या जाणिवा निर्माण होत होत्या. संपूर्ण समाजात चैतन्य भरले होते. अशा काळातच श्रीपतरावांनी अर्बन बँकेची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. वयाच्या २६ व्या वर्षी

श्रीपतरावांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. अर्बन बँक हा सहकारी चळवळीचा भाग होता. तरीही मोठ्या ताकतीने श्रीपतराव लढले. त्यांचे निवडणूक चिन्ह 'चरखा' होते. हाही एक विलक्षण योगायोग मानायला हवा. फुले, शाहू, गांधींचा विचार मनात वागवून आयुष्याची उभारणी करणाऱ्या श्रीपतरावांचे राजकारणातील पहिले पाऊल गांधीविचारांच्या प्रतिकाचा आधार घेऊन पडले. श्रीपतराव विजयी झाले. कोल्हापूरच्या राजकीय पटलावर एका तरुण नेतृत्वाचा उदय झाला. लोकांमध्ये असणारे आणि लोकांना हवेहवेसे वाटणारे श्रीपतराव नेतेपणाची पहिली कसोटी पास झाले. निवडणुकीतील विजयाने त्यांच्या कार्याच्या कक्षा रुंदावल्या. त्यांच्या शब्दाला मान आणि वजन प्राप्त झाले. शेतकऱ्याचा मुलगा शेतकरी, कष्टकरी जनतेचे नेतृत्व करण्यास सिद्ध झाला.

कोल्हापूर शहराने नेहमीच पुरोगामी चेहरा महाराष्ट्रापुढे ठेवला. राजर्षि शाहूनी पुरोगामी विचार मांडून प्रत्यक्ष कृतीत उतरविला. श्रीपतराव बोंद्रेनी ही परिस्थिती अगदी जवळून अनुभवली होती. त्यांची सामाजिक जीवनातील वाटचाल या विचारांचा मागोवा घेऊनच होत होती. स्वाभाविकपणे कोल्हापूर परिसरातील उमदे नेतृत्व म्हणून श्रीपतरावांचा उल्लेख होत होता. दरम्यानच्या काळात स्वातंत्र्य मिळाले. नवा भारत घडताना नवे नेतृत्व असायला हवे अशी प्रबळ भावना लोकांमध्ये रुजत होती. व त्याचा परिपाक म्हणून कोल्हापूर नगरपालिकेच्या १९५२ च्या निवडणुकीत श्रीपतरावांनी आपली उमेदवारी जाहीर केली. आतापर्यंत केलेल्या कामाचे बळ, लोकांचा विश्वास, नवे काम करण्याची धमक या आधारे श्रीपतरावांनी पहिले अधिकृत राजकीय मैदान सर केले. सामाजिक आणि सहकाराबरोबर राजकीयदृष्ट्याही श्रीपतरावांनी आपली योग्यता सिद्ध केली. ही निवडणूक खूपच महत्त्वाची होती. कारण त्याकाळी कोल्हापूर शहरावर डाव्या विचारसरणीचा प्रभाव होता. अशा काळात काँग्रेसपक्षाच्या माध्यमातून लोकांसमोर जाऊन यशस्वी होणे ही बाब खूपच कौतुकाची ठरली. १९५२ ते १९६२ एवढा कालावधी श्रीपतराव बोंद्रे यांनी नगरपालिकेत काँग्रेस पक्षाच्या विचारांचे प्रतिनिधित्व केले.

श्रीपतराव बोंद्रे नगरसेवक झाले याचे अप्रूप खूपच मोठे होते. तो काळ कोल्हापूरच्या राजकीय चळवळीतील महत्त्वाचा होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सर्वत्र जोरात होती. शेकापक्षाची निर्मिती होऊन कोल्हापूर परिसरात या पक्षाने घट्ट घडी बसवली होती. एकाअर्थी डाव्या विचारसरणीचा गड म्हणून कोल्हापूरचा उल्लेख होत होता. विशेषतः शिवाजी पेठेमध्ये शेकापक्षाचे वारे खूप तीव्र होते. काँग्रेस संदर्भात बोलणेही संघर्षास कारणीभूत ठरत असे. अशा काळात श्रीपतराव बोंद्रेनी काँग्रेसचा विचार कोल्हापुरात आणला आणि ताकतीने रुजविला.

काँग्रेसचा कार्यकर्ता गांधी टोपीने शोभून दिसायचा. खादीचे कपडे आणि विशिष्ट पद्धतीने परिधान केलेली गांधी टोपी म्हणजे काँग्रेसचा कार्यकर्ता असे जणू समीकरणच होते. पण

शिवाजी पेठेत अशा तऱ्हेचा वेष करणे धाडसाचे होते. कारण अशा लोकांना प्रसंगी मारहाण व्हायची, डोक्यावरील गांधी टोपी काढून टाकली जायची. एकूण वातावरण कॉंग्रेसविरोधी. अशा काळात श्रीपतराव बोंद्रे कॉंग्रेसच्या पारंपारिक वेषात, डोक्यावर गांधी टोपी घालून बाहेर पडत. त्यांच्या चालण्यात रुबाबदारपणा असायचा. नजरेत जरब असायची आणि अतिशय आश्वासक पद्धतीने ते लोकांना सामोरे जायचे. स्वातंत्र्याच्या काळातील बेडरपणा त्यांच्या वृत्तीत सामावलेला होता. त्यामुळेच श्रीपतराव बोंद्रे यांना रस्त्यात अडविण्याचे धाडस कोणी केले नाही. लाल रंगाचे प्राबल्य असणाऱ्या भागातून कॉंग्रेसचा तिरंगा फडकवण्याची मर्दुमकी त्यांनी साधली होती. यातूनच त्यांच्या संदर्भात आदरयुक्त दरारा निर्माण झाला. श्रीपतराव बोंद्रेंशी वाद घालण्याचा प्रयत्न या काळात फारसा झाला नाही. याचेच फलित म्हणून १९६१–६२ सालच्या नगराध्यक्ष निवडीकडे पहावे लागेल. सभागृहात कॉंग्रेस विचाराचे एकमेव नगरसेवक असूनही त्यांनी आपल्या समविचारी सहकाऱ्यांच्या साथीने कॉंग्रेसचा पहिला नगराध्यक्ष बनण्याचा बहुमान प्राप्त केला. कोल्हापूरच्या राजकीय इतिहासात ही घडलेली चमत्कारिक घटना होती, पण ती घडली आणि याला श्रीपतराव बोंद्रे यांची राजकीय जाण महत्त्वपूर्ण ठरली.

अर्बन बँक आणि कोल्हापूर नगरपालिकांचा संबंध कोल्हापूर शहराशी येत होता. पण श्रीपतराव बोंद्रे यांचे कार्यक्षेत्र ग्रामीण भागाशीही निगडित होऊ पाहत होते. अशा वेळी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये प्रतिनिधित्व असणे आवश्यक होते. यामुळे ग्रामीण अर्थकारणाशी, शेतकऱ्यांशी, त्यांच्या जगण्याशी त्यांचा संबंध येणार होता. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन श्रीपतरावांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाने त्यांची जिल्ह्याच्या राजकारणातील नांदी झाली. बँकेच्या निवडणुकीत श्रीपतरावदादा विजयी झाले. त्यांनी या बँकेत दहा वर्षे प्रतिनिधित्व केले आणि १९७१ साली ते कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमनही झाले. कोल्हापूर जिल्ह्याच्या आर्थिक सत्ताकारणाची सूत्रे श्रीपतरावांच्या हातात आली. शेतकरी असलेली व्यक्ती शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी सर्वोच्च पदावर पोहोचली. श्रीपतरावांच्या समाजकारण आणि राजकारणाच्या दृष्टीने हा मानाचा शिरपेच होता.

कर्तृत्वाची एकेक शिखरे पार करीत असताना सार्वजनिक आणि राजकीय जीवनाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर श्रीपतराव पोहोचले होते. लोकांच्या सान्निध्यात असणारा तरुण कार्यकर्ता–नेता अशी त्यांची प्रतिमा बनली होती. जिल्ह्याच्या पातळीवर त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली जात होती. अशा काळातच १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. हा अनुभव खूप वेगळा होता. द्विभाषिकापासून फारकत घेत तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्राचा मंगल कलश मोठ्या हिमतीने आणला. लोकांचे लोकांनी चालवलेले म्हणजे आपल्या

लोकांनी चालवलेले राज्य निर्माण झाले होते. त्यामुळे कार्यकर्ता म्हणून काम करणाऱ्यांना आपणही महाराष्ट्राच्या घडणीत सहभागी व्हावे अशी भावना निर्माण होणे स्वाभाविक होते आणि ही संधी १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने चालून आली. कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव श्रीपतराव बोंद्रे यांनी विधानसभेची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. एक नवे पर्व या निमित्ताने सुरू होऊ पहात होते. लोकाभिमुख नेतृत्वाला मोठे राजकीय पटल प्राप्त होऊन त्यांच्या कर्तृत्वाचे पंख आणखीनच विस्तारले जाण्याची शक्यता निर्माण झाली. कार्यकर्त्यांनी श्रीपतरावांना मनापासून साथ देण्याचे निश्चित केले होते. पण... असे घडले नाही. त्याला कारण श्रीपतराव नव्हते तर साक्षात यशवंतराव चव्हाण यांनीच त्यांना निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर पडण्यास प्रवृत्त केले. ही परिस्थिती खूपच वेधक होती. एकीकडे जनमताचा रेटा तर दुसरीकडे नेत्यांच्या संदर्भातील निष्ठा. श्रीपतरावांनी यशवंतरावजी चव्हाण यांच्यावरील भावनेला अधिक महत्त्व दिले आणि आपला निवडणूक लढविण्याचा निर्णय मागे घेतला.

आजच्या राजकारणाकडे पाहिले म्हणजे श्रीपतरावांचे मोठेपण लक्षात येते. आज नेत्यांसंदर्भातील निष्ठा आणि आदराची भावना अभावानेच आढळते. आपण राजकारणात आहे म्हणजे आपल्या मनासारखेच व्हायला हवे, मग त्यासाठी कोणत्याही पातळीवर जायला लागले तर जायचे अशी मनोवृत्ती रुजलेली पहायला मिळते. यातूनच नेत्यांसंदर्भातील विश्वास तर राहोच, पण त्याहीपुढे जाऊन बंडखोरी करण्याची प्रवृत्ती प्रकर्षाने जाणवते. पन्नास वर्षांपूर्वी यशवंतरावजी चव्हाण यांच्या संदर्भात श्रीपतरावांनी आपल्या निष्ठेचे दर्शन घडविले. विधानसभेच्या उमेदवारीची धामधूम सुरू असतानाच यशवंतरावजी चव्हाण कोल्हापूरला आले होते. त्यांनी श्रीपतरावांना बरोबर घेतले आणि पंचगंगेच्या तीरावरील गावाकडे फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडले. महाराष्ट्राची निर्मिती होऊन केवळ दोन वर्षांचा काळ लोटला होता आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कोल्हापुरातील कार्यकर्त्या नेत्याला घेऊन फिरत आहेत हे दृश्यच अचंबित करणारे होते. प्रवासादरम्यान यशवंतरावांनी श्रीपतरावांची भूमिका जाणून घेतली आणि 'पक्ष देईल त्या उमेदवाराच्या पाठीशी आपण उभे रहावे अशी माझी इच्छा आहे' असे सांगितले. एका क्षणाचाही विलंब न करता श्रीपतरावांनी 'साहेब जशी आपली इच्छा असेल तसेच होईल. तुमच्या इच्छेच्या विरुद्ध मी काहीही करणार नाही' अशी ग्वाही दिली. श्रीपतरावांनी निवडणुकीतून माघार घेतली, पण त्याक्षणी त्यांनी यशवंतराव चव्हाणांच्या मनात केलेले घर आजन्म तसेच राहिले. कोल्हापुरातील मनस्वी कार्यकर्त्यां–मध्ये यशवंतराव नेहमीच श्रीपतरावांचा उल्लेख करीत असत, ही त्यांच्या राजकीय जीवनाची सर्वात मोठी शिदोरी आहे असे वाटते.

श्रीपतराव बोंद्रे यांना आमदार होण्याची संधी पुढील निवडणुकीत चालून आली. यावेळीही यशवंतराव चव्हाण साहेबांचाच सहभाग अधिक होता. १९६२ साली श्रीपतराव थांबले ते चव्हाण साहेबांच्या सांगण्यावरून[८], त्यामुळे जोपर्यंत साहेब सांगत नाहीत तोपर्यंत आपण निवडणुकीचा विचार करायचा नाही अशी खूणगाठ त्यांनी बांधली होती. यथावकाश निवडणुकीचे वातावरण सुरू झाले. तिकीटे मागण्याची प्रक्रियाही सुरू होती. या सर्व घडामोडींवर यशवंतराव चव्हाणांचे लक्ष होते. या दरम्यानच्या काळात ते साताऱ्याला आले होते. त्यांनी निवडणुकीची तयारी कशी सुरू आहे याची चाचपणी करताना कोल्हापुरातून कोणी कोणी तिकीटाची मागणी केली आहे याची विचारणा केली. त्यामध्ये श्रीपतराव बोंद्रेंचा उल्लेख नव्हता. त्यांना आश्चर्य वाटले व त्यांनी किसनवीर आबांना तत्काळ कोल्हापूरला पाठवून श्रीपतरावांना बोलावून घेतले. गेल्यावेळची परिस्थिती वेगळी होती. आता तर आपण उमेदवारीही मागितली नाही, मग साहेबांनी कशासाठी बोलावले? श्रीपतरावांच्या मनात अनेक प्रश्नांनी काहूर माजवले होते.

श्रीपतराव साताऱ्याला पोहोचले. त्यांनी यशवंतराव चव्हाण साहेबांची भेट घेतली. साहेबांनी 'तिकीट मागणी का केली नाही?' असे विचारले. त्यावेळी श्रीपतरावांनी दिलेले उत्तर विलक्षण होते. ते म्हणाले, 'साहेब गेल्यावेळी आपण मला म्हणाला होता की फॉर्म भरायला कोणी सांगितला? त्यावेळी आपल्या इच्छेनुसार मी माघार घेतली. आतापर्यंत आपण मला काहीच सांगितले नाही. मग मी फॉर्म कसा भरू?' यशवंतराव सद्गदित झाले. अन्यत्र महाराष्ट्रात सत्तेसाठी साठमारी सुरू असताना श्रीपतरावांची भूमिका 'स्वामिनिष्ठेचे प्रमाण' होती. यशवंतरावांनी तत्काळ त्यांना फॉर्म भरण्यास फर्मावले. अतिशय कृतज्ञ भावनेने श्रीपतरावांनी विधानसभेसाठीचा अर्ज भरला. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाणसाहेबांच्या सूचना आणि मार्गदर्शना-नुसार श्रीपतराव बोंद्रे महाराष्ट्राच्या राजकारणातील उमेदवारी करण्यास सिद्ध झाले. १९६७ साली श्रीपतराव बोंद्रे करवीर मतदारसंघातून निवडून आले. त्यानंतर पुढील काळात सांगरुळ मतदार संघाचेही त्यांनी प्रतिनिधित्व केले. शेतकरी कुटुंबात वाढलेल्या आणि सर्वसामान्य माणसांच्या जीवनाशी समरस झालेल्या श्रीपतरावदादांनी जवळजवळ २५ वर्षे आमदारकीच्या माध्यमातून लोकसेवा केली.[९] या दरम्यान शरद पवार यांनी त्यांच्यावर कृषिराज्यमंत्री पदाची जबाबदारीही सोपविली आणि कार्यकर्ता ते मंत्री हे राजकीय वर्तुळ यशस्वीपणे पूर्ण झाले.

श्रीपतराव शंकरराव बोंद्रे यांची राजकीय वाटचाल चढत्या लयीत झाली. त्यांनी अर्बन बँकेतून उमेदवारी स्वीकारली आणि आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर १९९५ साली आमदार म्हणूनच ते निवृत्त झाले. या दरम्यानच्या काळात त्यांना पाच वेळा आमदार होण्याचा मान मिळाला व १९७८ सालच्या महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात कृषीराज्य मंत्री म्हणून काम

करण्याची संधी मिळाली. हा प्रवास संघर्षमय होता. एकाचवेळी पक्षीय विरोधकांच्या बरोबरच काम करीत असतानाच स्वपक्षातील काही मंडळींच्याबरोबरही त्यांना संघर्ष करावा लागला. अगदी सुरूवातीच्या टप्प्यात तर डाव्या विचारसरणींच्या लोकांबरोबरचा त्यांचा संघर्ष अनेकवेळा हातघाईवर आला. पण निडर छातीच्या दादांनी कोणत्याही टप्प्यावर हार मानली नाही. सर्वसामान्य माणसांचं असणारं पाठबळ त्यांना नेहमीच यशाची शिखरे पादाक्रांत करताना उपयोगी पडली. म्हणूनच कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे यांच्या राजकीय जीवनाकडे पाहत असताना सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेला सामान्य तरूण ते असामान्य कर्तृत्वशाली राजकीय नेता कसा घडत गेला याचे दर्शन होते.

## संदर्भ सूची


१) डॉ. शानेदिवाण आर. के., भूमिपुत्र, सोनिया प्रकाशन, कोल्हापूर, २०१२, पृ. ३७.

२) श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, दसरा चौक, कोल्हापूर कार्यालयाकडून मिळालेली माहिती.

३) डॉ. शानेदिवाण आर. के., भूमिपुत्र, सोनिया प्रकाशन, कोल्हापूर, २०१२, पृ. ३९.

४) तत्रैव, पृ. ४६.

५) तत्रैव, पृ. ४८.

६) तत्रैव, पृ. ५१.

७) तत्रैव, पृ. ५२.

८) तत्रैव, पृ. ५३.

९) तत्रैव, पृ. ३४.

# प्रकरण चौथे

## श्रीपतराव बोंद्रे : सामाजिक कार्य

श्रीपतराव बोंद्रेदादा यांनी तरूण वयापासूनच सामाजिक कार्यामध्ये रस घेतला. लहानपणी कपिलतीर्थ मार्केटमध्ये भाजी विकायला ते जात होते. त्यावेळेपासून समाजातील विविध लोकांच्या सुख–दु:खाचा विचार त्यांच्या मनात डोकावत होता. पुढील काळात प्रत्यक्ष राजकारणात कार्यरत झाल्यानंतर त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये समाजाच्या विकासाला सर्वात महत्त्वाचे स्थान राहिले. त्यामुळे दीन, दलित, गरीब, शोषित, स्त्रिया, बेरोजगार, मजुर अशा सर्वच पातळीवर आपल्या राजकीय सत्तेचा वापर त्यांनी केला. स्वाभाविकपणे त्यांची ओळख समाजासाठी कार्यरत असणारा राजकीय नेता अशी होण्यास मदत झाली. त्यांच्या सामाजिक कार्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे अनुभवता येईल.

**श्रीपतराव बोंद्रे : सामाजिक कार्य**

श्रीपतराव बोंद्रे यांची ओळख 'दादा' अशी बनली होती. दादा म्हणजे घरातील कर्ता पुरुष. येथे वडिलकीचे नाते तर होतेच, पण त्याचबरोबर सर्व लोकांना सांभाळून घेणारी अशी व्यक्ती हाही भावनिक अर्थ यापाठीमागे होता.[१] लग्नानंतर श्रीपतरावांनी स्वतःला पूर्णवेळ शेतात गुंतवून घेतले. वडील शंकरराव बोंद्रे यांनी शेती अतिशय गांभीर्याने जपली होती. तीच परंपरा श्रीपतरावांनी जपली आणि उसाचे पीक घेण्यात प्राधान्य दिले. पूर्वीच्या काळी साखर कारखाने नव्हते. सर्व गूळ उत्पादित होत होता. श्रीपतराव आपल्या बैलगाडीतून गुळाचे रवे घेऊन जात असत. त्यावेळी एका रव्याची किंमत ५० पैसे होती. श्रमाच्या तुलनेत ही किंमत खूपच कमी होती. श्रीपतरावांनी ही परिस्थिती नीटपणे समजून घेतली आणि गुळाची विक्री स्वतःच करण्याचा निर्णय घेतला. गुळाच्या खरेदी–विक्रीसाठी अडत दुकान काढले. हा काळ १९४३ सालचा. एका नवीन व्यवसायात श्रीपतरावांनी पाऊल टाकले आणि काही काळातच आपल्या क्षेत्रात घट्टपणे पाय रोवले.

श्रीपतरावांनी अल्पावधीतच व्यवसायाचे गमक प्राप्त केले. मुळातच माणसं जोडण्याचा स्वभाव असल्यामुळे त्यांच्या अडत दुकानाकडे शेतकऱ्यांचा ओढा असायचा. व्यवसाय तर व्हायचाच पण त्याही पलीकडे जाऊन आत्मीयतेचे नाते निर्माण करण्यात श्रीपतराव यशस्वी झाले होते. पेढीवर येणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुखदुःखात सामील होताना प्रसंगी त्याला आर्थिक मदत देण्यासंदर्भातही त्यांनी मदतीचा हात पुढे केला. बऱ्याच वेळेला इतर दुकानांपेक्षा जास्त दर देण्याची भूमिकाही घेतली. याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर सकारात्मक पद्धतीने झाला. रंकाळा परिसरातील अनेक शेतकरी श्रीपतरावदादांच्या पेढीव्यतिरिक्त कुठेही गूळ घालीत नसत. एक विश्वासाचे नाते या काळात निर्माण झाले होते. हा साधारणपणे स्वातंत्र्यपूर्व

कालखंड. या काळात राजकीय, सामाजिक क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या घटना घडत होत्या. याचा परिणाम अपरिहार्यपणे भारतीय बाजारपेठांवर झाला. गूळ व्यापारही त्याला अपवाद राहिला नाही. यामुळे श्रीपतरावदादांना काही काळ तोटाही सहन करावा लागला. पण त्यांनी गुळाची पेढी मात्र बंद केली नाही. सर्वसामान्यांचा आधार नुकसान सोसूनही सुरूच ठेवला.

श्रीपतरावांचा विचार चौफेर असे. त्यामुळे त्यांचे आजोबा रामजी असो किंवा वडील शंकरराव असोत, यांच्याप्रमाणेच काळाच्या पुढचा विचार करून धाडसी निर्णय घेण्यात त्यांना भय वाटत नसे. रामजी बोंद्रे यांनी पाणी योजनेचे एक स्वप्न पाहिले होते. तो प्रयत्न मानवी प्रयत्नांचा अत्युच्च आविष्कार होता. काही वर्षांनंतर श्रीपतरावांनीही तशीच एक योजना सुरू केली. यासाठी दुसऱ्या महायुद्धात तेल वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या पाईपांचा वापर त्यांनी केला. त्यासाठी आपल्या मित्रांची मदत घेतली. आवश्यक वस्तूंच्या खरेदीतून नदीपासून बालिंग्याच्या माळापर्यंत पाणी उपसा करण्याची योजना कृतीत आणली. एक नवा प्रयोग प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर साकार झाला. पण पाईपांच्या प्रतवारीमुळे अनेक अडचणीही निर्माण झाल्या. दिवसभर विजेची मोटर सुरू असायची. त्यामुळे पाईपा कुठेतरी फुटायच्या. त्याचा शोध घेऊन त्याच्या दुरुस्तीसाठी धावपळ करावी लागे. याचा शारीरिक व मानसिक ताण श्रीपतरावांवर येत राहिला आणि त्याकाळी अतिशय महत्त्वाकांक्षी मानलेली ही योजना बंद करण्याचा कटू प्रसंग त्यांच्यावर आला. पण एवढ्याने ते निराश झाले नाहीत.

शेतीवर निस्सीम प्रेम करणाऱ्या श्रीपतरावांनी पंचगंगेचे पाणी फुलेवाडीपर्यंत नेण्याचा घाट घातला. यासाठी जागेची पाहणी आणि या क्षेत्रातील जाणकारांशी प्रदीर्घ चर्चा केली. शिंगणापूरच्या जॅकवेलमध्ये पाणी सोडून तेथून उपसा करण्याचा निर्णय झाला. आवश्यक परवानगीचे सोपस्कार पूर्ण झाले. इंजिनांची उपलब्धता झाली. त्यासाठी खूपच धावपळ करावी लागली. 'प्रयत्नांती परमेश्वर' या उक्तीप्रमाणे मानवी श्रमांबरोबर परमेश्वराची साथ उपयोगी पडली आणि श्रीपतरावदादांच्या स्वप्नातील एक प्रकल्प पूर्ण झाला. फुलेवाडीची अवघी पंचक्रोशी आनंदली. आज या योजनेला साठ वर्षांहून अधिक काळ झाला आहे. या काळात कित्येक शेतकऱ्यांच्या जीवनात सुख, समृद्धी आली. संसार फुलले. भविष्याची अनेक स्वप्ने लोकांनी पाहिली आणि प्रत्यक्षातही उतरवली. ही किमया श्रीपतरावदादांच्या दूरदृष्टीने केली. याच काळात त्यांनी दत्त मंदिर उभारण्याचा निश्चय केला आणि ते पूर्णही केले. श्रद्धा आणि परिश्रमाचे जिवंत स्मारक म्हणूनच श्रीपतरावांच्या या कर्तृत्वाकडे पहावे लागते.

**शेतीमध्ये नवे प्रयोग**

श्रीपतरावदादांचा मूळ पिंड शेतकऱ्याचा असल्याने शेतीत सतत काहीतरी नवीन करण्याकडे त्यांचा कल असायचा. आजोबा आणि वडिलांकडून शेतीचे बाळकडू मिळाले होतेच,

पण त्याही पुढे जाण्याचा त्यांचा ध्यास होता. त्यामुळे शेतीत सतत प्रयत्न करीत राहणे त्यांना आवडायचे. श्रम तर होतेच, पण श्रमाबरोबर उत्पन्नवाढीचा विचारही त्यांच्या मनात कायमपणे असायचा. यासाठी जिथे म्हणून शेतीचे नवे प्रयोग सुरू असायचे त्याठिकाणी ते पोहोचायचे आणि शेती नजरेखालून घालायचे. साधारणपणे १९६०–६२ च्या काळात त्यांनी शेतीचे स्वरूप पाहण्याच्या हेतूने भारतातील अनेक ठिकाणांना भेट दिली. काही कृषी विद्यापीठांना भेट दिली आणि परंपरा व विज्ञान यांची सांगड घालून शेती कशी वाढविता येईल याचा अभ्यास केला. हा प्रयोग खूपच फलदायी ठरला. यातूनच भाताचे विक्रमी उत्पादन घेण्याचा पराक्रम त्यांनी केला. १९७७ साली चाळीस गुंठे रानातून अठ्ठावन्न क्विंटलहून अधिक धान्याचे उत्पादन करून राष्ट्रीय स्तरावर लौकिक मिळविला. असाच प्रयोग त्यांनी ऊस पिकाच्या बाबतीत केला आणि 'सिओ६७१ शाहू'[२] या नावाने उसाची जात विकसित केली. एवढ्यावर न थांबता श्रीपतराव बोंद्रे यांनी परिश्रमपूर्वक आपली प्रतिमा निर्माण केली. विशेषतः शेतकरी म्हणून त्यांची असणारी समाजातील पत सर्वमान्य होती.

शेतकरी शेतात राबतो. त्याला आवश्यक असणारे, शेतीला पूरक असणारे शेतीपूरक वातावरण उपलब्ध झाले नाही तरी त्याचा संघर्ष सुरू असतो. याचे विशेष कौतुक त्यांच्या प्रत्येक कृतीतून जाणवायचे. शेतकरी म्हणजे बळीराजा. तो सुखी झाला तर समाज सुखी होईल या भावनेने श्रीपतरावांनी पाणी उपसा योजना, नवी शेतीची तंत्रे, बी–बियाणे, वेगवेगळ्या पिकाची लागवड करणे, बाजारपेठ उपलब्ध करून देणे असे नानाविध प्रयोग केले. या प्रयोगांच्या यशस्वीतेसाठी नवनवे तंत्र पाहिले आणि त्याला विकसित करण्याचाही जाणीवपूर्वक प्रयत्न केला. विशेषतः फळबागांसंदर्भातील त्यांचा दृष्टिकोण प्रायोगिक होता, पण त्यामध्येही त्यांनी विशेष यश प्राप्त केले. निसर्ग प्रतिकूल वाटला तरी सहकाऱ्यांच्या साथीने अनुकूलता निर्माण करायची आणि आपल्याबरोबर सहकारी शेतकऱ्यांनाही सुखी, समृद्ध जीवनाची वाट मिळवून द्यायची या ध्यासाने श्रीपतरावांचे जीवन उजळले होते. आजही लोकांच्या मनात असणारी त्यांच्या संदर्भातील भावना या गोष्टीची साक्ष आहे.

श्रीपतराव बोंद्रे यांच्या आयुष्याचा पूर्वार्ध शेतकरी म्हणूनच अधिक लक्षात राहतो. आजोबा, आई–वडील आणि पत्नीच्या सान्निध्यात असताना त्यांनी घर, शेती, व्यवसाय या बाबींकडेच अधिक लक्ष केंद्रित केले. यामध्ये त्यांना कमालीचे यशही प्राप्त झाले. हे घडत असताना त्यांचे लोकांशी आणि लोकजीवनाशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध येत राहिले. लोकांच्या बैठकीत असणे, त्यांच्याशी विचारविनिमय करणे, त्यांच्या अडीअडचणी सोडविणे यांमुळे श्रीपतरावांची प्रतिमा 'दादा' म्हणजे मोठा भाऊ अशी होत राहिली. यातूनच त्यांचा सार्वजनिक जीवनाशी संबंध येऊ लागला. आजूबाजूला असणारे समाजवास्तव आणि त्याला

दिलेली प्रतिक्रिया यातून त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा श्रीगणेशा झाला. अर्थात ही एवढीच गोष्ट त्याला कारणीभूत झाली असे मात्र नाही. कारण त्यांचे आजोबा आणि चुलते कळत नकळतपणे सार्वजनिक जीवनातील घडामोडींशी संबंधित होतेच. त्यांच्या एका चुलत्याने तर स्वदेशीचा विचार प्रत्यक्ष कृतीतून अंमलात आणला व आपल्या परदेशी बनावटीच्या वस्तूंचा त्याग करून खादी वापरायला सुरुवात केली. राष्ट्रप्रेमाचा हा संस्कार श्रीपतरावांवर लहानपणापासूनच होता.

**सहकार हाच सामाजिक कार्याचा आधार**

श्रीपतरावांच्या जडणघडणीचा काळ हा महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या उभारणीचा काळ होता. लोकांचे संघटन उभं करून सहकाराच्या माध्यमातून लोकविकासाची कामे करण्याची भावना यामागे असायची. याच काळात गांधींचे स्वातंत्र्यप्राप्तीसाठीचे आंदोलन वेगवेगळ्या माध्यमातून सुरू होते. तत्कालीन परिस्थितीत गांधींचा प्रभाव समाजातील प्रत्येक घटकावर होता. श्रीपतरावही त्याला अपवाद नव्हते. त्यामुळे गांधींनी स्वीकारलेल्या असहकार, स्वदेशी, स्वावलंबन, ग्रामसुराज्य आदी कार्यक्रमांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. विसाव्या शतकाचा पूर्वार्ध राष्ट्रप्रेमाने भारावलेला होता. आपण देशासाठी काहीतरी करायला हवे असे सर्वांना वाटत असे. श्रीपतरावही या विचाराने गांधी चळवळीत सहभागी झाले. प्रापंचिक जबाबदारी सांभाळत त्यांनी या चळवळींतून ‘सहकार’ स्वीकारला. त्यासाठी सहकार सेक्रेटरी पदाचा कोर्सही पूर्ण केला. हा काळ साधारणपणे १९३७–३८ चा. म्हणजे वयाच्या अठराव्या वर्षीच त्यांनी सहकाराकडे अतिशय गांभीर्याने पाहिले. कोणतीही कृती करताना त्यातील मर्म समजून घ्यावे आणि मुळापासूनचा अभ्यास असावा ही वृत्ती श्रीपतरावांनी तेव्हापासून अंगी बाणवली होती.

श्रीपतराव बोंद्रेंची घडण जशी घरच्या मंडळींच्या सान्निध्यात झाली तसाच त्यांच्यावर जोतिराव फुले यांचा जबरदस्त प्रभाव होता. महात्मा जोतिबा फुले यांनी मानवतेचा संदेश देताना दास्यमुक्तीला सर्वाधिक महत्त्व दिले. माणूस हा माणुसकीच्या नात्याने परस्परांशी जोडला जायला हवा अशा विचारांच्या जोतिबांनी दुसऱ्यावर अधिकार गाजवून स्वातंत्र्य हिरावून घेणे ही बाब कधीच मान्य केली नाही. समाजातील दिनदलित, पीडितांना बरोबर घेऊन त्यांच्या मुक्तीचा विचार जोतिबांनी लोकांसमोर नेहमीच ठेवला आणि त्यादृष्टीने प्रत्यक्ष कृतीही केली. जोतिबांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात सरकारशी लढा उभारला. इतकेच नव्हे तर हा लढा वेगवेगळ्या पातळ्यांवरून सक्रिय केला. श्रीपतरावदादा या लढ्याने खूपच प्रभावित झाले होते. त्याकाळात शेतकऱ्यांच्या संदर्भात अत्यंत मूलगामी विचार करणारे व्यक्तिमत्त्व म्हणूनच त्यांनी जोतिबांकडे पाहिले. स्वाभाविकपणे फुलेंच्या विचारांचा जबरदस्त प्रभाव घेऊनच त्यांची वाटचाल सुरू राहिली. श्रीपतराव बोंद्रे यांनी उभारलेल्या सहकारी संस्थांच्या नावांकडे आज नजर टाकली तरी जोतिबांचा त्यांच्यावर असणारा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

सहकाराच्या माध्यमातून सामान्य माणसांच्या आयुष्याची घडी नीटपणे बसविता येईल याची खात्री दादांना होती. हा काळ महाराष्ट्र निर्मितीचाही होता. यशवंतरावजी चव्हाणांनी सहकाराबरोबर मिश्र सहकारी शेतीचा प्रयोग महाराष्ट्रात राबविला जावा असा आग्रह धरला होता. अशा काळात श्रीपतराव बोंद्रे यांनी फुलेवाडी सहकारी संस्थेचे रोपटे लावले. ही मातृसंस्था म्हणून विकसित करताना त्यांनी १९४५–४६ च्या दरम्यान सहकारी तत्त्वावर गृहनिर्माण संस्था उभी करण्याचा संकल्प सोडला. समाजातील सर्व जातीधर्माच्या माणसांना एकत्र करून मिश्र वसाहतीचा प्रयोग श्रीपतरावांनी राबविला. त्या काळात अशा तऱ्हेचा विचार मांडणे आणि तो प्रत्यक्षात उतरविणे खूपच धाडसी कृत्य होते. श्रीपतरावांनी ते शिवधनुष्य पेलले आणि म. जोतिबा फुले यांच्या नावाने गृहनिर्माण संस्थेची उभारणी झाली.[३] वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी सर्वधर्मसमभावाची भावना मनात रुजवून आयुष्याच्या अखेरपर्यंत त्याचा पाठपुरावा करीत मानवतावादाची शिकवण प्रत्यक्ष कृतीतून श्रीपतरावदादांनी दिली.

श्रीपतराव बोंद्रे यांनी सामाजिक तसेच सहकाराच्या माध्यमातून आपली लोकाभिमुख प्रतिमा निर्माण करण्यात यश प्राप्त केले होते. साधारणपणे हा काळ दुसऱ्या महायुद्धाचा. श्रीपतरावांचे वय चोवीस–पंचवीस वर्षे इतकेच होते. परंतु त्यांच्याकडे असणारी सामाजिक जाण खूपच प्रगल्भ होती. सर्वसामान्य माणसांच्या अडीअडचणी समजून घ्याव्यात, त्यांना आधार द्यावा, शेतकऱ्यांसाठी नवनवीन योजनांची आखणी करावी, शेतीतील पिकांवर नवनवे प्रयोग करावे, मैदानी खेळावर विशेष प्रेम करताना कुस्ती, दांडपट्टा यामध्ये रमावे अशी वृत्ती त्यांनी बाळगली होती. हे सर्व घडताना चारचौघांना बरोबर घेऊन हाती घेतलेले कार्य तडीस नेण्याची वृत्ती त्यांच्या अंगी बाणली जात होती. त्या काळातील वातावरण धाडसी आणि आक्रमक वर्तनाला अनुकूल होते. गांधींच्या विचाराचा पाठपुरावा करणे म्हणजे देशसेवा करणे ही बाब सर्वांना मान्य होती. याचा परिणाम असा झाला की, श्रीपतरावांच्या अंगी असणारे नेतृत्वगुण विकसित होऊ लागले. ते जे काही सांगतील त्याच्यावर लोकांचा विश्वास बसू लागला होता. एकाअर्थी स्वातंत्र्यपूर्व काळातच श्रीपतरावांचे नेतृत्व लोकाभिमुख होत होते. सामाजिकतेच्या अंगाने एका नव्या राजकीय पर्वाचा उदय या काळातच झाला.

स्वातंत्र्यपूर्व काळात प्रजा परिषदेची चळवळ जोरात सुरू होती. कोल्हापुरातील माधवराव बागल या चळवळीचे नेतृत्व करीत होते. या आधारे विविध स्वरूपाची शिबिरे घेण्यात येत असत. यामध्ये श्रम शिबिरांचा विशेष समावेश होता. प्रजा परिषदेच्या चळवळीवर गांधी विचारांचा प्रभाव होता. गांधींनी ग्रामराज्याची संकल्पना मांडली. गाव सुधारले तर समाजाची उभारणी योग्य दिशेने होईल ही भावना त्यामागे होती. त्यामुळे ग्रामस्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, शैक्षणिक जाणिवा, कौटुंबिक स्वास्थ्य, आरोग्य जाणीव आदी बाबींवर भर दिला जात असे.

यासाठी गावागावात जाणे आणि प्रबोधनात्मक शिबिरे घेणे, प्रत्यक्ष कार्यपूर्तीसाठी प्रयत्न करणे या बाबींचा समावेश होता. श्रीपतराव या चळवळीकडे आकृष्ट झाले. मुळातच अशा सामाजिक कार्याची त्यांना आवड होती. त्यामुळे त्यांनी बागलांच्या चळवळीत सहभाग घेतला. घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून आठ-पंधरा दिवस ते खेड्यापाड्यातून फिरायचे. तेथील लोकांशी संवाद साधायचे. गाव आणि गावातील माणसांच्या जीवनाची प्रत्यक्ष पाहणी करण्याचा योग या निमित्ताने त्यांच्या आयुष्यात आला. श्रीपतरावांनी या काळात खेड्यातील शेतकरी पाहिला, अनुभवला. त्यांची असणारी दयनीय अवस्था जाणून घेतली. त्याची कारणे काय असू शकतील या संदर्भात विचारमंथन केले. याच काळात त्यांच्या वाचनात जोतिबांचे 'शेतकऱ्याचा आसूड' हे पुस्तक आले आणि त्यांच्या विचारांची दिशा बदलली. शेतकऱ्यांचे आयुष्य बदलायचा जणू मूलमंत्र त्यांना सापडला. आपल्या माणसांच्या आयुष्यात चैतन्य निर्माण व्हावयाचे असेल तर सर्व तऱ्हेचे स्वातंत्र्य आत्मसात व्हायला हवे असा प्रबळ विचार या काळात त्यांच्या मनात निर्माण झाला. आणि यातूनच सर्वांगीण प्रगतीचा मार्ग स्वातंत्र्याच्या विचारापासून सुरू होतो आणि असे स्वातंत्र्य प्राप्त झाले तर सर्व तऱ्हेच्या दास्यातून मुक्ती होऊ शकते, हा ठाम विश्वास श्रीपतरावांच्या मनात निर्माण झाला. हा विश्वास त्यांनी आजन्म आपल्या मनात बाळगला. आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी शेतकऱ्यांना आपल्या आस्थेच्या केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या उद्धारासाठी आयुष्य वेचले.

श्रीपतराव बोंद्रे यांच्या जीवनाची घडी बसत होती. त्यांना वैचारिक आधार मिळालेला होता. एकाअर्थी पुढील आयुष्याची वाटचाल कशी असावी यासंदर्भातील दिशा निश्चित होत होती. हा काळ तसा स्वातंत्र्यपूर्व होता. या काळात त्यांनी नॅशनल बँकेत भिशी गोळा करण्यासाठी नोकरी स्वीकारली. अर्थात ही नोकरी पुढील काळात भूमिगतांशी संपर्क साधण्याचा एक दुवा बनली. श्रीपतरावांनी आपल्या कुवतीप्रमाणे स्वातंत्र्यलढ्यात अशा तऱ्हेने सहभाग नोंदविला. या सहभागाने श्रीपतरावांच्या व्यक्तित्वाला एक नवी झळाळी प्राप्त झाली. एक नवे व्यक्तिमत्त्व आकार घेत होते. सर्वसामान्य माणसांची काळजी घेणारा, शेतकरी कुटुंबात वाढलेला एक युवक स्वातंत्र्य चळवळीच्या निमित्ताने एका मोठ्या परिप्रेक्षावर स्थिरावू लागला होता. यावेळेपावेतो श्रीपतरावांचे नाव अनेकांपर्यंत पोहोचले होते. समर्पित वृत्तीचा तरुण कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख याच काळात गडद होत गेली. आणि पुढील काळात तर तालीम संघाचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी तरुणांच्या गटाचे नेतृत्वही केले.

श्रीपतराव ऐन तारुण्यात म्हणजे सत्तावीस वर्षाचे असताना भारत देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्याच्या चेतनादायी वाऱ्याने संपूर्ण देश न्हाऊन निघालेला असतानाच राष्ट्रपिता महात्मा गांधींची हत्या झाली. नथुराम गोडसेने ही हत्या केल्याचे समजल्यावर ब्राह्मण समाजाच्या

विरोधात संतापाची लाट उसळली. लोकांचा उद्रेक झाला. जाळपोळ, लुटालूट आणि प्राणहानीही सुरू झाली. एका माथेफिरूने केलेले कृत्य संपूर्ण समाजाच्या मुळावर उठते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. या काळातच श्रीपतरावांकडे कोल्हापूर जिल्हा तालीम संघाची जबाबदारी होती. त्यांना परिस्थितीचे भान होते. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह शहरात शांतता प्रस्थापित करण्याचा विडा उचलला. यथावकाश दंगल थांबली. दुर्दैवाने काही लोकांनी तालीम संघालाच या दंगलीत गोवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे श्रीपतराव भूमिगत झाले. पण काही काळाने परिस्थिती निवळली. सर्व काही सुरळीत पार पडले. आज या घटनेला साठ वर्षांहूनही अधिक काळ झालेला आहे. तरीही अनेकांना श्रीपतरावदादांनी त्यावेळी केलेली मदत आठवते, ते त्यांचा अत्यंत कृतज्ञ भावनेने उल्लेख करतात.

या काळात सार्वजनिक जीवनातील श्रीपतरावांचा सहभाग खूपच वाढला. त्यामुळे घराकडे दुर्लक्ष होतंय की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. अशा काळातच आनंदीबाईंनी गोंडस अशा मुलाला जन्म दिला. त्याचे नाव सुभाष ठेवण्यात आले. श्रीपतरावदादा 'बाप' बनले. बाळाचे आगमन आणि सार्वजनिक जीवनातील धावपळ या गोष्टी एकाच काळात घडत होत्या. दुर्दैवाने या सर्व धकाधकीचा परिणाम श्रीपतरावदादांच्या पत्नी आनंदीबाईंवर झाला. त्यांची प्रकृती खूपच ढासळली आणि एके दिवशी त्यांनी इहलोकाची यात्रा संपवली. श्रीपतरावांबरोबर संपूर्ण घर दुःखात बुडाले. पण सावरणे गरजेचे होते. दादांनी संयम राखला आणि आपल्यावरील जबाबदारीची जाणीव मनाशी ठेवली. ते स्वतःला सार्वजनिक जीवनात गुंतवू पाहत होते. पण वयाचा विचार करता त्यांना जीवनाचा साथीदार असायला हवा अशी भावना अनेकांकडून व्यक्त होऊ लागली. या सर्वांचा आदर करीत श्रीपतरावदादांनी अंबादास मिसाळ यांच्या मालती या कन्येशी विवाह केला. हा विवाह अनेकांगानी फलदायी ठरला. सौ. मालतीबाईंनी दादांना अखेरपर्यंत साथ दिली. त्यांना दोन मुले रणजित उर्फ राजू व विजय आणि तीन मुली जयादेवी, बिनाताई व बेबीताई. श्रीपतरावदादा बोंद्रेंच्या घरात सहा भावंडे खेळू लागली होती. कौटुंबिकदृष्ट्या दादांचे आयुष्य सफल आणि सुफल बनले.

**ग्रामीण समस्यांची जाण**

श्रीपतराव बोंद्रे यांनी लौकिक अर्थाने फारसे शिक्षण घेतले नव्हते पण त्यांची अनुभवाची शाळा समृद्ध होती. त्यांना आपल्या भागातील समस्यांची चांगली जाण होती. त्यांचा आमदारकीचा परिसर विविधतेने नटलेला होता. क्षेत्रफळाच्या दृष्टीने दूरवर पसरलेल्या या मतदार संघात समृद्ध, संपन्न शेतजमीन असणारा भाग एकीकडे तर दुर्गम डोंगरकपारीचा भाग दुसरीकडे अशी स्थिती होती. स्वाभाविकपणे या भागातील प्रश्न वेगवेगळे होते. याचा अभ्यास दादांना होता. त्यामुळे त्या त्या भागात पोचल्यावर या प्रश्नासंबंधीची चर्चा व्हायची. या चर्चेमध्ये स्थानिक प्रश्न असायचे. जनतेच्या मूलभूत प्रश्नावरील उपाय सुचविण्याचा प्रयत्न असायचा.

सर्वसामान्य माणसाचे जीवन कसे सुसह्य करता येईल याचा विचार त्यांच्या मनात असायचा. त्यामुळे लोकांशी त्यांची नाळ अधिक सुलभपणे जुळायची. आमदार असणारी व्यक्ती लोकजीवनातील प्रश्नांसंदर्भात बोलत आहे ही बाब सर्वसामान्य लोकांना सुखावणारी असायची. लोकांना बरे वाटायचे आणि ही एक मोठी शक्ती दादांसंदर्भात उपयोगात यायची.

**सहकारावर प्रचंड निष्ठा**

दादांनी सहकारच्या क्षेत्रात निष्ठापूर्वक विचारांची पेरणी केली. शेती आणि शेतकरी यांच्या संदर्भात विशेष आस्था दाखविताना शेतीमालाला योग्य भाव मिळावा यादृष्टीने नेहमीच आवाज उठविला. सहकाराशिवाय विकास होऊच शकणार नाही अशी भावना त्यांच्या मनात होती. त्यामुळेच विकास सेवा संस्थांच्या बरोबरीने दूध संस्थांच्या उभारणीतही दादा अग्रेसर राहिले.

श्री. श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या सामाजिक कार्याच्या संबंधाने वरील काही विशेष मांडता येतील. या आधारे एक गोष्ट लक्षात येते की, सहकार हा त्यांच्या व्यक्तित्वाचा भाग बनला होता. त्यांच्या आयुष्याचा बहुतांश कालावधी कोल्हापूर शहरामध्ये व्यतित झाला. असे असले तरी त्यांचा संबंध बहुतांश वेळा ग्रामीण भागाशी आला. असे असले तरी कोल्हापूर आणि कोल्हापूर परिसराशी निगडीत असणाऱ्या अनेक समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या कामी त्यांनी अभ्यासू वृत्तीने प्रयत्न केल्याचे सातत्याने दिसून येते.

## संदर्भ सूची

१) डॉ. शानेदिवाण आर. के., भूमिपुत्र, सोनिया प्रकाशन, कोल्हापूर, २०१२, पृ. २६.

२) तत्रैव, पृ. २९

३) महात्मा जोतिराव फुले गृहनिर्माण संस्था, फुलेवाडी येथील कार्यालयीन नोंदीनुसार.

## प्रकरण पाचवे

## श्रीपतराव बोंद्रे यांचे कोल्हापूर व कोल्हापूर परिसराच्या विकासातील योगदान

मागील प्रकरणात नोंदविल्याप्रमाणे श्री. श्रीपतराव शंकरराव बोंद्रेदादा यांचा संबंध कोल्हापूर व कोल्हापूरच्या आजुबाजुच्या परिसराशी अधिक प्रमाणात आला. विशेषत: ग्रामीण भागाचा विचार केला तर करवीर तालुक्यातील बहुतांश सर्व गावे राजकीयदृष्ट्या त्यांच्याशी निगडीत राहिली. सुरूवातीच्या काळात करवीर विधानसभा मतदारसंघ व पुढील काळात सांगरूळ विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केल्यामुळे संपूर्ण करवीर तालुका त्यांच्या कार्यक्षेत्रात होता. या अगोदर कोल्हापूर नगरपरिषदेवर त्यांनी प्रतिनिधित्व केले व कोल्हापूरचे नगराध्यक्ष बनण्याचाही त्यांना मान मिळाला. या दृष्टिने कै. दादांच्या योगदानाचा विचार करीत असताना कोल्हापूर व करवीर, राधानगरी या तालुक्यांचाही विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. या दृष्टिने पुढील काही विकासात्मक योजना प्राधान्याने नजरेसमोर येतात.

### १) अर्बन बँक

कै. दादांनी आपल्या आयुष्यातील पहिली निवडणुक अर्बन बँकेच्या माध्यमातून लढविली. अर्बन बँकेला खूप मोठा इतिहास आहे. तत्कालिन परिस्थितीत कोल्हापूर शहरामध्ये असणाऱ्या नागरी बँकांमध्ये अर्बन बँकेचा उल्लेख आवर्जून होत होता. या बँकेमध्ये प्रतिनिधित्व करीत असताना व्यावसायिकदृष्ट्या लोकांना सक्षम करण्याच्या दृष्टिने त्यांनी विविध योजना मूर्त रूपात साकारल्या त्यामुळे आजही अर्बन बँकेच्या इतिहासाचा मागोवा घेताना कै. दादांचा उल्लेख आवर्जून करण्यात येतो.[१]

### २) कोल्हापूर नगरपालिका नगराध्यक्ष

दादांनी दहा वर्षे कोल्हापूर नगरपालिकेचे प्रतिनिधित्व केले. ही या दृष्टिने महत्त्वाची आहे की, १९५० ते १९६० या कालावधीमध्ये कोल्हापूर शहरावर डाव्या विचारसरणीचा प्रभाव होता. अशावेळी काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधित्व करणे ही गोष्ट खूपच दुर्मिळ होती. दादा जेंव्हा निवडून आले तेंव्हा ते एकमेव काँग्रेस पक्षाचे नगरसेवक होते. अशावेळी विरोधकांशी संगनमत करून आपल्या कार्यप्रणालीने लोकांना आपलेसे करून त्यांनी कोल्हापूर नगरपालिकेचा नगराध्यक्ष होण्याचा मान मिळविला.[२] ही अभूतपूर्व गोष्ट होती. जे कधी शक्यच झाले नसते ते दादांनी आपल्या राजकीय कौशल्याने साध्य केले. यामुळेच एक गोष्ट निश्चित झाली की काँग्रेसचा समतावादी दृष्टिकोन, समन्वयवादी विचार प्रत्यक्ष राजकारणामध्ये रूजविण्यात दादांना यश प्राप्त झाले.

### ३) लोकाभिमुख निर्णय : केएमटी सुरू केली

कोल्हापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष असताना दादांनी शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विचार करून केएमटी सुरू करण्याचा निर्णय घेतला. आज या परिवहन व्यवस्थेला ५० वर्षांहूनही अधिक काळ झाला आहे. सुरुवातीला अगदी मर्यादित अवस्थेत असणाऱ्या केएमटीने आज हजारो प्रावाशांना आधार दिला आहे. दादांनी अत्यत दूरदृष्टीने घेतलेल्या या निर्णयामुळे कोल्हापूरचा चेहरामोहरा बदलण्यास गती मिळाली.[३]

### ४) कोल्हापूर जिल्हा बँकेवर प्रतिनिधित्व

कोल्हापूर जिल्हा मध्यवती सहकारी बँक ही जिल्ह्याची जीवनदायीनी आहे. या बँकेच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना व्यावसायिक, शेतीविषयक बाबींसाठी अर्थपुरवठा केला जातो. ही बाब लक्षात घेऊन दादांनी के.डी.सी.सी. बँकेवर प्रतिनिधित्व करण्याचा निर्णय घेतला आणि यथावकाश या बँकेचे चेअरमनही बनले. हा काळ शेतकऱ्यांच्या दृष्टिने सुवर्णकाळ ठरला. कारण या काळामध्ये दादांनी सेवासंस्था, दुध संस्था, शेतकरी, शेतीविषयक अवजारे अशा अनेक बाबींसाठी अर्थपुरवठा करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना सक्षम बनविण्याची कृतीयुक्त भूमिका घेतली.[४]

### ५) 'गोकुळ'ला पाठबळ

आज केवळ कोल्हापुरातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नावलौकीक असणारी 'गोकुळ' दूध संस्था श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या दूरदृष्टीनेच उभारली गेली, हे लक्षात घ्यावयास हवे. 'गोकुळ' म्हणजे पूर्वाश्रमीचे मिल्क फेडरेशन जोमाने सुरू राहावे आणि टिकून राहावे हीच भूमिका दादांनी शेवटपर्यंत घेतली. सुरुवातीला ही संस्था अनेक अडचणीतून मार्ग काढीत होती. सुदैवाने त्या काळात दादा आमदार होते. त्यांनी प्रत्येक टप्प्यावर या संस्थेला धीर दिला. एका क्षणी तर 'गोकुळ'वर प्रशासक नेमण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री ना. शरद पवारसाहेबांना 'गोकुळवर प्रशासक नेमणार असाल तर माझ्या मंत्रीपदाचा राजिनामा घ्या आणि मगच प्रशासक नेमा' असे ठामपणे सांगितले होते. शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करणारी ही संस्था चुकीच्या निकषाचा आधार घेत बदनाम करू नका, ही भूमिका दादांनी ठेवली. आज गोकुळचे दिसणारे विशाल रूप आणि जनसामांन्यांच्या जीवनात या संस्थेने फुलविलेले आर्थिक वैभव यामागे श्रीपतराव बोंद्रेदादांचा विचार महत्त्वपूर्ण आहे, हे लक्षात घ्यावयास हवे. केवळ शेतीने शेतकऱ्यांचा विकास साधणार नाही तर शेतीपूरक व्यवसाय म्हणून दुधाच्या व्यवसायाकडे शेतकऱ्यांनी गांभीर्याने पहायला हवे अशीच भावना दादांनी नेहमी जपली. त्याचबरोबर कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, शेतकरी सहकारी संघ या संस्थांच्या माध्यमातूनही दादांनी शेतकऱ्यांच्या हिताचाच विचार केला.[५]

### ६) रयतची उभारणी

रयत संघाची उभारणी करण्यामध्ये श्रीपतराव बोंद्रेदादा यांचा सिंहाचा वाटा आहे. ६ ऑक्टोबर १९६२ रोजी 'रयत सेवा शेती धंदा उपयोगी माल उत्पादक व पुरवठा मंडळी लि., फुलेवाडी' या नावाने सुरू झालेली ही संस्था पुढील काळात 'रयत' या नावानेच ओळखली जाऊ लागली. कै. दादांनी प्रत्यक्ष शेती कसणाऱ्या शेतकऱ्यांना एकत्र करून ही संस्था स्थापन केली. प्राधान्याने शेती पूरक अशा खतांची निर्मिती आणि पुरवठा हा उद्देश या स्थापनेमागे होता. सुरुवातीच्या काळात १५:५:५ ग्रेडचे बैलजोडी छाप मिश्रखताची निर्मिती होत होती. दादा कृषिराज्य मंत्री झाल्यावर १७:१०:१० ग्रेडचे उत्पादन सुरू झाले व त्याचेच रूपांतर २०:१०:१० ग्रेडमध्ये करण्यात आले. कै. श्रीपतराव दादांनी शेतकऱ्यांसाठी ही संस्था उभी केली आणि या संस्थेत त्यांनी मॅनेजिंग डायरेक्टर म्हणूनही काम पाहिले.[६]

### ७) श्री. विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था

फुलेवाडी, ता. करवीर हे दादांचे कार्यक्षेत्र राहिले. या ठिकाणी विविध योजना सुरू करीत असताना त्या परिसरातील मुलांच्या शिक्षणाचा विचार करून विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेची उभारणी केली. ज्या काळी ही संस्था उभी राहिली त्या काळी कोल्हापूर आजच्या इतके विस्तारले नव्हते. त्यामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत ही भूमिका घेऊन उभी केलेल्या या संस्थेमध्ये आज हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[७]

### ८) फुलेवाडी हौसिंग सोसायटी

स्वातंत्र्याच्या धामधुमिच्या काळातच कै. दादांनी गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून एक अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. दादांचे श्रद्धेय जोतिबा फुले यांच्या नावे महात्मा जोतिराव फुले हौसिंग सोसायटी उभी राहिली. त्या काळातील आशिया खंडातील ही सर्वात मोठी सहकारी तत्त्वावर कार्यरत असणारी सोसायटी ठरली होती.

### ९) फुलेवाडी पाणीपुरवठा संस्था

कै. दादांनी नेहमीच मोठा विचार केला आणि अंमलातही आणला. साधारण ६०–७० वर्षापूर्वी फुलेवाडी परिसर म्हणजे फोंडामाळ होता. पाण्याची वाणवा होती. ही बाब लक्षात घेऊन पंचगंगा नदीतून पाणी उपसा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि जवळजवळ पाच किलोमिटरपेक्षाही अधिक अंतरावरून पाणी आणण्याचा यशस्वी प्रयोग केला. त्या काळातच नव्हे तर आजही हा प्रकल्प अनेकांच्या औत्सुक्याचा विषय ठरला आहे.[८]

### १०) श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था

राजकारण करीत असताना शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ नये याची सातत्याने खबरदारी दादांनी घेतली. त्यामुळे फुलेवाडीत शिक्षण संस्था उभी करण्याबरोबरच कोल्हापूरच्या मध्यवर्ती

ठिकाणी असणाऱ्या श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या माध्यमातूनही त्यांनी शिक्षणाचा वसा पुढे चालू ठेवला. आज दसरा चौकात उभं असणारे हे संकुल अनेक विद्याशाखांनी समृद्ध आहे. कला, वाणिज्य, विज्ञान, वैद्यकीय, फार्मसी, बी.एड्., आय.टी.आय., हायस्कूल, इंग्रजी मेडियम स्कूल अशा सर्व शाखां आज कार्यरत आहेत. आज जरी शिक्षणाचा वटवृक्ष झाला असला तरी सर्वसामान्य गोरगरिब मुलांना शिक्षणाच्या सुविधा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात या दृष्टिने कार्यरत असणारी ही संस्था दादांच्या दूरदृष्टिचा परिपाक आहे.[९]

**११) सांस्कृतिक विभागाशी संबंध**

राजकारण आणि समाजकारण करीत असताना समाजातील कला, क्रीडा, संगीत, चित्रपट या क्षेत्रातील लोकांशीही त्यांचा अत्यंत जवळचा संबंध राहिला. तालिम संघाचे ते सदस्य होते. तसेच कोल्हापूर शहरामध्ये चित्रनगरी स्थापन करण्याच्या त्या प्रक्रियेमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग होता. कलेच्या क्षेत्रातील व्ही. शांताराम, ग. दि. माडगुळकर, जगदिश खेबुडकर, लेखक गो. नी. दांडेकर, रणजीत देसाई अशा अनेक लोकांशी त्यांचा संबंध येत राहिला. फुलेवाडी परिसरात त्यांनी दत्तमंदिर उभं करून आपला अध्यात्मिक ओढाही सिद्ध केला होता. समाजातील या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांना आधार देण्याचे काम दादांनी इमानेइतबारे केले होते.

सर्वसाधारणपणे श्रीपतराव बोंद्रेदादांच्या कोल्हापूर व कोल्हापूर परिसरामध्ये केलेल्या कामकाजाचा आलेख वरीलप्रमाणे मांडता येईल. या काही ठळक नोंदी आहेत. या व्यतिरिक्तही व्यक्तिगत पातळीवर त्यांनी केलेल्या कामाची यादी खूप मोठी आहे. हे सर्व करीत असताना त्यांच्या कामाची पद्धती कशी राहिली याचाही लेखाजोखा पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**सर्वसामान्य माणूस दादांच्या आस्थेच्या केंद्रस्थानी राहिला**

दादांच्या व्यक्तित्वाचा सर्वात मोठा पैलू म्हणजे त्यांची माणसं जोडण्याची कला! अगदी लहानपणापासून त्यांनी कुटुंबाची जबाबदारी उचलली. घरकामाबरोबर भाजी मार्केटमध्ये भाजी विकली. तेथे अनेकांशी संबंध येत राहिला. मंडईत येणारी सर्व माणसं वेगवेगळ्या घरातील असायची. यामध्ये शहराबरोबर ग्रामीण भागातील माणसांचा संबंध सातत्याने येत राहायचा. त्यांच्याशी बोलावे आणि आपला माल त्यांना विकावा ही भूमिका नजरेसमोर ठेवूनच दादांचा त्यांच्याशी संवाद व्हायचा. मुळातच मृदू व्यक्तिमत्त्वाच्या दादांच्या बोलण्याचीच भुरळ अधिक पडायची आणि इतरांपेक्षा कमी वेळात त्यांच्या मालाचा उठाव व्हायचा. लोकांना काय हवे याचे भान जसे त्यांना होते तसेच जे काही आपण द्यायचे ते प्रामाणिकपणे आणि योग्य पद्धतीने द्यायचे हीच वृत्ती त्यांची राहिली. स्वाभाविकपणे लहानपणापासूनच माणसं ओळखण्याची सवय

त्यांना लागली होती. ही बाब खूप महत्त्वाची आहे. यामुळे केवळ पैसा किंवा नफा प्राप्ती ही गोष्ट नजरेसमोर न ठेवता त्यांनी 'माणूस' डोळ्यासमोर ठेवला. त्याच्या अडीअडचणी समजून घेऊन त्याच्याशी व्यवहार केला. याच्या परिणामातून व्यवसायही व्हायचा आणि माणसंही जोडली जायची. श्रीपतराव बोंद्रे यांची हीच वृत्ती पुढील काळात तशीच राहिली. विशेषतः राजकारणाच्या वाटचालीत या गुणानेच त्यांना मोठा हातभार लावला.

श्रीपतराव बोंद्रे यांच्या राजकारणाचा कालावधी स्वातंत्र्यानंतर पन्नास वर्षांचा. हा काळ नव्या उमेदीचा होता. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्यांनी लढ्यात प्रत्यक्ष सहभाग नोंदविला होता अशी बहुतांश मंडळी राजकारणात विशिष्ट उद्देश ठेवून वावरत होती. स्वातंत्र्यपूर्व काळातील एकूणच सामाजिक स्थितीचा विचार करता लोकांचे आणि विशेषतः लढ्यात सहभागी असणाऱ्यांचे संबंध मनस्वी होते. आजूबाजूला असणारे विषमतेचे धागे या लढवय्या मंडळींच्या वृत्तीत जाणवत नव्हते. जात, पात, धर्म या पलीकडे जाऊन 'माणूस' नावाचा धर्म मानण्याची वृत्ती त्यांच्यामध्ये होती. त्यामुळेच त्या काळातील बहुतांशी सर्व कार्यकर्त्यांच्या आजूबाजूला विविध समाजघटकांची मांदियाळी असायची. पैशापेक्षा माणसांच्या वेदना जाणून घेण्याची ही प्रवृत्ती दादांच्यामध्येही होती. त्यामुळे प्रत्यक्ष राजकारणात सहभागी झाल्यावर 'श्रीपतराव म्हणजे आपला माणूस' ही जाणीव जनमाणसात प्रबळ झाली. त्यामुळे अगदी पहिल्या निवडणुकीपासून दादा यशस्वी होत गेले.

पन्नास वर्षांपूर्वीचा काळ संक्रमणाचा होता. त्यावेळी भौतिक सुविधांपेक्षा माणसांना मानसिक आधार अधिक महत्त्वाचा वाटत असे. श्रीपतरावांनी बँक आणि आमदारकीच्या माध्यमातून हा आधार लोकांना दिला. त्यांच्या पाठीवरून हात फिरवला. त्यांची सुख–दुःखे जाणली, त्यांना धीर दिला. एखादी वाड्यावस्तीवरील व्यक्ती आली म्हणजे श्रीपतरावदादा त्यांच्याशी अगदी मोकळेपणाने संवाद साधत. त्यांच्या घरची विचारपूस करत. इतकेच नव्हे तर शेती, जनावरे, पीकपाणी, सुना–नातवंडांपर्यंत त्यांची चौकशी व्हायची. एका क्षणात त्यांच्या समोरील माणसे भावनिक धाग्यांनी त्यांच्याशी जोडली जायची. हे नाते खूप महत्त्वाचे होते. यात आंतरिक ओढ होती. तेथे देण्याघेण्यापेक्षा एकमेकांना समजून घेणे होते. व्यक्ती जर दुःखात असेल तर त्याचे सांत्वन करावे आणि सुखात असेल तर त्याच्या पाठीवर हात ठेवावा ही वृत्ती दादांनी ठेवली. हे त्यांनी मुद्दाम केले नाही, तर त्यांच्या नसानसात ही वृत्ती भिनली होती. राजकारणाच्या धकाधकीत अशा माणसाचा आधारच महत्त्वाचा ठरतो. एखाद्या दलिताच्या, धनगराच्या किंवा गरिबाच्या घरात थांबून त्यांच्या घरची भाजीभाकरी खाऊन तृप्तीचा ढेकर देणाऱ्या श्रीपतरावदादांनी अशा माणसांचा स्नेह जोडला. ही माणसंच त्यांची राजकीय ताकद बनून राहिली.

या संदर्भात माझ्या समोरच घडलेल्या एका घटनेचा उल्लेख करावासा वाटतो. माझ्या आठवणीनुसार धामोड भागातील काही मंडळी दादांना भेटायला आली होती. दादा दत्तमंगल कार्यालयासमोर बसले होते. त्यांच्या समोर मी. आमचे बोलणे सुरू असतानाच ही मंडळी आली. वेशभूषेवरून ती धनगर आहेत हे लक्षात आले. ती मंडळी आली आणि अगदी दादांच्या पायाशीच बसली. दादांच्या लक्षात आले नाही. त्यांनी त्यांचा दीर्घकाळचा सेवक भिकूला चष्मा आणायला सांगितला. चष्मा घातल्यावर त्यांनी त्या लोकांकडे निरखून पाहिले. त्यातलाच एकजण म्हणाला, 'दादा आम्ही धामोडहून आलोय.' दादांच्या चेहऱ्यावर चमक आली. ते म्हणाले, 'कोण रे' आणि त्यांनी नाव सांगताच, 'कसा आलास, आणि कोण आलंय, गावात काय चाललंय, गावात पाणी आलंय काय' असे कितीतरी प्रश्न विचारले. ते लोकही बोलत होते आणि दादांना पाणावल्या डोळ्यांनी पाहत होते. दादांना पाहून कदाचित त्यांच्या मनात कालवाकालव झाली असावी... पण हे दृश्य मी बऱ्याचवेळेला अनुभवलेले होते.

**अभ्यासू वृत्ती**

श्रीपतराव बोंद्रे यांची आमदार म्हणून असणारी प्रतिमा कशी होती हा निश्चितच औत्सुक्याचा विषय आहे. पाच वेळा आमदार आणि दोन वर्षांहून अधिक काळ कृषिमंत्री असणारी ही व्यक्ती लोकाभिमुख होती हे निर्विवाद आहे. पण श्रीपतरावदादा आमदार असण्यापेक्षाही अधिक काहीतरी होते असे सतत जाणवत राहते. आमदारकीने त्यांच्या नेतृत्वाच्या व्यापक पटलावर शिक्कामोर्तब झाले पण त्यांची नाळ मात्र सर्वसामान्यांशी, शेतकऱ्यांशी जोडलेली होती. त्यामुळे विधानसभेत बोलताना ते आक्रमक व्हायचे. हा आक्रमकपणा त्यांनी अभ्यासूवृत्तीच्या माध्यमातून जोपासला. एखादा प्रश्न मांडायचा असेल तर त्याची संपूर्ण माहिती घ्यावी, त्या प्रश्नाचे पदर पहावेत, त्यावरील उपाय जाणून घ्यावेत आणि मग विधानसभेच्या पटलावर ठेवावे ही त्यांची पद्धती लक्षणीय होती. त्यामुळे लौकिकदृष्ट्या जरी ते शिकलेले नसले तरी त्यांची मांडणी मात्र अभ्यासपूर्ण असायची. निधीची कमतरता असण्याच्या काळात कणेरी तलाव, तुळशी धरण, कोगे धरण, पाझर तलाव अशा योजनांना मूर्तरूप देताना त्याची आवश्यकता त्यांनी ठासून सांगितली. पाणी नसेल तर शेतकऱ्यांचे जगणे मुश्कील होईल हे सांगताना सभागृहालाही हेलावून सोडण्याची ताकत श्रीपतरावांच्या वाणीत होती. याची साक्ष अनेकांच्या बोलण्यातून आजही अनुभवता येते.

**साधने मर्यादित, पण समानतेचे धोरण ठेवले**

आजच्या राजकारणाच्या तुलनेत जुन्या लोकप्रतिनिधींना अधिकाराच्या बाबतीत झुकते माप असायचे, पण आर्थिक बाबतीत मात्र खूपच तोकडी मदत सरकारकडून व्हायची. गेल्या काही वर्षांत आमदार फंड आणि इतर फंडांतून आर्थिक मदतीचा ओघ मतदारसंघात येऊ

लागला. आमदारफंडाच्या माध्यमातून संबंधित आमदार आपल्या भागात विविध विकासकामे करू शकतात अशी परिस्थिती अनुभवता येते. बऱ्याच ठिकाणी तर फलक लावून संबंधित आमदार आपण केलेल्या कामाची प्रसिद्धी करतात. श्रीपतराव बोंद्रेदादांच्या वेळी अशी परिस्थिती नव्हती. एकतर त्यावेळी आमदारफंड ही संकल्पना अस्तित्वात नव्हती. शासनाच्या स्तरावर निर्णय व्हायचे आणि त्याच माध्यमातून कामाची पूर्तता व्हायची. सरकारच्या पातळीवरील निर्णय व्यापक दूरदृष्टीने घेतलेले असायचे. त्यामध्ये सर्वांगीण विकासाची भूमिका असायची. श्रीपतरावदादांनीही अशाच तऱ्हेची भूमिका ठेवली. कदाचित त्यांच्या काळातील पायाभूत सुविधांची यादी कमी असेल, पण त्यांनी उपलब्ध साधनांचा, आर्थिक ओघाचा अतिशय शिस्तीने वापर केला. कोणताही एखादा भाग विशिष्टतेने आपल्या सहानुभूतीच्या कक्षेत न आणता सगळीकडे समदृष्टी ठेवल्यानेच त्यांच्या संदर्भातील आदर सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये कायमपणे राहिला.

**शालीन आणि नम्र**

दादांनी दीर्घकाळ राजकारण केले. पण हे करताना समाजकारणाचा आधार कधीच सोडला नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासून अगदी विसाव्या शतकाच्या शेवटच्या क्षणापर्यंत दादांनी आपली हयात सर्वसामान्यांच्या उद्धारासाठी घालवली. संघर्ष केला, सत्तापदे मिळाली. मोठ्या जनसमुदायाचे नेतृत्व केले. मानाबरोबर अपमानाचेही कटू प्रसंग अनुभवले, पचवले. व्यक्तिगत जीवनातही कौटुंबिक आघात सोसले. एका माणसाच्या आयुष्यात असे प्रसंग येणे हाही दैवाचाच खेळ. अगदी सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या किरकोळ देहाचा श्रीपतराव महाराष्ट्र राज्याचा मंत्री झाला. सगळेच अकल्पित पण तरीही सत्य ! एवढा दीर्घ प्रवास आणि तोही लोकांच्या लक्षात राहणारा करूनसुद्धा दादांच्या जगण्यातील शालीनता आणि विनम्रता कुठेही डागदार झाली नाही. संघर्षातून यशस्वीपणाची अनेक शिखरे पार करतानाही कधीही 'ग'ची बाधा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला भिडली नाही. 'मी शेतकरी आहे आणि तुमच्यातलाच एक आहे, नव्हे तुमचाच आहे' या भावनेशी प्रामाणिक राहिलेल्या दादांनी मातीशी निगडित राजकारण केले. ज्या मातीने आपल्याला ओळख दिली त्या मातीशी प्रतारणा करण्याचा विचारही त्यांच्या मनास कधी शिवला नाही. त्यामुळेच विजय आणि पराजय अशा दोन्ही काळात त्यांनी संयम ठेवला. पदरात पडणारे दान त्यांनी स्थितप्रज्ञतेच्या भावनेने स्वीकारले.

आज राजकारणाचे बदलते रंग पाहिल्यानंतर श्रीपतरावदादांचे यश अधिकच लखलखीत वाटते कारण या यशामागे अधाशीपणाने धावण्याचा अट्टाहास नव्हता. जनतेच्या प्रेमाचे बळ त्यांच्यापुढे यशाची कमानी उभारत गेले. आज मागे वळून बघताना श्रीपतराव बोंद्रेदादा आणि त्यांनी कसलेली जमीन निश्चितच सुखावत असेल, कारण आजच्या अनैतिकतेने बरबटलेल्या

राजकारणाच्या भूमीपेक्षा दादांनी मशागत केलेली भूमी अधिक विश्वसनीय आणि अधिक श्रद्धाशील होती!

**श्रद्धा हेच बळ**

श्रीपतरावदादांवर महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव होता. स्वाभाविकपणे त्यांच्या प्रत्येक कृतीत पुरोगामित्व असायचे. पण त्यासाठी त्यांनी आपल्या मनातील श्रद्धांना अव्हेरले नव्हते. दादांची श्रद्धा डोळस होती. त्यांचा दिवस फुलेवाडीच्या दत्त मंदिरातून सुरू व्हायचा आणि महालक्ष्मीच्या दर्शनाने त्याची सांगता व्हायची. प्रत्येक पौर्णिमेला दादा नृसिंहवाडीला श्री दत्ताचे दर्शन घ्यायला जायचे. यामध्ये कधी खंड पडला नाही. बोंद्रे घराण्याचे कुलदैवत नाईकबा, शिर्डी, गाणगापूर आदी धर्मक्षेत्रांना ते श्रद्धापूर्वक भेट देवून नतमस्तक व्हायचे. दादांची ही श्रद्धाशीलवृत्ती हे त्यांचे मोठे बळ होते. जग चालवणाऱ्या परमेश्वरासंदर्भातील कृतज्ञता मनात वागवून दादांनी केलेली आयुष्याची वाटचाल त्यांच्या संदर्भातील आदर दुणावणारी अशीच आहे.

श्रीपतराव बोंद्रे श्रद्धाशील आणि भक्तीचा वारसा जपणारे नेते होते. त्यांची परमेश्वर उपासना ही नीतांत श्रद्धायुक्त अंतःकरणातून साकारली. आयुष्यभर नैतिक मूल्यांचे पालन करणारे श्रीपतरावदादा शाकाहारी होते. त्यांनी कधी मद्य, मांस भक्षण केले नाही. अतिशय सात्त्विक भावनेने त्यांचा दिवस सुरू होई. फुलेवाडीचे दत्त मंदिर हे त्यांच्या आस्थेचे मंदिर. तेथून नतमस्तक होऊन त्यांचा दिवस सुरू होई आणि अंबाबाईच्या दर्शनाने दिवसभराच्या कामाची इतिश्री व्हायची. दादांची दत्तावर श्रद्धा. पण ही श्रद्धा डोळस होती. त्यांनी अंधश्रद्धेला खतपाणी घातले नाही. त्यांच्या जीवनात त्यांनी कर्माला महत्त्व दिले. कर्म आणि धर्म यांची सांगड श्रद्धेच्या भावनेतून घातल्यानेच त्यांचे जीवन सात्त्विकतेच्या अंगाने फुलले. यामुळेच असेल कदाचित दादांनी भौतिकतेपेक्षा आध्यात्मिक जाणिवेला अधिक प्राधान्य दिले. ते निसर्गाच्या सान्निध्यात रमले. त्यांनी जीवनाचा आनंद गोरगरिबांच्या वेदना पुसण्यात घेतला. ही त्यांची वृत्ती नकळतपणे सन्यस्थ भावनेकडे झुकणारी अशीच वाटते. याचा प्रत्यय राजकारणातून बाहेर पडण्याच्या त्यांनी घेतलेल्या निर्णयातूनही येतो.

**संदर्भ** :


१) शतक महोत्सवी विशेषांक, अर्बन बँक, कोल्हापूर, २०१६.

२) कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर कार्यालयाकडून मिळालेली माहिती.

३) तत्रैव.

४) कोल्हापूर जिल्हा सहकारी बँक लि. कोल्हापूर कार्यालयाकडून मिळालेली माहिती.

५) कोल्हापूर जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघ लि., (गोकुळ) कार्यालयाकडून मिळालेली माहिती.

६) रयत संस्था, फुलेवाडी कार्यालयाकडून प्राप्त झालेली माहिती.

७) श्रीपतराव बोंद्रेदादा षष्ट्यद्बिपूर्ती विशेषांक, १९८१.

८) तत्रैव.

९) तत्रैव.

१०) डॉ. शानेदिवाण आर. के., भूमिपुत्र, सोनिया प्रकाशन, कोल्हापूर, २०१२.

११) तत्रैव.

**उपसंहार :**

प्रस्तुत अभ्यासातंर्गत **''कोल्हापूरच्या विकासात माजी मंत्री स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास''** या विषयाची मांडणी केली आहे.

कोल्हापूरच्या सार्वजनिक जीवनात अनेक महनीय व्यक्तींनी आपल्या कर्तृत्वाने बहुमोल अशी भर घातली आहे. कै. श्रीपतराव बोंद्रेदादा हे अशाच काही निवडक राजकीय नेत्यांपैकी एक होत. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या कै. दादांनी आयुष्याची पहिल्या टप्प्यामध्ये शेतीबरोबरच खडतर असा संघर्ष केला. आपल्या उपजत धडपडी वृत्तीमुळे आजुबाजूला असणारा समाज, गोरगरीब शेतकरी, कष्टकरी जनता यांच्या जीवनामध्ये सुखाचे चार घास मिळायला हवेत या भूमिकेतून त्यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरूवात केली. ऐन तारूण्याच्या काळात भारतीय स्वातंत्र्य लढ्याशी नाळ जुळलेल्या कै. दादांच्यावर महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा पगडा होता. तिशीत असताना त्यांच्या राजकीय जीवनाला सुरूवात झाली. कोल्हापूर नगरपालिकेवर काँग्रेस पक्षाचे सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर केवळ एक सदस्य असतानाही कोल्हापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला. त्या पुढील काळात कोल्हापूर अर्बन बँक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या सहकारी संस्थावर प्रतिनिधित्व करीत असताना त्यांनी अनेक लोकोपयोगी योजना राबविल्या. या काळात कै. दादांची ओळख राजकीय नेता अशी होत असतानाच सर्वसामान्य शेतकऱ्यांच्याबद्दल आस्था बाळगणारा राजकीय नेता अशी होत होती.

सामाजिक कार्याच्या दिशेने पाऊल उचलत असताना सहकार या तत्त्वाचा त्यांनी अंगिकार केला. आज कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची जीवनवाहिनी बनलेला गोकुळ दुध संघ सुरू करण्यामध्ये कै. दादांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या हस्ते गोकुळची पायाभरणी झाली हेही लक्षात घ्यावयास हवे. केवळ करवीर तालुक्यातच नव्हे तर कोल्हापूर जिल्ह्याला आदर्शवत ठरलेला 'रयत संघा'ची उभारणी कै. दादांनी केली आहे. याबरोबरच करवीर तालुक्यातील अनेक सेवा संस्था, दुध संस्था, पाणीपुरवठा संस्था, पतसंस्था यांच्या उभारणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. या संस्थांची उभारणी करीत असताना नेहमीच सर्वसामान्य माणसांच्या हिताचा विचार त्यांनी केला. ग्रामीण विकासाच्या बरोबरच शहरी विकासाच्या दृष्टीने विचार मांडताना आज कोल्हापूरच्या रस्त्यावरून फिरणाऱ्या के.एम.टी.चे जाळे ही दादांच्या कल्पक नेतृत्त्वाची देणगी आहे हे लक्षात घ्यावयास हवे. कै. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांना आपल्या राजकीय व सामाजिक कार्याचे गुरू मानणाऱ्या कै. दादांनी नेहमीच आपल्या सोबत असणाऱ्या कार्यकर्त्यांना मोठं करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच त्यांच्या सोबत असणारे सर्व कार्यकर्ते

वेगवेगळ्या जातीजमातीचे तर होतेच पण त्याचबरोबर दादांनी सांगितलेला प्रत्येक शब्द झेलणारेही होते. कार्यकर्त्यांचा उचित सन्मान करणे, त्याच्या अडीअडचणीत धावून जाणे यामुळेच दादांनी पंचवीस वर्षे आमदारकीच्या नात्याने कोल्हापूरच्या जनतेची सेवा केली. त्यांच्या अभ्यासू वृत्तीचा महाराष्ट्राला फायदा व्हावा म्हणून मा. शरद पवार यांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात कृषीराज्य मंत्री म्हणून समाविष्ट केले. प्रत्यक्ष शेतीत राबणारा माणूस शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करतो हे चित्र महाराष्ट्राने अनुभवले आहे.

प्रस्तुत अभ्यास विषयाची मांडणी प्रकरणनिहाय पुढील प्रमाणे केली आहे.

**प्रकरण पहिले – श्रीपतराव बोंद्रे : जन्म, वारसा व जडणघडण**

**प्रकरण दुसरे – श्रीपतराव बोंद्रे : व्यक्तित्त्व विशेष**

**प्रकरण तिसरे – शैक्षणिक आणि राजकीय कार्य**

**प्रकरण चौथे – सामाजिक कार्य**

**प्रकरण पाचवे – कोल्हापूर व कोल्हापूर परिसराच्या विकासातील योगदान**

**उपसंहार**

उपसंहारामध्ये प्रत्येक प्रकरणाच्या संदर्भातील महत्त्वपूर्ण निष्कर्ष नोंदविण्यात आले आहेत.

पहिल्या प्रकरणामध्ये श्री. श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या जन्म, वारसा व जडणघडणीच्या अनुषंगाने माहिती दिली आहे. श्री. श्रीपतराव बोंद्रे यांच्यावरील संस्कार व प्रभाव याची संशोधनात्मक मांडणी प्रस्तुत प्रकरणामध्ये केली असून जडणघडणीच्या काळामध्ये त्यांच्यावरील त्यांच्या घराचा असणारा प्रभाव, त्यांच्या बंधूचे त्यांना झालेले सहकार्य, लहानपणीची त्यांची वृत्ती, संघर्ष करण्याची तयारी आदि बाबींचा वेध घेतला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या व्यक्तित्व विशेषांची चर्चा केली आहे. श्रीपतराव बोंद्रेदादा यांना दिर्घ आयुष्य लाभले. यातील साठहून अधिक वर्षे त्यांनी सार्वजनिक जीवनात व्यतीत केली. या कालावधीत राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार, सांस्कृतिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात त्यांनी कर्तव्य बजावले. त्या–त्या क्षेत्रातील व्यक्तींबरोबरचा त्यांचा सहसंबंध या निमित्ताने समजून घेता आला. त्या आधारे त्यांच्या व्यक्तित्वाचे विशेष पैलू मांडले आहेत.

तिसऱ्या प्रकरणामध्ये श्रीपतराव बोंद्रे यांच्या शैक्षणिक व राजकीय जीवनाचा अभ्यासपूर्ण वेध घेतला आहे. शैक्षणिक कार्याची महती सांगताना त्यांनी उभ्या केलेल्या संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थीभिमुख भूमिका कशी घेतली याचा वेध घेतला. श्रीपतराव बोंद्रेदादा साठ

वर्षाहून अधिक काळ राजकीय जीवनात कार्यरत राहिले. या काळात बँकेचे संचालक ते महाराष्ट्र राज्याचे मंत्री असा त्यांचा प्रवास राहिला. हा संपूर्ण कालखंड स्वतःच्या कर्तृत्वाने त्यांनी अजरामर केला. या सर्व प्रक्रियेचा अभ्यासपूर्ण विविध उदाहरणांच्या माध्यमातून घेतला आहे.

प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या सामाजिक कार्याचे स्वरूप प्रस्तुत चौथ्या प्रकरणामध्ये समजून घेतले. श्रीपतराव बोंद्रेदादा हे जरी राजकीय नेतृत्त्व असले तरी त्यांच्या वृत्तीमध्ये समाजकार्याची ओढ असल्याचा निष्कर्ष नोंदविला.

पाचव्या प्रकरणामध्ये प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने कोल्हापूर शहर व परिसरामध्ये श्रीपतराव बोंद्रे दादा यांनी केलेल्या कार्याची नोंद घेतली. त्यांच्या सामाजिक कार्याचा पाया सहकार हाच राहिला. स्वाभाविकपणे सहकारातील अर्बन बँक, के.डी.सी.सी. बँक त्याचबरोबर महानगरपालिकेतील नगराध्यक्ष पद, के.एम.टी. ची सुरूवात, गोकुळ दुध संघाची उभारणी, रयत संघाची उभारणी, शिक्षण संस्थेची उभारणी अशा विविध बाबी सामाजिक कार्याच्या अनुषंगाने समजून घेता आल्या. प्रस्तुत मांडणी करीत असताना अनेक व्यक्ती आणि संस्थांशी संबंध येत राहिला. त्यांनी पुरविलेल्या साधनांच्या आधारे ही मांडणी अधिक गंभीरपणे करता आली.

कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे दादा यांची आजची ओळख राजकीय नेतृत्त्व करणारा रांगडा सेनापती अशी असली तरी त्यांच्यातील माणूस हाच खऱ्या अर्थाने सर्वसामान्य माणसांच्या हृदयात घर करून राहिला आहे. त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण होत आहे. आजचे राजकारण, विचार आणि कृती सर्वस्वी भिन्न दिशेने सुरू असताना दादांच्या नेतृत्त्वाची उणिव भासते आहे हेच त्यांच्या कर्तृत्त्वाचे निदर्शक आहे असे म्हटले तर फारसे चुकीचे ठरू नये.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) डॉ. शानेदिवाण आर. के., भूमिपुत्र, सोनिया प्रकाशन, कोल्हापूर, २०१२.

२) श्रीपतराव बोंद्रे षष्टद्बिपूर्ती विशेषांक, १९८१.

३) दै. पुढारी, दि. १ ऑक्टोबर २०००.

४) श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, दसरा चौक, कोल्हापूर कार्यालयाकडून मिळालेली माहिती

५) महात्मा जोतिराव फुले गृहनिर्माण संस्था, फुलेवाडी येथील कार्यालयीन नोंदीनुसार.

६) शतक महोत्सवी विशेषांक, अर्बन बँक, कोल्हापूर, २०१६.

७) कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर कार्यालयाकडून मिळालेली माहिती.

८) कोल्हापूर जिल्हा सहकारी बँक लि. कोल्हापूर कार्यालयाकडून मिळालेली माहिती.

९) कोल्हापूर जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघ लि., (गोकुळ) कार्यालयाकडून मिळालेली माहिती.

१०) रयत संस्था, फुलेवाडी कार्यालयाकडून प्राप्त झालेली माहिती.

# परिशिष्टे


## परिशिष्ट – १ : कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रेदादा कुटुंबिय



वडील स्व. शंकरराव बोंद्रे



आई स्व. कृष्णाबाई बोंद्रे



कै. दादांच्या धर्मपत्नी श्रीमती मालती बोंद्रे



बोंद्रे कुटुंबियांसोबत आदरणीय दादा



फुलेवाडी दत्त मंदिर येथे श्री दत्तगुरूंची पुजा करताना आदरणीय दादा!



श्रीपतरावदादा बँकेमध्ये सत्यनारायण पूजा करताना दादा व माई

# परिशिष्ट – २ : मान्यवरांच्या सोबत कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रेदादा!



भारताचे माजी पंतप्रधान पंडित
नेहरू यांच्या समवेत



राजकीय गुरू महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री
स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या समवेत



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री
कै. वसंतदादा पाटील
यांच्या समवेत



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व
भारताचे माजी कृषीमंत्री
खासदार श्री. शरद पवार
यांच्या समवेत



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री
व भारताचे माजी गृहमंत्री
स्व. शंकरराव चव्हाण
यांच्या समवेत



परमस्नेही माजी महापौर
स्व. द. न. कणेरकर
यांच्या समवेत



प्रजापरिषदेचे अग्रणी
स्व. माधवरावजी बागल
यांच्या समवेत



महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री
कै. बाळासाहेब देसाई
यांच्या समवेत

# परिशिष्ट – ३ : सन्मान व पुरस्कार




महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार साहेब यांच्या मंत्रीमंडळात कृषीराज्य मंत्री पदाची शपथ घेताना आदरणीय दादा



षष्ट्यब्दिपूर्ती निमित्ताने आदरणीय यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना श्रीपतराव बोंद्रेदादा!



दादांच्या अमृतमहोत्सवानिमित्त महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते सपत्निक सत्कार करण्यात आला




कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने आदरणीय दादांना ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या हस्ते मानपत्र प्रदान करण्यात आले.

## परिशिष्ट – ४ : सामाजिक कार्यातील शुभारंभाचे क्षण



नगराध्यक्ष म्हणून कार्यरत असताना दादांनी कोल्हापूरच्या के.एम.टी. ची सुरूवात केली या प्रसंगी....



मार्केट यार्ड, कोल्हापूर येथे गुळाचा सौदा पुकारताना आदरणीय दादा!



कोल्हापूर जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघ (गोकुळ) च्या नव्या इमारतीचा पायाभरणी समारंभ प्रसंगी आदरणीय दादा!



वडणगे, ता. करवीर येथील जयकिसान क्रीडा मंडळ व्यायामशाळेच्या उद्घाटन प्रसंगी आदरणीय दादा!